



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# राज्यभरात शिवजयंती उत्सात: शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा

## ● पारंपरिक पाळणा गात शिवरायांना अभिवादन ● मुख्यमंत्री-दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून मानवंदना

**पुणे/प्रतिनिधी :महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यभरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर पहाटेपासूनच शिवभक्तांची मांदियाळी होती. मुख्य शासकीय कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होते. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा पाळणा जोजवत जन्मोत्सव साजरा करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक विधींसह कार्यक्रम पार पडला. पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह अनेक मान्यवरांनी महाराजांना अभिवादन केले. पहाटेपासूनच गडावर शिवभक्तांची मोठी गर्दी उसळली होती. जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. शिवजन्मस्थळ आणि गडाचा परिसर आकर्षक फुलांनी सजवण्यात आला होता. ऐतिहासिक वारसा जपत विद्युत रोषणाईने संपूर्ण किल्ला उजळून निघाला होता. या मंगलमयी सोहळयाला राज्यभरातून हजारो नागरिक उपस्थित राहिले.**



## शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा सोडणार नाही : सुनेत्रा अजीत पवार

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त किल्ले शिवनेरी येथे भव्य शासकीय सोहळा पार पडला. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रथमच शासकीय व्यासपीठावरून मनोगत व्यक्त केले. भाषण करताना अजित दादांप्रमाणे शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा सोडणार नाही असे म्हणत त्या भावूक झाल्या.सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची प्रतिज्ञा केली. आदरणीय दादांनी ज्या विचारांवर आयुष्यभर वाटचाल केली, तो वारसा मी कधीही सोडणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांनी अजित पवारांचा उल्लेख करत सांगितले की, या शिवनेरी किल्ल्याबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता. शिवनेरीच्या सुशोभीकरणासाठी ते प्रयत्नशील होते. मागील अर्थसंकल्पात आग्रा, संगमेश्वर, रायगड आणि वढू बुद्रुक येथे कामांना त्यांनी चालना दिली होती. या ठिकाणी भावी पिढीला प्रेरणा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.नुकतीच उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, शपथ घेताना त्यांच्या डोळ्यांसमोर जिजाउ माँसाहेब उभ्या होत्या. जिजाउंनी केवळ शिवरायांना जन्म दिला नाही, तर स्वराज्याची प्रेरणा आणि संकटांशी सामना करण्याची ताकद दिली. तीच प्रेरणा आजही मार्गदर्शक आहे, असे त्यांनी सांगितले.



## लोककल्याणकारी राज्यासाठी शिवरायांचा विचारच मार्गदर्शक -एकनाथ शिंदे

**पुणे/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर आधारित लोककल्याणकारी विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवनेरी येथे केले.किल्ले शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे स्मरण करून राज्याच्या विकासासाठी त्यांच्या आदर्शांचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री आशिष शेलार यांच्यासह अनेक मंत्री, खासदार-आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषातून संकटांशी लढण्याची प्रेरणा मिळते आणि आत्मविश्वास वाढतो. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना महाराजांनी प्रजेला केंद्रस्थानी ठेवून लोककल्याणकारी राज्य उभारले. स्वराज्याबद्दलची तळमळ, निष्ठा आणि पराक्रम यांच्या जोरावर त्यांनी काळाच्या पुढे विचार करणारे शासन दिले. आज आपण ज्या विकास मॉडेलचा विचार करतो, त्याचा पाया महाराजांनी शेकडो वर्षांपूर्वी घातला होता. अर्थव्यवस्था, जलव्यवस्थापन, शहर नियोजन, पायाभूत सुविधा, पर्यावरण यांचा त्यांनी दूरदृष्टीने विचार केला. मोहिमेतून आर्थिक लाभ झाला की त्यांनी किल्ले उभारणीसाठी वापर करून राज्य बळकट केले.. (पान २ वर)

## किल्ले अतिक्रमणमुक्त करणार

### ■ 2030 ला 400 वी शिवजयंती भव्य करू ■ शिवनेरीवरून फडणवीसांची घोषणा

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील शिवरायांचे सर्व किल्ले आम्ही अतिक्रमणमुक्त करू. मला सांगताना आनंद वाटतोय की, पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले आता अतिक्रमणमुक्त झाले आहेत, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा जन्मोत्सव सोहळा शिवनेरी येथे पार पडला. या कार्यक्रमातून ते बोलत होते. फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारताचा इतिहास आणि भूगोल यांचे चित्र वेगळे असते. ज्या काळात अनेक राजे मोघलांच्या आधिपत्याखाली काम करत होते, त्या काळात आई जिजाउंनी शिवरायांना घडवले. त्यांनी शिवरायांना हिंदुस्थानाला मोघलांच्या जोखडातून मुक्त करण्याची आणि रयतेचे राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली. अठरापगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून उभी केलेली फौज ही स्वराज्याची ताकद ठरली. शिवरायांनी



हे राज्य माझे नसून रयतेचे आहे, असे सांगत देव, देश आणि धर्मासाठी लढण्याची शिकवण दिली, असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांनी शिवरायांच्या दूरदृष्टीवरही प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, समुद्रमार्गे शत्रू येउ शकतो, हे ओळखणारे शिवाजी महाराज हे पहिले राजे होते. (पान २ वर)

## अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंतीनिमित्त बोलताना सांगितले की, अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा होता. यापूर्वीच राज्य सरकारने



छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा केली होती. त्या निर्णयानुसार काम सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्तकरण्यात यश आले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवरायांचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आणि गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

## पंतप्रधान मोदींनी शिवरायांना केले अभिवादन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांच्या जाज्वल्य स्मृतींना अभिवादन केले आहे. ट्विटर (X) आणि अन्य समाजमाध्यमांवरून पंतप्रधानांनी महाराजांच्या शौर्याचा आणि सुशासनाचा गौरव करत देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधानांनी आपल्या संदेशात महाराजांचा उल्लेख 'दूरदर्शी नेते आणि स्वराज्याचे पुरस्कर्ते' असा केला. ते म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक महान योद्धे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक आणि विलक्षण रणनीतीकार होते. त्यांचे शौर्य आपल्याला सदैव प्रेरणा देत राहील. महाराजांनी जनसामान्यांचे कल्याण (जन-जन के कल्याण) नेहमीच सर्वोच्च मानले आणि त्यांच्या सुरक्षेसाठी स्वतःला समर्पित केले. त्यामुळेच त्यांचे जीवन आजही संपूर्ण भारतवर्षासाठी एक पथप्रदर्शक आहे.' पंतप्रधानांनी शिवरायांच्या प्रशासकीय कौशल्याचे वर्णन करण्यासाठी एक विशेष संस्कृत श्लोकही उद्धृत केला.

'गोपायितारं दातारं धर्मनित्यमतन्द्रितम्।
अकामद्वेषसंयुक्तमनुरज्यन्ति मानवा?।।'

(अर्थ: जो रक्षण करतो, दानशूर आहे, धर्माचे पालन करण्यात तत्पर आहे आणि जो राग-द्वेषापासून मुक्त आहे, अशा राजावर जनता मनापासून प्रेम करते.) महाराजांची न्याय आणि स्वाभिमानाची भावना आपल्या समाजाला अधिक सक्षम करेल, असा विश्वासही मोदींनी व्यक्त केला आहे.

## धनंजय मुंडे वादाच्या भोव-यात; 17 लाख घेतले अन् पिस्तूल रोखले

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या अडचणीत पुन्हा एकदा मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे





पाटील यांनी सुतोवाच केल्यानंतर, आता रंजना नागपूरकर यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आर्थिक फसवणूक आणि जीवे मारण्याच्या धमकीचे गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. रंजना नागपूरकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना धनंजय मुंडे, कैलास फड आणि निखिल फड यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. त्यांच्या आरोपांमधील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

**नोकरीसाठी पैशांची मागणी :** पतीला पुन्हा नोकरीत रुजू करून घेण्यासाठी धनंजय मुंडे यांनी पैशांची मागणी केली होती. त्यानुसार नागपूरकर यांनी १७ लाख रुपये दिल्याचा दावा केला आहे.

**परळीतील निवासस्थानी भेट :** 'मी स्वतः परळीतील त्यांच्या घरी गेले होते, तेव्हा धनंजय मुंडे तिथे हजर होते. त्यांनी मला आश्वासन दिले होते की तुमचे काम लगेच होईल,' असे नागपूरकर यांनी म्हटले.

**पिस्तूल रोखून धमकी :** पैसे देउनही काम झाले नाही आणि पतीच्या निधनानंतर जेव्हा नागपूरकर पैसे परत मागण्यासाठी गेल्या, तेव्हा त्यांना धक्कादायक अनुभव आला. त्यांच्या दाव्यानुसार, 'धनंजय मुंडे यांच्यासमोरच मला पिस्तूल लावण्यात आले आणि पुन्हा आलीस तर तुला गाडून टाकू, कोणाला पत्ताही लागणार नाही,' अशी धमकी देण्यात आली. 'धनंजय मुंडे, निखिल फड (पान २ वर)

## 86 लाख लाडक्या बहिणी अपात्र

**मुंबई :** महायुती सरकार पुन्हा सत्तेत येण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. मात्र, आता या योजनेसाठी केवायसी बंधनकारक करण्यात आले आहे. २ कोटी ४० लाख लाभार्थी असणा-या या योजनेतून ८६ लाख लाडक्या बहि-णींची घट झाली आहे. तांत्रिक चूक आणि कठोर छाननीमुळे या योजनेसाठी केवळ एक कोटी ६० लाख महिला पात्र ठरल्या आहेत. ८६ लाख महिलांना अपात्र ठरवल्याने मोठा असंतोष आहे. त्यामुळे अपात्र महिलांसाठी शेवटची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिलांनी केवायसी करताना तांत्रिक चुका झाल्यामुळे त्यांचे अर्ज बाद ठरवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे अपात्र ठरलेल्या महिलांना ३१ मार्चपर्यंत अर्जात दुरुस्ती करण्याची शेवटची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे महिलांनी ३१ मार्चपूर्वी आपल्या चुका दुरुस्त करून पुन्हा केवायसी करावी. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचे मानधन पुन्हा सुरू होईल.

## राज्यसभा निवडणूक 2026

## भाजप 5 जागांसाठी ताकद लावणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय निवडणूक आयोगाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यसभेच्या निवडणुकीची घोषणा केल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून द्यायच्या ७ जागांसाठी आता सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये मोर्चेबांधनीला सुरुवात झाली आहे. विधानसभेतील पक्षीय संख्याबळ पाहता, भाजप या सातपैकी पाच जागा जिंकण्यासाठी पूर्ण ताकद लावण्याच्या तयारीत आहे.

भाजपने पाच जागांवर दावा केला असून, त्यामध्ये मित्रपक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे नेते रामदास आठवले यांच्या जागेचाही समावेश आहे. भाजपमध्ये इच्छुकांची संख्या मोठी असली तरी, अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या नेत्यांना संधी मिळावी, असा एक मोठा प्रवाह पक्षात पाहायला मिळत आहे.

**ही नावे आहेत चर्चेत-** राज्यसभेच्या उमेदवारीसाठी भाजप आणि मित्रपक्षांकडून काही महत्त्वाची नावे सध्या राजकीय वर्तुळात चर्चेत आहेत. विनोद तावडे: भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस, रामदास आठवले: रिपाई (आठवले गट) प्रमुख, विजया रहाटकर: भाजपच्या ज्येष्ठ नेत्या, भागवत कराड: माजी केंद्रीय राज्यमंत्री, धैर्यशील पाटील: भाजप नेतेचा समावेश आहे.



**निवृत्त होणारे सदस्य-**महाराष्ट्रातून खालील ७ सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने या जागा रिक्त होत आहेत. १. शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस - श.प. गट), २. रामदास आठवले (रिपाई), ३. फौजिया खान (राष्ट्रवादी काँग्रेस - श.प. गट), ४. रजनी पाटील (काँग्रेस), ५. प्रियांका चतुर्वेदी (शिवसेना - उबाठा गट),६. धैर्यशील पाटील (भाजप), ७. भागवत कराड (भाजप). एकूण ३७ जागांपैकी सर्वाधिक जागा महाराष्ट्रात (७) आहेत. त्याखालोखाल तामिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), बिहार (५), ओडिशा (४), आसाम (३), छत्तीसगड (२), हरियाणा (२), तेलंगणा (२) आणि हिमाचल प्रदेशातील एका जागेवर निवडणूक होणार आहे.

## 'ब्लॅक बॉक्स'मधील डेटा डाउनलोड करण्यात यश

### अपघाताचे गूढ लवकरच उलगडणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या संदर्भात आता सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. अजित पवारांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवालाबाबत माहिती मिळणार असल्याचं सांगितलं जातं आहे. अजित पवारांच्या अपघात प्रकरणात आतापर्यंतची सर्वात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीला आता वेग आला असून, या प्रकरणाचा प्राथमिक अहवाल २८ फेब्रुवारीपूर्वी सादर होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार, कोणत्याही विमान अपघाताचा चौकशी अहवाल महिनाभरात सादर करणे बंधनकारक असते, त्या दृष्टीने तपास यंत्रणांनी आपली कार्यवाही पूर्ण केली आहे. डिजिटल (पान २ वर)



## मुंबई विमानतळावर कस्टम्सचा धडाका!

## १६ कोटींचे ड्रग्ज, हिरे अन् सोने जप्त; ८ तस्करांना बेड्या

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे आंतरराष्ट्रीय विमानतळ सध्या तस्करांच्या निशाण्यावर असले, तरी कस्टम विभागाने आपल्या सतर्कतेने त्यांचे मनसुबे उधळून लावले आहेत. ४ ते ११ फेब्रुवारी २०२६ या आठवडाभराच्या कालावधीत मुंबई कस्टम झोन-३ ने केलेल्या धडक कारवाईत तब्बल १८ कोटींहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी ८ जणांना अटक करण्यात आली आहे.कस्टम्स विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत अंमली पदार्थांपासून ते मौल्यवान हि-यांपर्यंत मोठी तस्करी उघडकीस आली आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यात अंमली पदार्थ (हायड्रोपोनिक वीड) : १६.७५६ किलो : १६.७५६ कोटी, परकीय चलन : विविध चलनांत १.१३ कोटी, हिरे (नैसर्गिक व लॅब-ग्रोउन) : २४६.७५ कॅरेट ३८.२८ लाख, सोनं (२४ कॅरेट) : १०४ ग्रॅम १५.२४ लाख



**ड्रग्ज तस्करांचे मोठे जाळे उद्ध्वस्त-**या कारवाईतील सर्वात मोठा हिस्सा हा अंमली पदार्थांचा आहे. सुमारे १६.७५ कोटी रुपयांचे 'हायड्रोपोनिक वीड' जप्त करण्यात आले आहे. हे अंमली पदार्थ कोठून आणले जात होते आणि मुंबईत कोणाला पुरवले जाणार होते, याचा सखोल तपास आता अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत केला जात आहे.

## दिल्ली-महाराष्ट्रासह 23 राज्ये-केंद्रशासित प्रदेशांमध्ये SIR ची घोषणा

### ● एप्रिलपासून प्रक्रिया सुरू होईल ● सध्या 12 राज्यांमध्ये मतदार पडताळणी सुरू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** निवडणूक आयोगाने गुरुवारी देशभरात विशेष सघन पडताळणी (च्क्ष्ङ) ची घोषणा केली आहे. निवडणूक आयोगाचे सचिव पवन दिवाण यांनी २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिका-यांना (CEO) पत्र लिहून SIR शी संबंधित तयारीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले आहे.निवडणूक आयोगाने पत्रात सांगितले की, दिल्ली, कर्नाटकसह उर्वरित २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये च्क्ष्ङ प्रक्रिया एप्रिलपासून सुरू होण्याची अपेक्षा आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने गेल्या वर्षी २४ जून रोजी संपूर्ण देशात SIR केले जाईल असा आदेश दिला होता.बिहारनंतर देशातील



१२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २८ ऑक्टोबर २०२५ पासून च्क्ष्ङ सुरू आहे. या प्रक्रियेत मतदार यादी अद्ययावत केली जात आहे. नवीन मतदारांची नावे जोडली जात आहेत आणि मतदार यादीतील चुका सुधारल्या जात आहेत. २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची यादीतआंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश,चंदीगड, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव, हरियाणा,हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक,लडाख, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय,मिझोराम, नागालँड, दिल्ली. ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा,तेलंगणा, उत्तराखंडचा समावेश आहे. ही निवडणूक आयोगाद्वारे राबविण्यात येणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत, घरोघरी जाउन आणि लोकांना फार्म भरून मतदार यादी अद्ययावत केली जाते. १८ वर्षांवरील नवीन मतदार जोडले जातात. मृत किंवा स्थलांतरित झालेल्यांची नावे काढून टाकली जातात. नावे आणि पत्त्यांमधील त्रुटी देखील दुरुस्त केल्या जातात.

पहिला टप्पा बिहारमध्ये घेण्यात आला. अंतिम यादीत ७४.२ दशलक्ष मतदारांचा समावेश आहे. दुस-या टप्प्यात, उत्तर प्रदेश, (पान २ वर)



# आजही छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकप्रशासनाची गरज-आ. सुलभा खोडके

## शिवजयंती निमित्य शिवटेकडीवर रयतेच्या राजाला मानवंदना



**अमरावती/प्रतिनिधीः-** रयतेचे थोर कल्याणकारी राजे , हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी शिवजयंती दिनी आज गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी शिवटेकडी स्थित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला मानवंदना अर्पण केली. तसेच आमदार महोदयांनी सर्व शिवभक्तांना शिवाजी महाराज जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. शिवटेकडी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असता आ. खोडके यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन शिवप्रेमींचा आनंद द्विगुणित केला. तसेच शिवटेकडी येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती व अमरावती महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती व्याख्यान कार्यक्रमाला सुद्धा आ. सुलभा खोडके व आ.संजय खोडके यांची उपस्थिती होती. शिवजयंती निमित्य शिवटेकडीवर उपस्थित शिवप्रेमींना शुभेच्छा देतांना आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आणि कार्य समतावादी व न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक स्वरूपाचे आहे. शिवराज्यातील अर्थ व्यवस्था, धर्मनिरपेक्ष धोरण, स्त्री-पुरुष समानता , शेती विकासाचे धोरण महत्वाचे असून प्रजा हित व रयतेचे कल्याण साधण्याकरिता महाराजांच्या काळातील राज्यकारभार हेच खरे सुशासन आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे अनुसरण करून सर्वानी सुशासन व स्वराज्याची ज्योत सदैव तेवत ठेवण्यासाठी नवा संकल्प व नवीन जाणीव निर्माण करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी केले. यावेळी महिलांचा पारंपरिक पेहराव, बालकांच्या विविध वेशभूषा सुद्धा लक्षवेधी ठरल्या. शिवटेकडीवर रयतेच्या राजाला मानवंदना अर्पण करण्यासाठी शिवप्रेमींची बहुसंख्येने उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज कि जय... जय भवानी, जय शिवाजी, तुमचं आमचं नातं काय.. जय जिजाऊ जय शिवराय.. अशा गगनभेदी घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता.

### सहकाऱ्यांना नेहमीच आदराने वागविणारा राजा -आ.संजय खोडके

शिव जयंती निमित्य शिवभक्तांना शुभेच्छा देतांना आ.संजय खोडके यांनी सांगितले कि, छत्रपती शिवाजी महाराज हे बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी होते. त्यांच्या विविध पैलूंचा उलगडा होत असतांना महाराजांचे सहका-याप्रती असणारा आदरही तितकाच महत्वाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व स्तरावरच्या लोकांना एकत्र आणलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांमधील नाते हे अतूट विश्वास, प्रेम, मैत्रीचे आणि निष्ठेचे होते. महाराज आपल्या मावळ्यांशी समानतेने वागत, त्यांच्या मतांना महत्त्व देत, आणि त्यांच्या कष्टांची कदर करत. महाराजांनी आपल्या नेतृत्वाने मावळ्यांना प्रेरित केले, व स्वराज्य निर्माण केले. आपण आपल्यासोबत असणाऱ्या आपल्या मित्रांचा किंवा सहकाऱ्यांचा नेहमी आदर केला पाहिजे. अशी शिकवण महाराजांच्या व्यक्तिमत्वातून मिळत असल्याचे प्रतिपादन आ. संजय खोडके यांनी केले.

# नदीत उडी घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

## -शेंदुरजना बाजार येथील घटना

तिवसा/प्रतिनिधीः-

तालुक्यातील शेंदुरजना बाजार येथील एका ५२ वर्षीय शेतकऱ्याने गावानजीक असलेल्या सूर्यगंगा नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज गुरुवारी (दि.१९) दुपारी १२वाजता दरम्यान उघडकीस आली. राजेश किसन सोनोने असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. मृत सोनोने यांच्याकडे पाच एकर शेती असून यातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होता. मात्र गेल्या तीन वर्षापासून सातत्याचीं नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे ते आर्थिक विवंचनेत होते. अश्यातच आज सकाळी ते घरच्यांना शेतात जातो म्हणून घरून निघाले.दरम्यान गावा नजीकच असलेल्या सूर्यगंगा नदीत काही शेतकऱ्यांना नदीत त्यांचा मृतदेह आढळून आल्याने या घटनेचीं माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. घटनेची माहिती महसूल विभागासह पोलीसांना देण्यात आली. यावेळी तिवसा नगरपंचायतच्या अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला असून उत्तरीस तपासणीसाठी तिवसा उपजिल्हा रुग्णालय ठेवण्यात आला आहे.मृत सोनोने यांच्या पच्छात पत्नी आणि दोन मुले आहे.



# शिवटेकडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती



अमरावती/प्रतिनिधीः-

शिवटेकडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व शाहु, फुले आंबेडकर, डॉ भाऊसाहेब देशमुख फाउंडेशन अमरावती द्वारा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस किशोर बोरकर, डॉ.बी.आर. देशमुख, ॲड.पी.एस खडसे, भैय्या साहेब निचळ,प्रा.अनिल देशमुख व समीर जवंजाळ यांनी अभिवादन केले आहे.

याप्रसंगी नवनियुक्त अमरावती शहराचे महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर भेंडे, नगरसेवक चेतन गावंडे, अविनाश मार्डीकर, सुरेखा लुंगारे,राजुजी नन्नावरे यांची सुध्दा उपस्थिती होती.

# गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील शेंदूरजना बाजार येथे एका ४८ वर्षीय इसमाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज (दि.१९) दुपारी ४.३० वाजता उघडकीस आली.

दीपक भालचंद्र भेलकर (वय ४८) असे मृतक इसमाचे नाव आहे. त्याने घरी कुणी नसल्याची संधी साधून घरात साडीने गळफास घेतला.त्यानंतर ४.३० वाजता ही घटना उघडकीस येताच तातडीने तिवसा पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली.पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून मर्ग दाखल केला आहे.त्याने आत्महत्या का केली याचे कारण समजू शकले नसून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### किल्ले अतिक्रमणमुक्त करणार

त्यामुळे पश्चिम किना-याचे रक्षण करण्यासाठी जलदुर्ग उभारण्याचे काम त्यांनी हाती घेतले. पोर्तुगीजांचा पराभव केल्यानंतर त्यांच्या कारकीर्दीत कोणत्याही आक्रमकाला समुद्रमार्गे येण्याची हिंमत झाली नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. शिवरायांचे हे नियोजन आणि धाडस आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी त्यांनी ऐतिहासिक किल्ल्यांच्या जतनाबाबत महत्त्वाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामनिर्देशित करण्यात आले असून जगातील २७ देशांनी त्यास एकमताने मान्यता दिली, याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. हा सन्मान केवळ महाराष्ट्राचा नव्हे तर संपूर्ण देशाचा गौरव आहे, असे ते म्हणाले. शिवरायांचा वारसा जगासमोर नेण्याचा हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अजित पवार यांचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, अजितदादांना शिवनेरी किल्ल्याबद्दल प्रचंड प्रेम होते. काही काळापूर्वी महाराष्ट्रातील शिवरायांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले आता अतिक्रमणमुक्त झाले आहेत, असे त्यांनी जाहीर केले. एकाही किल्ल्यावर आता अतिक्रमण नाही, असे सांगताना त्यांनी समाधान व्यक्त केले. हा निर्णय अजितदादांच्या इच्छेनुसार पूर्ण झाल्याचेही त्यांनी नमूद केले. शिवरायांच्या कार्याचा वारसा जपण्याची जबाबदारी आपली आहे, असे सांगत फडणवीस यांनी पुढील नियोजनाची झलकही दिली. २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्या निमित्ताने राज्यभर विविध उपक्रम राबवले जातील, असेही त्यांनी सांगितले. शिवनेरीवरून दिलेल्या या घोषणेमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### धनंजय मुंडे वादाच्या भोव-यात;

आणि कैलास फड तिथे हजर होते. त्यांच्या समोरच माझ्या गळ्याला बंदूक लावून मला धमकावण्यात आले, त्यामुळे मी तिथे जाणे बंद केले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. या गंभीर आरोपांनंतर धनंजय मुंडे यांचे समर्थक अविनाश नाईकवाडे यांनी आक्रमक पवित्रा घेत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. नाईकवाडे यांनी म्हटले की, धनंजय मुंडे यांचे नाव घेउन अनेक लोक आपले 'दुकान' चालवत आहेत, विनाकारण साहेबांना बदनाम करू नका. रंजना नागपूरकर यांनी पैसे दिले असतील, तर ते धनंजय मुंडे यांना दिलेले नाहीत. त्यांनी बीड ॥ येउन समोरासमोर सत्यता पडताळून पाहावी, असे आव्हानही त्यांनी दिले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी या प्रकरणाचा उल्लेख केल्याने याला आता विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. धनंजय मुंडे यांच्यावर यापूर्वीही वैयक्तिक आणि राजकीय स्वरूपाचे आरोप झाले आहेत, मात्र 'पिस्तूल रोखल्याचा' हा ताजा आरोप अधिक गंभीर मानला जात आहे.

### 'ब्लॅक बॉक्स'मधील डेटा

फ्लाईट डेटा रेकार्डरमधून मिळणार महत्त्वाचे पुरावे. तपास पथकाने विमानाच्या डिजिटल फ्लाईट डेटा रेकार्डर मधील माहिती यशस्वीरीत्या डाउनलोड केली आहे. या डेटाच्या विश्लेषणामुळे अपघाताच्या वेळी नेमकी काय स्थिती होती, हे स्पष्ट होणार आहे.

### दिल्ली-महाराष्ट्रासह २३ राज्ये-

छत्तीसगड, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्वीपमध्ये SIR जाहीर करण्यात आला. ब्लाक लेव्हल ऑफिसर आणि बूथ लेव्हल एजंट मतदारांची पडताळणी करण्यासाठी घरोघरी जातात. SIR दरम्यान, BLO/BLA मतदाराला एक फार्म देईल. मतदाराने माहितीची पडताळणी करावी. जर मतदार यादीत दोन ठिकाणी नाव असेल तर ते एका ठिकाणाहून काढून टाकावे लागेल. जर मतदार यादीतून नाव गहाळ असेल तर एक फार्म भरावा लागेल आणि संबंधित कागदपत्रे समाविष्ट करण्यासाठी द्यावी लागतील. SIR १९५१ ते २००४ पर्यंत पूर्ण झाले आहे, परंतु ते गेल्या २१ वर्षांपासून प्रलंबित आहे. या काळात, मतदार यादीत अनेक बदल आवश्यक आहेत, जसे की स्थलांतर आणि दोन मतदार याद्यांमध्ये नावे असणे. मृत्यूनंतरही नावे राहिली पाहिजेत. परदेशी नागरिकांची नावे आढळल्यास त्यांची यादीतून वगळण्यात यावी. कोणत्याही पात्र मतदाराला यादीतून वगळता कामा नये आणि कोणत्याही अपात्र मतदाराला यादीत समाविष्ट करता कामा नये.

### लोककल्याणकारी राज्यासाठी

शिवराई चलन निर्माण करून स्वतंत्र आर्थिक व्यवस्था उभी केली, धरणे-कालवे बांधले, घाटरस्ते विकसित केले आणि आरमार उभारून सामर्थ्य वाढवले.महाराज शेतक-यांवर जिवापाड प्रेम करणारे राजे होते. मावळे युद्धासाठी सीमोल्लंघन करून जात आणि अक्षय तृतीयेला परत येउन शेतीची कामे करत, अशी शेतकरी-सैनिक संकल्पना त्यांनी निर्माण केली. शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका अशी कठोर आज्ञा त्यांनी दिली होती. त्यामुळे अन्नदाता बळीराजा हा मायबाप आहे हीच भूमिका आजच्या सरकारची असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

शिवनेरी व परिसरातील जुन्नर भागाच्या सर्वांगीण विकासाला सरकार प्राधान्य देणार असून स्थानिक मागण्या गांभीर्याने विचारात घेत आवश्यक सुविधा उभारल्या जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी पर्यटन सर्किट उभारणे, स्वच्छता-संवर्धन मोहिम राबवणे आणि ऐतिहासिक वारसा जपणे यावर सरकार भर देत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गड-किल्ल्यांच्या स्वच्छता व संवर्धन मोहिमाही हाती घेतली जाणार आहे. मराठा लष्करी लँडस्केप म्हणून ११ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याचा अभिमान व्यक्तकरत त्यांनी किल्ल्यांच्या जतनासाठी व्यापक प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

स्वदेशी आणि आत्मनिर्भरता हे शिवरायांच्या राज्यकारभाराचे मुख्य तत्त्व होते. त्याच धर्तीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला आत्मनिर्भर भारताचा मंत्र देशाला महासत्ता बनविण्यासाठी उपयुक्तठरेल. महायुती सरकारने लाडकी बहीणसह विविध लोककल्याणकारी योजना राबवून महिलांना आत्मसन्मान व आत्मनिर्भरता देण्याचे काम सुरू केले आहे.

शिवरायांच्या गनिमी काव्याचा अभ्यास जगभर केला जात असून दिल्लीतील जेएनयू विद्यापीठात त्यांच्या युद्धनीतीवर अभ्यासक्रम सुरू आहे, असेही त्यांनी नमूद केले. भूगोलाची जाण, दूरदृष्टी आणि युद्धकौशल्यामुळे त्यांनी बलाढ्य शक्तींना नमवले आणि आजही त्यांचे विचार प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात. विकसित भारताच्या निर्मितीसाठी आणि भारताला महासत्ता बनवण्यासाठी शिवरायांचा आदर्श महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. आपण सर्व शिवरायांचे मावळे आहोत. प्रत्येकाने महाराजांचा किमान एक गुण अंगीकारला तर स्वाभिमानी, सुरक्षित आणि बलशाली महाराष्ट्र घडेल, असा विश्वास व्यक्त करून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना त्रिवार अभिवादन केले. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणा-यांचा सन्मान करण्यात आला आणि जय शिवरायच्या घोषणांनी शिवनेरी दुमदुमून गेला.

### कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आढळला

मृतदेह ताब्यात घेतला आणि पंचनामा केला.

भटक्या कुत्र्यांनी बालिकेचे हात आणि पाय तोडले होते. ही बालिका दोन ते तीन दिवसांची असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. हे प्रकरण भ्रूणहत्येचे असल्याचे प्रथमदर्शनी वाटत असून, हा मृतदेह कोणी आणि का फेकला, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. या घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### जिल्ह्यात १० अपघात प्रणव स्थळ

जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळाची पाहणी करण्यासंबंधी संबंधित स्टेशनचे ठाणेदार व सदर रोड ज्या विभागाच्या अंतर्गत येत असेल त्या विभागाचे उपविभागीय अभियंता यांना सोबत घेऊन अपघात प्रवण स्थळाची पाहणी करून उपाययोजना बाबत अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले होते. यावरून वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी कुऱ्हा पोलीस ठाणे हद्दीतील कौंडण्यपूर वाय पॉईंट या अपघात प्रणव स्थळाचा उपविभागीय अभियंता विनोद बोरसे, कुऱ्हाचे ठाणेदार सचिन पवार यांच्यासह निरीक्षण केले. तसेच चांदुर रेल्वे हद्दीतील अपघात प्रवणस्थळ सावंगा विठोबा फाटा, सातेफळ फाटा या स्थळाची पाहणी ठाणेदार अजय आखरे व सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता मनीषा खारीया यांच्यासह केली. वरुड राजुरा मार्गाचीही पाहणी करण्यात आली. याव्यतिरिक्त माहुली ते वरुड पर्यंत नॅशनल हायवे क्रमांक ३५३ रोडवर ब्लॅक स्पॉट व अपघात प्रवण असलेले एकूण १० स्थळावर अपघात होऊ नये याबाबत उपाययोजना करण्यासाठी पाहणी करण्यात आली. लवकरच उपायोजना बाबत निर्णय घेतला जाईल. अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहन भरधाव चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा तसेच स्ट्रीप व वळणाच्या ठिकाणी वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वाशिमच्या कॉपी प्रकरणावरून

ठाम भूमिका घेतली आहे. काहींच्या संभाव्य चुकीसाठी संपूर्ण यंत्रणेला जबाबदार धरणे म्हणजे व्यवस्थेतील मूळ त्रुटी झाकण्याचा प्रयत्न ठरू शकतो, अशी आग्रही भूमिका त्यांनी घेतली आहे.परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षण, स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आणि समन्वयाचा अभाव यावर संगीता शिंदे यांनी थेट बोट ठेवले आहे. केवळ दंडात्मक कारवाई न करता दीर्घकालीन उपाययोजना जाहिर कराव्यात, प्रशिक्षण व नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करावी, अशी सूचनाही त्यांनी शिक्षण आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

डॉ. शिंदे यांच्या प्रशासनासमोर चार ठोस मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी समितीची नियुक्ती, संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी, दोष सिद्ध झालेल्यांवरच कठोर कारवाई, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रणालीगत सुधारणा यांचा समावेश आहे.

### ११.३९ ग्रॅम एमडी ड्रग्स सह आरोपी

रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीने सदर एमडी पावडर कोणाकडून खरेदी केली, शहरात कोठून आणली याबाबत सविस्तर तपास गुन्हे शाखेमार्फत सुरू आहे. लवकरच त्यांच्यापर्यंत पोलीस पोहोचणार आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात उप निरीक्षक गजानन सोनुने, अमलदार सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, अतुल संबे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, चेतन कराळे, योगेश पवार, सुधीर गुडधे, राजेंद्र मेंढे यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

### शेतकऱ्याला काठ्यांनी व लाथाभुक्क्यांनी

शेतात जामठी शिवारातून जात होते. त्यावेळी दिलीप केचे व त्यांच्या कुटुंबीयांनी अमोल याचा रस्ता अडवून त्याला नको त्या शब्दात शिवीगाळ करून लाठीकाठी व लाथाभुक्क्यांनी मारहाण करीत असतांना अमोल जमिनीवर खाली पडला.दरम्यान त्या ठिकाणी अमोल रमेश पेठे हे सुद्धा येऊन त्यांनी सुद्धा अमोलच्या हातावर काठीने मारहाण केली.शेवटी अमोलने आपली कशीबशी सुटका करून दुसऱ्या शेतात लपून आश्रय घेतला.दरम्यान त्याने ११२ वर कॉल करून याबाबतची माहिती दिली तसेच आपले वडील महादेवराव वाघमारे यांना दूरध्वनीवरून माहिती दिली.लगेच अमोलचे वडील महादेव वाघमारे व पोलीस घटनास्थळी गेले असतांना आरोपींनी महादेव वाघमारे व अमोल वाघमारे यांना शिवीगाळ करून दोघांना जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास आरंभीला आहे.

महादेव वाघमारे यांची सालबर्डी शेत शिवारात वडिलोपार्जित शेती असून शेतात जाणे येण्यासाठी दि.१/७/ २०२२ रोजी तहसीलदार यांनी आदेश पारित केले होते.त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी दि.१९/१०/ २०२३ रोजी तोच आदेश कायम ठेवला आहे.

### शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या

देशपांडे यांना आपल्या विश्वासात घेतले. देशपांडे त्यांच्या जाळ्यात फसले आणि त्यांनी जास्त नफाच्या लालसापोटी ५ लाख २१ हजार रुपये गुंतवले. पैसे गुंतवल्यानंतर त्यांना नफा न मिळाल्याने त्यांनी आरोपींसोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्याशी संपर्क न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध तक्रारी दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस पुढील तपास करत आहेत.

### गोवंश चोरी करणारे दोघे जेरबंद

गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की सदर चोरी आरोपी आरिश पठाण (वय २१,आमनेर ) याने केली आहे. तो सध्या वरुड येथे गॅरेजवर त्याच्या ताब्यातील व गुन्हयामध्ये वापरलेले अशोक लेलॅंड गाडी क्रमांक एमएच ४९ सीडी ४३४० चे काम करण्याकरिता आला आहे. यावरून पोलिसांनी तिथे कार्यवाही करून त्याला ताब्यात घेतले. विचारपूस केली असता त्याने सदर गुन्हा त्याचे इतर तीन साथीदार सोबत मिळून केल्याची कबुली दिली. त्याचा साथीदार चेतन विनोद वानखडे (वय २५,धनोडी) याला ताब्यात घेण्यात आले. इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. आरोपींच्या ताब्यातून अशोक लिलँड कंपनीचा वाहन किं. ३ लाख रुपये, २ मोबाईल २० हजार,रोख १२,१३० रूपये असा एकूण ३ लाख ३२ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालसह वरुड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद अप्पर अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक नितीन इंगोले, हेड कॉन्स्टेबल सुनील महात्मे , सय्यद अजमत, स्वप्नील तंवर, चेतन दुबे, मनोज घवळे, सायबर सेलचे सागर धापड, अश्विन मानकर, रितेश गोस्वामी, विकास अंजीर, शिवा शिरसाट यांनी केली.

### दर्यापूरात जनसंवाद कार्यक्रमात

खुला संवाद साधता यावा आणि स्थानिक अडचणीचा मार्ग काढता यावा या उद्देशाने हा उपक्रम राबविल्या गेला का? मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या ज्वलंत समस्या बाजूला पडल्या आणि पत्रकारांनाही संवादातून दूर ठेवण्यात आल्याची खंत व्यक्त होत आहे. महसूल विभागाच्या कारभारावर शेत जमिनीचे फेरफार, सातबारा उतारे जमिन मोजणी वारसा नोंदी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान याची भरपाई अशा अनेक महत्त्वाच्या विषयाचा थेट परिणाम होत असतो. त्यामुळे जनसंवाद हा केवळ भाषण बाजीचा मंच न राहता तो लोकांच्या तक्रारीचे निराकरण करणारा प्रभावी मार्ग ठरावा अशी अपेक्षा असते.

परंतु दर्यापूर येथे आयोजित कार्यक्रमात ठराविक विषयापुरताच संवाद मर्यादित ठेवण्यात आल्याचे दिसून आले. अनेक नागरिकांनी आपली समस्या मांडण्यासाठी हात वर केले अर्ज सादर केले तरीही त्यांना संधी मिळाली नाही.त्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. लोकशाही व्यवस्थेत प्रशासन आणि प्रसार माध्यमे यांचे नाते परस्पर पूरक असते. पत्रकारांना दूर ठेवून पारदर्शकतेचा संदेश कसा जाईल? माध्यमांच्या उपस्थितीतच प्रशासनाची उत्तरदायित्वाची जाणीव अधिक ठळक असते. पत्रकारांना प्रश्न विचारण्याची संधीही दिली नाही. किंवा कार्यक्रमाची माहिती दिली नाही हे जनतेच्या माहितीच्या अधिकारालाच बाधा ठरू शकते.

जनसंवाद म्हणजे दोन पक्षीय प्रक्रिया.एकतर्फी निवेदन नव्हे. स्थानिक नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे व त्यावर ठोस काल मर्यादा जाहीर करणे आणि तसेच अंमलबजावणीचा आढावा घेणे हीच खरी जनसंवादाची व्याख्या आहे. अन्यथा अशा उपक्रमाची नोंद केवळ अहवालापुरती राहील व जनतेत प्रशासनाबद्दल चा अविश्वास वाढेल हे मात्र निश्चितच. यापुढे महसूल विभागाने कार्यक्रम अधिक खुल्या पारदर्शक आणि उत्तरदायी पद्धतीने आयोजित करावा,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ट्रक-बैलबंडीच्या धडकेत दोघे

ट्रक शेतात घुसला आणि इलेक्ट्रिक पोलला भिडला. यामध्ये इलेक्ट्रिक पोल तुटून पडला. घटनेची माहिती प्रहार जनशक्ती पार्टीचे छोटू महाराज वसु यांना मिळताच ते घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मित्रांच्या मदतीने प्रवीण आणि अक्षयला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे , तर दुसरीकडे या अपघातात दोन्ही बैलही जखमी झाले आहे. त्यांनाही पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखविण्यात आले. बैलांची प्रकृतीही गंभीर असल्याचे समजते. नितीन शिरभाते, आकाश गजभिये, प्रशांत शिरभाते, इमरान शाह, बबलू पठाण हे सुद्धा जखमींच्या मदतीसाठी धावले.

### जय भवानी, जय शिवाजीच्या

करण्यात आली. दीपप्रज्वलन करून आणि शिवगर्जना देत मिरवणुकीचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे सदस्य . हेमंतदादा काळमेघ, प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.यानंतर भव्य मिरवणूक मोठ्या जल्लोषात काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालावर आणि भगव्या पताकांच्या फडक्यात परिसर अक्षरशः भारावून गेला होता. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत शिवकालीन परंपरा जिवंत केल्याचा अनुभव दिला. काही विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, जिजाऊ माता, मावळे यांची वेशभूषा परिधान करून इतिहासाचे सजीव दर्शन घडवले.

मिरवणुकीदरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेले मर्दानी खेळ, लाठी-काठीचे थरारक प्रयोग, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक आणि पारंपरिक युद्धकौशल्याचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. या प्रात्यक्षिकांमधून शिवकालीन शौर्य आणि पराक्रमाचे दर्शन घडले.

प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतात शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा आजच्या काळातील संदर्भ स्पष्ट केला. 'शिवरायांनी स्वराज्य स्थापन करताना न्याय, समानता, स्त्रीसन्मान आणि लोककल्याण यांना सर्वोच्च स्थान दिले. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या ध्येयधोरणांचा अभ्यास करून समाजहितासाठी कार्य केले पाहिजे,' असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना केवळ उत्सव साजरा न करता शिवरायांच्या विचारांचे आचरण जीवनात उतरवण्याचे आवाहन करून दिलीप बापू इंगोले यांनी आपल्या उद्घाटन भाषणातून शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत तरुणाईने राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश दिला. संपूर्ण कार्यक्रम शिस्त, समन्वय आणि उत्साह यांचे उत्तम दर्शन असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आजपासून सुरू होणाऱ्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले असे जाहीर करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य हेमंतदादा काळमेघ यांनी सांगितले की शिवजयंती उत्सव हा केवळ ऐतिहासिक स्मरणाचा दिवस नसून स्वाभिमान, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा सोहळा आहे. शिवरायांच्या विचारांची ज्योत तरुणांच्या मनात प्रज्वलित ठेवण्याचा आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संदेश या उत्सवातून दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयाची शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याची भावना नागरिक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन अंजली इंगळे व आभार प्रदर्शन प्रफुल्ल घवळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शिवजयंती उत्सव समितीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या छत्रपती श्री.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार अर्पण केल्यानंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com



# पोलीस लॉनवर येणार आता कंत्राटदाराची मक्तेदारी ?

## प्रक्रियेत गैरप्रकारांचा संशय; एसपींचीही दिशाभूल होत असल्याची चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

**पोलीस कल्याण निधी अंतर्गत उभारण्यात आलेली 'राणी महल' इमारत आणि पोलीस लॉन्स पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. संपूर्ण लॉन्स व इमारतीच्या बुकिंगचे अधिकार एका कंत्राटदाराकडे देण्याची हालचाल सुरू असल्याची खात्रीलायक माहिती पुढे आली असून, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप होत आहे.**

पोलीस अधीक्षक कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांशी अर्थपूर्ण संधान साधत एका विशिष्ट कंत्राटदाराला सर्वेसर्वा बनवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची कुजबुज पोलीस वर्तुळात आहे. या संदर्भात शासनाकडून कोणत्याही स्पष्ट मार्गदर्शक सूचना मागविण्यात आल्या नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करूनच हा निर्णय पुढे नेला जातोय का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पोलीस कल्याण निधीत अधिकाधिक उत्पन्न जमा व्हावे, यासाठी खुली व पारदर्शक निविदा प्रक्रिया अपेक्षित असताना हालचाली मात्र गुपचूप सुरू असल्याचे चित्र आहे. निकोप स्पर्धेला संधी देण्याऐवजी ठराविक कंत्राटदाराला संपूर्ण बुकिंगचे अधिकार देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आल्याची माहिती आहे.



याआधी संबंधित कंत्राटदाराकडे केटरिंग व तत्सम सेवा पुरविण्याचे कंत्राट होते; मात्र लॉन्सची थेट बुकिंग करण्याचा अधिकार कधीच देण्यात आलेला नव्हता. आता मात्र इमारत आणि लॉन्सच्या सर्व बुकिंग अधिकारांसह व्यवस्थापन देण्याची तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाचे नियंत्रण कमी होऊन कंत्राटदाराला प्रचंड आर्थिक लाभ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**थकबाकी वसुलीवर मौन?**

मागील कंत्राटदाराकडे लाखो रुपयांची थकबाकी असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र त्या रकमेची वसुली संथ गतीने सुरू असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. थकबाकी वसुलीचा प्रश्न प्रलंबित असताना नव्या अधिकारांचे वाटप का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**असोसिएशनची नाराजी**

अकोला केटरिंग अँड डेकोरेशन असोसिएशनच्या काही पदाधिकाऱ्यांनीही या घडामोडींवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पारदर्शक प्रक्रिया राबविण्याची मागणी करत वरिष्ठ पातळीवर तक्रार करण्याची तयारी काही जणांनी सुरू केल्याचे कळते.

**शासनाची मालमत्ता, तरीही निर्णय 'मनमानी'?**

सदर लॉन्स व 'राणी महल' ही इमारत शासनाच्या मालकीची असून, पोलीस प्रशासनाकडे केवळ देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. असे असताना सर्व अधिकार कंत्राटदाराकडे देण्याची तयारी म्हणजे अधिकारांचा अतिरेक तर नाही ना, अशी चर्चा आहे.

पोलीस कल्याण निधीच्या नावाखाली कंत्राटदाराच्या तिजोरीत भर टाकण्याचा प्रकार तर नाही ना, असा थेट सवाल आता पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये उपस्थित होत आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे जाहीर करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेने दणाणले वाशिम शहर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मेरा युवा भारत केंद्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेत जय शिवाजी जय भवानी घोषणांनी शहराचा परिसर दुमदुमून सोडत देशभक्ती, सामाजिक ऐक्य आणि प्रेरणादायी संदेश देणारी भव्य पदयात्रा उत्साहात पार पडली. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला प्रारंभ करण्यात आला.**



## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा

यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, एनसीसी अधिकारी अमोल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत देशभक्तीची भावना जपण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांचा उत्साह, आकर्षक वेशभूषा आणि शिस्तबद्ध संचलनामुळे नागरिकांचे विशेष लक्ष वेधले गेले.

पदयात्रेचे विशेष आकर्षण ठरले ते एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित गीत व पथनाट्य. या सादरीकरणातून स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांना दाद दिली.

या पदयात्रेत राष्ट्रीय छत्र सेनेचे विद्यार्थी, गुणवंत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थी, स्काऊट गाईड्स तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींच्या शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. हातात देशभक्तीपर फलक, घोषवाक्ये आणि पारंपरिक वेशभूषेमुळे पदयात्रेला विशेष रंगत आली. सुरुवातीला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# तालुक्यात मालेगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मालेगाव शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध शाळा, सामाजिक संस्था, मंडळे व नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते.

सकाळी शिवप्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम, लाठी-काठी, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक तसेच शिवकालीन वेषभूषा साकारलेल्या विद्यार्थी व युवक-युवतींचा सहभाग लक्षवेधी ठरला. अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत सहभाग नोंदवून वातावरणात देशभक्तीची भावना जागृत केली.

शोभायात्रेने शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूकीने नागरिकांचे लक्ष वेधले. मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून शिवभक्तांनी स्वागत केले.

# कारंजा येथे 'मिनी सरस प्रदर्शन- २०२६'चे आयोजन

## महिला बचत गटांच्या उत्पादनांची भव्य प्रदर्शनी व विक्री

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिला स्वावलंबनाचे उद्दिष्ट समोर ठेऊन आणि स्थानिक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणारी जिल्हास्तरीय मिनी सरस प्रदर्शनी व विक्रीचा उपक्रम दि. २३ फेब्रुवारी पासुन कारंजा येथे 'वऱ्हाडी जत्रा' नावाने आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत धाबेकर सांस्कृतिक सभागृह, अमरावती रोड, कारंजा लाड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेले खाद्यपदार्थ, मसाले, पापड-लोणची, हस्तकला, सजावटीच्या वस्तू, कापडी साहित्य आदींची प्रदर्शनी व विक्री होणार आहे.

दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता या मिनी सरस प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ होणार असून उद्घाटन दत्तात्रय भरणे, मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, वाशिम यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, भावना गवळी (सदस्य, विधान परिषद), किरण सरनाईक (सदस्य, विधान परिषद), वसंत खंडेलवाल (सदस्य, विधान परिषद), धिरज लिंगाडे (सदस्य, विधान परिषद), धर्मगुरु बाबूसिंग महाराज राठोड (सदस्य, विधान परिषद), अमित झनक (सदस्य, विधानसभा), श्याम खोडे (सदस्य, विधानसभा) तसेच सईताई डहाके (सदस्य, विधानसभा) उपस्थित राहणार आहेत. विशेष निमंत्रित म्हणून योगेश कुंभेजकर (जिल्हाधिकारी, वाशिम) व अनुज तारे (पोलीस अधीक्षक, वाशिम) यांची उपस्थिती राहणार आहे. दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत प्रदर्शनी व विक्री आयोजित करण्यात आली असून सायंकाळी ४ वाजता सत्कार व निरोप समारंभ होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी अर्पित चौहान (प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम) राहतील. कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. चे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी केले आहे.

**वऱ्हाडी खाद्य पदाभार्थांचे विशेष आकर्षण**

या प्रदर्शनिचे विशेष आकर्षण म्हणजे पाचही दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनिमध्ये कारंजावासीयांना विविध खाद्य पदर्थांची मेजवानी मिळणार आहे. यासाठी यामध्ये फुड कोर्ट नावाने स्वतंत्र दालन तयार करण्यात आले आहे.

# श्री पाळेश्वर महादेव देवस्थान येथे भव्य महाप्रसाद पंगत उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भक्तांसाठी श्री पाळेश्वर महादेव देवस्थान येथे भव्य महाप्रसाद पंगतीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंदिर परिसरात अत्यंत भक्तिमय व उत्साही वातावरण पाहायला मिळाले.

सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पुरुष, महिला तसेच लहान मुलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. पंगतीत सर्वांनी एकत्र बसून भोजनाचा आस्वाद घेतला आणि भक्तिभावाने सहभाग नोंदविला. 'बम भोले', 'जय भोले', 'पाळेश्वर भगवान की जय' या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. भजन, पूजन व आरतीमुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मंदिराच्या विश्वस्त मंडळांनी समाधान व्यक्त केले. तसेच उपस्थित सर्व भाविक भक्तांचे मनःपूर्वक आभार मानून महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या सहकार्यामुळे हा धार्मिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.

# अकोल्यात एक लाख कुटुंबांना 'स्वास्थ्य सेवा कार्ड'चा दिलासा



## जन अभियान फाउंडेशन व आरोग्य सेवा फाउंडेशनचा उपक्रम; उपचार खर्चात सवलत, जनजागृतीवर भर

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील तब्बल एक लाख कुटुंबांना मोफत 'स्वास्थ्य सेवा कार्ड' देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम जन अभियान फाउंडेशन व आरोग्य सेवा फाउंडेशनतर्फे हाती घेण्यात आला आहे. 'जागरूकता हीच निरोगी राहण्याची गुरुकिल्ली' या ब्रीदवाक्याखाली राबविण्यात येणाऱ्या या योजनेचे लोकार्पण शासकीय विश्रामगृह येथे पार पडले.

आजारी पडल्यानंतर तातडीने उपचार न घेता आजार अंगावर काढण्याची प्रवृत्ती अनेकांमध्ये दिसून येते. परिणामी आजार बळावतो, निदान उशिरा होते आणि उपचार खर्च वाढतो. ही बाब लक्षात घेऊन दोन्ही फाउंडेशनतर्फे प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी व जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. जिल्हाभर विविध आरोग्य शिबिरे आयोजित करून नागरिकांना मोफत 'स्वास्थ्य सेवा कार्ड' वितरित करण्यात येणार आहे.

या कार्डमुळे जिल्हा व तालुका स्तरावरील सहभागी खाजगी डॉक्टर, लॅबोरेटरी आणि मेडिकल दुकानदारांकडून बिलामध्ये सवलत मिळणार आहे. तसेच शासकीय वैद्यकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची फाईल तयार करण्यासही मार्गदर्शन केले जाणार आहे. शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत तसेच गावोगावी वस्ती-पाड्यांवर प्राथमिक तपासणी व आरोग्य मार्गदर्शन शिबिरे घेतली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

उपक्रमाच्या लोकार्पणप्रसंगी जन अभियान फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश देशमुख, संयोजिका पूजा काळे, विनायकराव पवार, अशोक पटोकार, प्रशांत शेवतकर, मायाताई इरतकार, संजय देशमुख, राम मुळे, सोनाली मोरे, प्रदीप खाडे, शिवाजी भोसले, नरेश टमटमकर, गुलाम रीझवी, आसिफ शेख राजा खान, के. एम. देशमुख, डॉ. विवेक अंभोरे, डॉ. कोमल अंभोरे आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी डॉ. उमेश गडपाल, डॉ. परमेश्वर जुनारे पाटील, डॉ. अजय वानखडे, डॉ. मोहम्मद अयान, डॉ. सचिन गडेकर, डॉ. सुमित तुळजापुरे, डॉ. जैद शेख, डॉ. अभिजीत पल्हाडे, हाजी सय्यद एजाज, डॉ. सौरभ सराफ, डॉ. मदन महल्ले, डॉ. तुषार मोरे, डॉ. राम देवळे, डॉ. प्रतिक लढ्ढा यांचे सहकार्य लाभणार आहे.

**येथे उपलब्ध होणार कार्ड**

स्वास्थ्य सेवा कार्ड मिळविण्यासाठी इच्छुकांनी दैनिक जनयात्रा, शॉप नं. ७, दुसरा माळा, जीएमडी मार्केट ते रणपिसे नगर चौक रोड, सिग्मा कॉम्प्युटर, सिव्हिल लाईन ते जवाहर नगर रोड, रणपिसे नगर चौक येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ९२२६२२०५६१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संचालिका पूजा काळे यांनी केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आदर्श ग्राम वनोजा येथे मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील आदर्श ग्राम वनोजा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक वेशभूषा धारण करून गावातून भव्य रॅली काढली. यावेळी 'शिवाजी महाराज की जय' अशा जयघोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले.


रॅलीनंतर गावातील मुख्य चौकात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य स्मारकापुढे पूजन करून नमन करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर शाळेत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कला गुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. भाषणे, देशभक्तीपर गीते आणि नृत्य सादर करत विद्यार्थ्यांनी आपल्या राज्याविषयी असलेले प्रेम, अभिमान आणि निष्ठा यांची जाणीव उपस्थितांना करून दिली.

# कानिफनाथ महाराजांच्या भव्य यात्रोत्सवाने चैतन्याची होणार निर्मिती

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

श्री क्षेत्र सावरगाव कान्होबा या नावाने तालुकाच नव्हे तर वाशीम आणि आजूबाजूच्या जिल्ह्याच्या नागरिकांच्या आस्थेचे प्रतीक असलेल्या व नवनाथांपैकी एक असलेल्या चैतन्य कानिफनाथ महाराजांचा भव्य यात्रा महोत्सव यावर्षी संस्थानाच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून साजरे करण्यात येत आहे.

कानिफनाथ महाराजांच्या यात्रेचे हे १५३ वे वर्ष आहे. येत्या २१ तारखेपासून तर पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत पर्यंत नवनाथ कथा (भागवत सप्ताह), अखंड हरिनाम, प्रवचन, भजन, कीर्तन,काकडा इत्यादी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल या दोन आठवड्या दरम्यान मंदिर परिसरात राहणार आहे. २१ फेब्रुवारी पासून २७ फेब्रुवारी पर्यंत नवनाथांच्या ४० अध्यायांचे वाचन प्रल्हाद महाराज जणूना (सोनवळ) यांच्या सुमधुर वाणीतून भक्तांसाठी होणार असून



## १५३ व्या यात्रोत्सवानिमित्त भागवत सप्ताहाचे आयोजन


सप्ताहाची सांगता रात्री १२ वाजता होऊन याचवेळी काठीची प्रथम भेट होणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रातःकाळी महापूजा व होम विधीचे आयोजन श्री योगीसिद्ध शांतिनाथ महाराज पंढरपूर व श्री धनराज भारती महाराज मुख्य पुजारी अनुसया माता मंदिर माहूर यांच्या संयुक्त हस्ते मंदिरात करण्यात आले आहे.

हभप रामेश्वर महाराज काजळंबा यांचे सकाळी नऊ वाजता काल्याचे किर्तन होणार आहे. २८ फेब्रुवारीला रोजी सकाळी १० ते ५ वाजताच्या दरम्यान रांगेत बारीमध्ये ग्रामस्थ आणि भक्तगणांच्या उपस्थितीत महाप्रसादाचा वाटप करण्यात येणार आहे.

सावरगांव येथे कानिफनाथ महाराजांचे गडावर पुरातन मंदिर असून, निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या ह्या मंदिरावर दरवर्षी हजारो श्रध्दाळू मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात.

यावर्षी १५३ व्या यात्रा महोत्सवा निमित्य आयोजित धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा लाभ चैतन्य कान्होबाच्या भक्तांनी घेण्याचे आवाहन संस्थानचे विश्वस्त राजेंद्र पाटील राऊत यांनी ग्रामस्थांच्या वतीने केले आहे.

# श्रींच्या प्रगट दिनानिमीत्त महाप्रसादाचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री संत गजानन महाराज चरण पादुका मंदीर गुरुवार, बाजार वाशीम च्या वतीने श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमीत्त २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख उपस्थिती प.पु. विजयप्रकाश दायमा महाराज, भागवताचार्य सागर महाराज पारीसकर, भागवताचार्य नामदेव महाराज काकडे, खा. संजय देशमुख, आ. श्याम खोडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, वाशीम शहर पोस्टे निरीक्षक संजय चौधरी, नप मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नप उपाध्यक्ष राजु भांदूर्गे, भाजपा नेते राजू पाटील राजे, गिरधारीलाल सारडा, लक्ष्मण इंगोले, पवन डांवर, गजानन लांडगे आदीं उपस्थिती लाभणार आहे.

# अवैध सावकारी प्रकरणी झडती

## वाशिम तालुक्यातील तीन ठिकाणी सहकार व पोलिस विभागाची संयुक्त कारवाई



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सहकार विभाग यांच्याकडे प्राप्त झालेल्या वाशिम तालुक्यातील अवैध सावकारी व्यवहारासंबंधीच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत झडतीची कार्यवाही करण्यात आली.

या कारवाईत गैरअर्जदार अनिल मुरलीधर मोरे यांचे चिखली घुले येथील निवासस्थान व सावरगाव बर्ड येथील फार्म हाऊस तसेच साहेबजी नारंग, जवाहर कॉलनी, जुनी आय.यु.डी.पी., वाशिम येथील निवासस्थानी सहकार विभाग व पोलिस विभागाच्या पथकाद्वारे दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी झडती घेण्यात आली.

झडती कार्यवाहीदरम्यान पुढील चौकशीसाठी काही महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून सदर प्रकरणी सावकारी कायद्यान्वये पुढील तपास सुरू आहे.

ही संपूर्ण कार्यवाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक अनुज तारे तसेच अमरावती विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. सदर कार्यवाहीमध्ये सहायक निबंधक (प्रशासन), अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम आर. आर. सावंत, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मालेगाव आर. व्ही. आकुलवार, सहायक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम एम. डी. कच्छवे यांच्यासह सहकार विभाग, पोलिस विभाग व कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवैध सावकारी व्यवहार करणाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण व कार्यवाही करण्यासाठी त्यांनी सहकार विभागाचे जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम तसेच प्रत्येक तालुक्यातील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात तक्रारी दाखल कराव्यात.

तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. असे आवाहन सहायक निबंधक (प्रशासन) अंतर्गत सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक आर. आर. सावंत यांनी केले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८५ ■ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## महाराज मुजरा स्वीकारा

# शिवजयंतीनिमित्त शहरभर शिवजागर

**वर्धा जनमाध्यम :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त वर्धा शहरात उत्सवाचा माहोल तरळत दिसला. शहरभर विविध सरकारी, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांनी उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन केले. रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे आणि विद्यापीठ परिसरे 'शिवजागर' मोहिमेच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराने गुंजत राहिले. या पार्श्वभूमीवर महाराज मुजरा कार्यक्रमाने उपस्थितांचा उत्साह शिखरावर पोहोचवला.

शिवजयंतीच्या पहाटेच जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, तहसीलदार अनिकेत सोनवणे, नायब तहसीलदार अतुल रासपायले, नाझर श्री. नवले आणि मारोती जायभाये यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. विद्यापीठाचे अधिकारी, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी व हिंदी विभागांच्या सांस्कृतिक सादरीकरणात महाराजांच्या आदर्श जीवनावर आधारित नाट्य, गीत आणि महाराज मुजरा प्रदर्शनाने उपस्थितांचा उत्साह द्विगुणित केला.

शहरभर सामाजिक, सांस्कृतिक आणि विद्यार्थी संघटनांनी शिवजागर मोहिमेअंतर्गत रस्ते, चौक आणि सार्वजनिक स्थळांवर छत्रपती शिवरायांचा जयजयकार करत कार्यक्रमांचे आयोजन केले. महिला, विद्यार्थी, समाजसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मोहिमेत महाराजांच्या आदर्श विचारांचा संदेश, स्वराज्य स्थापनेची कहाणी आणि महाराज मुजरा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने देखील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यक्ष राजेश खडसे, महासचिव शारदाताई झामरे आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. समितीने युवकांमध्ये छत्रपती शिवराय, महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठरवले.

वर्धा शहरातील छत्रपती सेना पदाधिकाऱ्यांनी देखील छत्रपती शिवरायांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संस्थापक अध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांच्या हस्ते महाराज मुजरा प्रदर्शन झाले, ज्यामुळे उपस्थितांचा उत्साह शिखरावर पोहोचला. संघटनेने समाजहितासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त करत महाराजांच्या आदर्श विचारांवर आधारित संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

शिवजयंतीच्या सर्व कार्यक्रमांना नागरिक, विद्यार्थी, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवजागर मोहिमेने संपूर्ण शहर छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराने गुंजले, तर महाराज मुजरा कार्यक्रमाने उत्सवाला सांस्कृतिक उंची दिली. या कार्यक्रमांतून युवकांमध्ये स्वराज्य स्थापनेच्या तत्वज्ञानाचा, न्याय, समानता आणि वीरतेचा संदेश पोहोचविण्यावर भर देण्यात आला.एकूणच, वर्ध्यातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाने औपचारिक अभिवादन, सांस्कृतिक प्रदर्शन, सामाजिक मोहिमांद्वारे शहरभर आनंद, उत्साह आणि प्रेरणा पसरवली, तर महाराज मुजरा व शिवजागर मोहिमेने या उत्सवाचे ठळक वैशिष्ट्य ठरवले.

# आजपासून ७३ केंद्रांवर दहावीची परीक्षा

## -१५,६३० विद्यार्थी बसणार परीक्षेला

### -६ भरारी पथकांची नजर, पोलिस बंदोबस्त तैनात

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणारी दहावीची लेखी परीक्षा आज, शुक्रवार २० फेब्रुवारीपासून जिल्ह्यात सुरू होत आहे. एकूण १५ हजार ६३० विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रवेशीत असून जिल्ह्यातील ७३ परीक्षा केंद्रांवरून परीक्षा पार पडणार आहे. कॉपीमुक्त, पारदर्शक व सुरळीत वातावरणात परीक्षा व्हावी यासाठी शिक्षण विभागाने सर्व तयारी पूर्ण केली आहे.


याआधी १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. दहावीची परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा मानली जाते. पुढील शाखा निवड, महाविद्यालयीन प्रवेश आणि करिअरच्या दृष्टीने ही परीक्षा निर्णायक ठरते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि ताणाचे मिश्र वातावरण आहे.

**भरारी पथकांकडून आकस्मिक तपासणी-** परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी शिक्षण विभागाने सहा भरारी पथके नियुक्त केली आहेत. ही पथके परीक्षा कालावधीत विविध केंद्रांवर अचानक भेटी देऊन तपासणी करणार आहेत. प्रश्नपत्रिकांची सुरक्षित वाहतूक, वितरण, तसेच उत्तरपत्रिकांच्या संकलनाची प्रक्रिया यावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

संवेदनशील केंद्रांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली असून त्या केंद्रांवर अतिरिक्त दक्षता घेतली जाणार आहे. केंद्रप्रमुखांना नियमावलीचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**सुविधा आणि बंदोबस्त**

विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहांची, बसण्याची तसेच वीजपुरवठ्याची



व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील केंद्रांवरही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**नियंत्रण समितीची देखरेख**

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत उद्भवणाऱ्या कोणत्याही तक्रारी, अडचणी किंवा आपत्कालीन परिस्थितीवर तत्काळ निर्णय घेण्यासाठी ही समिती कार्यरत राहणार आहे. एकूणच, ७३ केंद्रांवर आजपासून सुरू होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी प्रशासन सज्ज झाले असून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# नऊ महिन्यांनंतर 'मुलगी' परतली घरी; ऑपरेशन मुस्कानने दिला आयुष्याला दिलासा

## अल्पवयीनची सुटका; हिंगणघाट पोलिसांच्या चिकाटीला यश

**वर्धा । हिंगणघाट जनमाध्यम :** घरातून निघालेली १४ वर्षांची चिमुकली आणि तिच्या प्रतिक्षेत डोळ्यांत आसवे साठवून बसलेले आई-वडील तब्बल नऊ महिन्यांच्या वेदनादायी प्रतिक्षेनंतर अखेर त्या कुटुंबाच्या आयुष्यात हसू परतले. ऑपरेशन मुस्कान अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने तेलंगणातील आदिलाबाद येथून अल्पवयीन मुलीची सुरक्षित सुटका केली.

नऊ महिन्यांपूर्वी अज्ञात व्यक्तीने फूस लावून मुलीला पळवून नेल्याची तक्रार कुटुंबीयांनी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे नोंदवली होती. त्या दिवसापासून कुटुंबीयांसाठी प्रत्येक दिवस काळरात्र ठरत होता. कुठे असेल कशी असेल या प्रश्नांनी घरातील वातावरण अस्वस्थ झाले होते.



तपासाची सूत्रे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे गेल्यानंतर पोलिसांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने माहिती संकलित केली. संशयिताचा माग काढत पथकाने थेट आदिलाबाद गाठले. तेथे बळवंत काशिराम कुडमेते (वय २१, रा. नांदगाव बोरगाव झोपडपट्टी, हिंगणघाट) याला ताब्यात घेत चौकशी केली असता मुलीचा ठावठिकाणा लागला. पोलिसांनी तत्काळ मुलीची सुटका करून तिला सुरक्षित ताब्यात घेतले.

मुलगी सुखरूप परतल्याची बातमी समजताच कुटुंबीयांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. नऊ महिन्यांची वेदना एका क्षणात विरघळल्यासारखी झाली. पोलिसांच्या प्रयत्नांमुळे एका कुटुंबाचे तुटलेले आयुष्य पुन्हा जुळले.ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सुभाष राऊत, दिवाकर परिमल, खुशालपंत राठोड, नितेश मेश्राम, अलका कुभंलवार, नवनाथ मुंडे, अक्षय राऊत, गोविंद मुंडे व मिना कौरती यांनी प्रत्यक्ष मोहिमेत सहभाग घेतला.

ऑपरेशन मुस्कान केवळ एक मोहीम नाही, तर हरवलेल्या चेहऱ्यांवर पुन्हा हास्य फुलवण्याचा प्रयत्न आहे. या यशस्वी कारवाईने पोलिसांच्या संवेदनशीलतेची आणि चिकाटीची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

# वाघाडी पुलावर भीषण अपघात; ट्रकच्या धडकेत कार चकनाचूर

## राष्ट्रीय महामार्ग ४४ वर थरारक प्रसंग; दैव बलवत्तर म्हणून दोघे प्रवासी बचावले

**समुद्रपूर जनमाध्यम :** नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील शेडगाव चौकाजवळील वाघाडी नदीच्या पुलावर गुरुवारी सायंकाळी घडलेल्या भीषण अपघाताने काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. भरधाव ट्रकने मागून दिलेल्या जबर धडकेत कार अक्षरशः ट्रक आणि पुलाच्या भिंतीमध्ये अडकून चकनाचूर झाली. अपघाताचे स्वरूप पाहता जीवितहानीची भीती व्यक्त होत असतानाच, कारमधील दोघे प्रवासी दैव बलवत्तर म्हणून सुखरूप बचावल्याने मोठा अनर्थ टळला.




मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील प्रमोद शांतीलाल बोरा आणि पवन प्रकाश संचेती हे एमएच-३१ एफई-४१४८ क्रमांकाच्या कारने नागपूरकडे जात होते. सायंकाळी सुमारे चारच्या सुमारास वाघाडी नदीच्या पुलावर पोहोचताच एचएच-४० सीएम-५६०८ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या कारला मागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की कार पुढे जाऊन पुलाच्या कठड्यात अडकली आणि ट्रकच्या दाबामुळे पूर्णपणे चिरडली गेली.

अपघातानंतर दोघेही कारमध्ये अडकून पडले होते. घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिस तसेच जाम महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ठाणेदार रविंद्र रेवतकर, पोलिस उपनिरीक्षक चेतन टेंभुर्णे, प्रभारी पोलिस निरीक्षक दिलीप थाटे, उपनिरीक्षक भय्याजी तोडासे आणि पोलिस कर्मचाऱ्यांनी बचावकार्य हाती घेत कारमधील दोघांना सुरक्षित बाहेर काढले. सुदैवाने दोघांनाही कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही.

अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या कडेला हलवून वाहतूक सुरळीत केली. या प्रकरणाची नोंद समुद्रपूर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास समुद्रपूर पोलीस करीत आहे.

# संविधान जनजागृती उपक्रमात न्या. एम. एस. जावळकर यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

## -महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचा पुढाकार



**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ?ड धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून राज्यभर राबविण्यात येत असलेल्या संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधानाबद्दल सखोल ज्ञान, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा राज्यव्यापी उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रशिक्षण महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील डॉ.कैलास वसावे, डॉ.दिविता कोठेकर, डॉ.आरती तायडे, डॉ.व्ही.पी.तिवारी तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई येथील डॉ.जगदीश खोब्रागडे, डॉ.साहिली सुरजुसे व डॉ.अमोल चौव्हाण यांच्या मार्फत प्रभावीपणे दिले जात आहे.

या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील अतिरिक्त न्यायाधीश एम.एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी उत्तरे दिली.

सदर विशेष सत्रात न्या. आर. सी. चौव्हाण, न्या. पृथ्वीराज चौव्हाण, माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी समाजकल्याण आयुक्त इ. झेड. खोब्रागडे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाल थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ.जगदीश खोब्रागडे, डॉ.साहिली सुरजुसे व डॉ.आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. राज्यातील विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत या उपक्रमास अधिक प्रभावी बनविले.

संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ हा उपक्रम केवळ स्पर्धा नसून संविधान मूल्यांची जपणूक, जागरूक नागरिकत्वाची जाणीव आणि लोकशाही बळकटीसाठीची एक प्रेरणादायी चळवळ ठरत आहे. राज्यातील युवक-युवतींमध्ये संविधानाबद्दल अभिमान व जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच मैलाचा दगड ठरत आहे.

# खेळाडूपणातून समाजसेवेपर्यंत: नरेंद्र घोडमारे यांची प्रेरणादायी वाटचाल

## -रक्तदानाचा २३ वा टप्पा; समाजहितासाठी अखंड ध्यास

**वर्धा, जनमाध्यम :** १९९४ ते २००३ दरम्यान हॉकी, फुटबॉल आणि क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे नरेंद्र घोडमारे आजही एमएसईबीकडून क्रिकेट खेळतात. मैदानावरील त्याची जिद्द, शिस्त आणि चिकाटी आजही तितकीच ताजी आहे. मात्र, खेळापलीकडे त्याची खरी ओळख घडली ती समाजसेवेच्या कार्यातून.

सेवाग्राम-वरुड (रेल्वे) परिसरातील सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र घोडमारे यांनी नुकतेच आपले २३ वे रक्तदान पूर्ण केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त द हेल्पिंग हॅन्ड फॅमिली, वरुड रेल्वे तर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले, ज्यात नरेंद्र घोडमारे यांनी सहभाग घेत समाजसेवेचा दीप उजळवला.




या रक्तदान शिबिरामुळे परिसरात त्यांचे विशेष कौतुक होत आहे. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून त्यांनी आतापर्यंत २३ वेळा रक्तदान करून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे.

रक्तदानाबरोबरच ते सेवाग्राम रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना मदतीचा हात देतात. दूरवरून येणाऱ्या रुग्णांचे मार्गदर्शन करणे, औषधोपचारासाठी सहकार्य करणे आणि रक्ताची तातडीची गरज भासल्यास दाते उपलब्ध करून देणे अशा विविध कामे ते निःस्वार्थ भावनेने करत असतात.

रक्तदानामुळे एखाद्याचे प्राण वाचत असतील, तर त्यापेक्षा मोठे समाधान नाही. समाजासाठी काही करण्याची संधी मिळते, हे माझे भाग्य, असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले.वरुड, सेवाग्राम व मसाळा परिसरातील नागरिकांसह विविध सामाजिक संघटनांनी त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. खेळाडू म्हणून घडलेला हा अवलिया आज समाजसेवेतही तितक्याच ताकदीने धावतो आहे.

# मोबाईलच्या नादात १२ वर्षीय मुलगा घरुन बेपत्ता

**वर्धा जनमाध्यम :** मोबाईल पाहू नको असे आईने सांगितल्याने १२ वर्षीय मुलाने घर सोडल्याची धक्कादायक घटना हिंगणघाट परिसरात घडली आहे. चार दिवस उलटूनही मुलगा परतला नसल्याने आईने पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली आहे.

**-आईने रागावल्याने घर सोडले; हिंगणघाट पोलिसांकडून शोधमोहीम सुरू**

बालाघाट जिल्ह्यातील मलाजखंड येथील ललिता रमेश धुर्वे या पतीच्या निधनानंतर उदरनिर्वाहासाठी मुलगा गोविंद व लहान मुलीसह नांदगाव परिसरात राहतात. गोविंदला सतत मोबाईल पाहण्याची सवय होती. १४ फेब्रुवारीला मोबाईलवरून रागावल्याने तो घराबाहेर पडला आणि परतलाच नाही. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र निष्फळ ठरला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल करून मुलाचा शोध सुरू केला आहे. मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे निर्माण होणाऱ्या दुष्परिणामांवरही या घटनेने पुन्हा प्रकाश टाकला आहे.

# भीमनगरात कुलूपबंद घरांवर चोरट्यांचा डल्ला

## -लाखोंचे दागिने-रोख रक्कम लंपास; पोलिस गस्त वाढविण्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील भीमनगर परिसरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत दोन कुलूपबंद घरांना लक्ष्य केले. सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण लाखोंचा ऐवज लंपास झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. १८ फेब्रुवारी रोजी तक्रारीनंतर ही घटना उघडकीस आली.

भीमनगर येथील सब्दर अली जहीर अली हे पत्नीच्या प्रकृती बिघडल्यामुळे १७ फेब्रुवारीला नागपूर येथे गेले होते. घराला



कुलूप लावून चावी शेजारी दिली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी घराचे कुलूप तुटलेले दिसताच चोरीचा प्रकार समोर आला. पाहणीत घरातील सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले.

याचादरम्यान मास्टर कॉलनीतील सविता गौतम जिंदे यांच्या घरातही चोरट्यांनी हात साफ केला. त्या उपचारासाठी नागपूरला गेल्याची संधी साधून दागिने व १४ हजार रुपये रोख रक्कम लंपास करण्यात आली. सलग दोन घरफोड्यांमुळे पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून नागरिकांनी रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# पर्यावरण तज्ज्ञांनी कृषी क्षेत्राकडेही लक्ष केंद्रित करण्याची गरज-राज्यपाल

**मुंबई/प्रतिनिधी :** कृषी क्षेत्रातील रसायनांच्या वाढत्या वापरामुळे शेती बरोबरच पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम घातक आहेत. त्यामुळे एकूणच पर्यावरण तर प्रदूषित होतच आहे, शिवाय गंभीर आजारांचे संकटही वाढत आहे. त्यामुळे पर्यावरण तज?ज्ञांनी जागतिक पर्यावरण रक्षणाचा विचार करताना कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही विचार करावा, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या मुंबई क्लायमेट वीकच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्थी, प्रोजेक्ट मुंबईचे शिशिर जोशी, जलज दानी आणि पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.



मुंबई क्लायमेट वीक च्या तीन दिवसीय परिषदेच्या माध्यमातून हवामान बदलाच्या गंभीर प्रश्नावर देश-विदेशातील तज्ज्ञांनी चिंतन केल्याबद्दल राज्यपालांनी आयोजकांचे अभिनंदन केले. राज्यपाल श्री.देवव्रत म्हणाले की, भारतीय संस्कृती ही निसर्गपूजक आहे. प्राचीन शिक्षणपद्धतीत मुलांना निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण दिले जात होते. मात्र आधुनिक काळात भोगवादी प्रवृत्ती वाढल्याने पर्यावरणाचा -हास झाला. आहे. कोरोना काळातील लाकडाउनमध्ये माणूस घरात राहिल्याने नद्या स्वच्छ झाल्या, आकाश निर्मळ दिसू लागले. यावरून पर्यावरणाचा -हास होण्यात मानवी हस्तक्षेपच प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

राज्यपालांनी रासायनिक खतांचा अतिवापर, तसेच युरिया, डीएपी आणि कीटकनाशकांमुळे नायट्रस ऑक्साईड सारख्या वायूंचा पर्यावरणावर होणारा घातक परिणाम अधोरेखित केला. या रसायनांचा अंश भूजल आणि अन्नसाखळीत जाउन गंभीर आजार होतात. रासायनिक शेतीमुळे जमीन अनुपजाउ होत आहे. नैसर्गिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता, सेंद्रिय कार्बन आणि भूजलसाठा वाढतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय प्राकृतिक कृषि मिशनच्या माध्यमातून नैसर्गिक शेतीला चालना दिल्याचे राज्यपाल श्री.देवव्रत यांनी सांगितले. एका वृत्तपत्राने केलेल्या पाहणीत १०५ मातांच्या दुधात कीटकनाशकांचे अंश आढळल्याचे नमूद करून याकडे गंभीरतेने पाहण्याचे आवाहन राज्यपालांनी केले. पर्यावरण संरक्षणासाठी ठोस कृतीची गरज-मंत्री पंकजा मुंडे

पर्यावरण संरक्षणासाठी ठोस आणि व्यापक पातळीवर कृती करण्याचे आवाहन करत पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, भूतकाळात विकास आणि पायाभूत सुविधांवर भर देताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष झाले. त्याचे परिणाम आज संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. पर्यावरणाचा प्रश्न हा एका प्रदेशापुरता मर्यादित नसून तो जागतिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे यावर उपाययोजना करताना जागतिक दृष्टीकोन आवश्यक आहे. माती, पाणी आणि हवा हे पर्यावरणाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. औद्योगिकीकरण आणि वाढत्या पायाभूत सुविधांमुळे या तिन्ही घटकांवर ताण निर्माण झाला आहे. आर्थिकदृष्ट्या मागास देशांनी विकासासाठी पर्यावरणास हानी पोहोचवणा-या उद्योगांना परवानगी दिली आणि आता त्याची किंमत मोजावी लागत असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी नमूद केले. पर्यावरणविषयक परिषदांमधील चर्चा केवळ बौद्धिक पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे, अशी आशा व्यक्त करून, मुंबई क्लायमेट वीकमुळे विविध देशांतील तज्ज्ञांशी विचारविनिमयाची संधी मिळाल्याबद्दल श्रीमती मुंडे यांनी समाधान व्यक्त केले.

**हवामान लवचिकतेसाठी सार्वत्रिक प्रयत्न आवश्यक**-महापौर रितु तावडे

शहराचा विकास, वाढ आणि हवामान जबाबदारी या एकमेकांपासून वेगळ्या न ठेवता समांतर आणि समन्वयाने पुढे नेण्याची आवश्यकता असल्याचे मुंबईच्या महापौर श्रीमती रितु तावडे यांनी सांगितले. हवामान लवचिकता केवळ शासनापुरती मर्यादित नसून सार्वजनिक संस्था, खाजगी उद्योग, वित्तीय भागीदार, संशोधन संस्था आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य होईल. यासाठी मजबूत सार्वजनिक-खाजगी भागीदारी, नवोन्मेषी वित्तपुरवठा, तांत्रिक सहकार्य आणि नागरिकांच्या वर्तनातील सकारात्मक बदल आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## राजधानीत शिवजयंतीचा सोहळा अभूतपूर्व उत्साहात संपन्न

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'जय भवानी, जय शिवाजी'चा गगनभेदी जयघोष, ढोल-ताशांचा गजर, तुतारींचा निनाद आणि शाहिरी पोवाड्यांच्या साथीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज देशाच्या राजधानीत अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी भारतीय सेनेच्या तुकडीने छत्रपती शिवाजी महाराजांना विशेष मानवंदना दिली.



दिल्लीतील शिवजयंती राष्ट्रोत्सव समितीतर्फे कस्तुरबा गांधी मार्गस्थित नवीन महाराष्ट्र सदनात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संभाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि खा. विशाल पाटील, निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, निवास आयुक्त गुंतवणूक सुशील गायकवाड, माहिती संचालक हेमराज बागुल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव आणि पाळणा पूजन आणि पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवजयंती राष्ट्रोत्सव समिती, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या 'शिवकालीन दर्शिका २०२६' या कॅलेंडरचे प्रकाशन संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. या कॅलेंडरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंत घडलेल्या ऐतिहासिक घटनांचा तारखेनुसार सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. नाशिकचे शिवराय ढोल पथक, लेझीम, वारकरी दिंडी आणि झेंडा पथकाच्या निनादात महाराष्ट्र सदन परिसरात भव्य 'शिव-शोभायात्रा' काढण्यात आली. या कार्यक्रमास सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार आणि जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, उपअभियंता किरण चौधरी, आशुतोष द्विवेदी व्यवस्थापक प्रमोद कोलपते, मुख्य सुरक्षा अधिकारी अनिल चोरगे अनिल यांच्यासह महाराष्ट्र सदन व परिचय केंद्राचे कर्मचारी आणि दिल्लीसह हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील विविध भागांतून आलेले मराठी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिहार विधानसभा अध्यक्षांसह 42 आमदारांना हायकोर्टाची नोटीस

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहारच्या राजकारणात एक मोठी कायदेशीर घडामोड समोर आली आहे. पाटणा उच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील ४२ आमदारांना नोटीस बजावली आहे.निवडणूक प्रतिज्ञापत्रांमध्ये खोटी माहिती आणि अनियमिततेच्या आरोपांवर न्यायालयाने उत्तर मागितले आहे. हे प्रकरण गंभीर लक्षात घेउन न्यायालयाने निर्धारित वेळेत स्पष्टीकरण दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यात राजकीय गोंधळ निर्माण झाला आहे.० संबंधित विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवारांनी दाखल केलेल्या याचिकेद्वारे हे प्रकरण समोर आले आहे. विजयी उमेदवारांनी नामांकनाच्या वेळी त्यांच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये तथ्य लपवल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. काही प्रकरणांमध्ये, मतदान प्रक्रियेत अनियमिततेचे आरोप देखील करण्यात आले आहेत. या आरोपांवर आधारित उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आल्या होत्या.प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयाने सर्व आमदारांना नोटीस बजावली. पुढील सुनावणी आता न्यायालयात दाखल केलेल्या उत्तरांवर आणि कागदपत्रांवर आधारित केली जाईल.नोटीस मिळालेल्यांमध्ये उर्जामंत्री विजेंद्र यादव यांचाही समावेश आहे. माजी मंत्री जीवेश मिश्रा आणि आमदार चेतन आनंद यांनाही उत्तर द्यावे लागेल. गोह येथील राष्ट्रीय जनता दलाचे आमदार अमरेंद्र प्रसाद यांचाही यादीत समावेश आहे.नोटीस मिळालेल्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही गटातील आमदारांचा समावेश आहे. यावरून हे स्पष्ट होते की, हे प्रकरण पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाते आणि कायदेशीर चौकटीत येते. पुढील सुनावणीत न्यायालय त्यांच्या उत्तरांचा विचार करेल.निवडणूक पारदर्शकतेच्या दृष्टिकोनातून उच्च न्यायालयाची ही कारवाई महत्त्वाची मानली जाते. जर आरोप सिद्ध झाले तर संबंधित आमदारांच्या सदस्यत्वावर परिणाम होउ शकतो. पण सध्या हे प्रकरण विचाराधीन आहे आणि अंतिम निर्णय प्रलंबित आहे.आमदारांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आली आहे. या घडामोडीमुळे विधानसभेत आणि विधानसभेबाहेर राजकीय वक्तृत्व तीव्र होण्याची शक्यता आहे. सर्वांचे लक्ष आता पुढील सुनावणी आणि न्यायालयाच्या भूमिकेकडे लागले आहे.




■ एपस्टीन प्रकरणात नाव ■ 17 वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप

# ब्रिटनचे राजे चार्ल्स यांचे भाऊ अँड्र्यू यांना अटक

**लंडन/वृत्तसंस्था :** ब्रिटनमध्ये किंग चार्ल्स यांचे भाउ अँड्र्यू यांना अटक करण्यात आली आहे. सार्वजनिक पदावर असताना गैरवर्तन केल्याच्या संशयावरून त्यांना अटक करण्यात आली आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, गुरुवारी सकाळी ८ वाजता पोलिसांनी त्यांना सँडरिंगहॅम येथील त्यांच्या घरी ताब्यात घेतले. विशेष म्हणजे आज अँड्र्यू यांचा वाढदिवस आहे. खरंच, एपस्टीन प्रकरणातील पीडित व्हर्जिनिया गिफ्रे यांनी आरोप केला आहे की, २००१ मध्ये प्रिन्स अँड्र्यू यांनी त्या १७ वर्षांच्या असताना त्यांचे लैंगिक शोषण केले होते. तथापि, अँड्र्यू यांनी गिफ्रे यांचे सर्व आरोप फेटाळून लावले. गिफ्रे यांचे एप्रिल २०२५ मध्ये निधन झाले, मृत्यूचे कारण आत्महत्या असल्याचे म्हटले गेले. अँड्र्यू यांना जन्मठेपेची शिक्षा होउ शकते.



सार्वजनिक पदावर असताना गैरवर्तन करणे हा इंग्लंडमध्ये गंभीर गुन्हा मानला जातो. या गुन्ह्यासाठी व्यक्तीला हे सिद्ध करावे लागते की ती व्यक्ती चुकीची आहे हे माहित होते, तरीही त्यांनी ते करणे सुरू ठेवले. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त शिक्षा जन्मठेपेची आहे. हा खटला फक्त गंभीर गुन्हेगारी आरोपांखाली न्यायालयात चालवता येतो.हा खटला अँड्र्यू यांच्या ब्रिटनच्या व्यापार दूत म्हणून काम करण्याच्या काळातील असल्याचे मानले जाते. २००१ मध्ये त्यांची या पदावर नियुक्ती झाली होती, परंतु १० वर्षांनंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यावेळी अमेरिकन गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी असलेल्या संबंधांमुळे त्यांचे नाव वादात सापडले होते. अमेरिकेच्या न्याय विभागाने जारी केलेल्या कागदपत्रांमध्ये असे म्हटले आहे की, अँड्र्यू यांचा पदावर असताना एपस्टीनशी संपर्क होता. फोटोमध्ये प्रिन्स अँड्र्यू आहेत, ज्यांचा हात १७ वर्षीय व्हर्जिनिया गिफ्रे यांच्या कमरेवर आहे. हा फोटो १० मार्च २००१ रोजी लंडनमध्ये मॅक्सवेलच्या घरी काढण्यात आला होता.फोटोमध्ये प्रिन्स अँड्र्यू आहेत, ज्यांचा हात १७ वर्षीय व्हर्जिनिया गिफ्रे यांच्या कमरेवर आहे. हा फोटो १० मार्च २००१ रोजी लंडनमध्ये मॅक्सवेलच्या घरी काढण्यात आला होता.जेफ्री एपस्टीनचा हा फोटो न्याय विभागाने डिसेंबरमध्ये प्रसिद्ध केला होता. त्यात तो पाच महिलांच्या मांडीवर झोपलेला आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने ३० जानेवारी रोजी हा फोटो प्रसिद्ध केला. त्यात अँड्र्यू एका महिलेवर गुडघे टेकताना दिसत आहे. अँड्र्यू जमिनीवर पडलेल्या मुलीला स्पर्श करत आहे, तर मागे बसलेला माणूस टेबलावर पाय ठेवून खुर्चीवर बसला आहे. ब्रिटनचे किंग चार्ल्स यांनी त्यांचे धाकटे बंधू अँड्र्यू यांच्याकडून प्रिन्स हा किताब आणि सर्व शाही पदव्या परत घेतल्या होत्या. त्यांच्याकडून विंडसर येथील त्यांचे आलिशान घर रायल लाज देखील रिकामे करून घेण्यात आले होते. खरं तर, एपस्टीन प्रकरणात पीडित व्हर्जिनिया गिफ्रे यांनी आरोप केला होता की, २००१ मध्ये जेव्हा त्या १७ वर्षांच्या होत्या, तेव्हा प्रिन्स अँड्र्यू यांनी त्यांचे लैंगिक शोषण केले होते. बकिंगहॅम पॅलेसने गुरुवारी या प्रकरणावर एक निवेदन जारी करत म्हटले, 'किंगने आज प्रिन्स अँड्र्यू यांच्या शैली, पदव्या आणि सन्मान काढून टाकण्याची औपचारिक प्रक्रिया सुरू केली आहे. ६५ वर्षीय अँड्र्यू हे दिवंगत राणी एलिझाबेथ यांचे दुसरे पुत्र आहेत. अँड्र्यू यांचे नाव ब-याच काळापासून अमेरिकन गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी जोडले गेले आहे, ज्यावर अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप होते. या महिन्याच्या सुरुवातीला अँड्र्यू यांना ड्यूक ऑफ यार्क ही पदवी वापरण्यापासूनही रोखण्यात आले होते.

## सिलेंडरच्या स्फोटानंतर तीन मजली इमारत कोसळली, 16 जण ठार

**कराची/वृत्तसंस्था :** पाकिस्तानमधील कराचीमध्ये एक मोठी दुर्घटना घडली. सिलेंडरच्या स्फोटामुळे एक निवासी इमारत कोसळली. ढिगा-याखाली सोळा जणांचा मृत्यू झाला आणि ते ढिगा-याखाली गाडले गेले. तर अनेक जण जखमी झाले आहे. स्थानिक माध्यमांनी पोलिस आणि स्थानिक बचाव पथकांचा हवाला देत ही माहिती दिली. कराचीच्या सोल्जर बाजारातील गुल राणा क?लनी परिसरातील एका घरात ही घटना घडली.पोलीस अधिका-यांनी सांगितले की, गॅस सिलेंडर गळतीमुळे स्फोट झाला. सेहरीच्या वेळी पहाटे ४:१५ च्या सुमारास ही घटना घडली आणि इमारतीच्या पहिल्या मजल्यावर गॅसचा स्फोट झाला. आपत्कालीन सेवांनी ढिगा-यातून अनेक लोकांना बाहेर काढले आणि त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. सहा महिला आणि चार मुलांसह एकूण १६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर चौदा जण जखमी झाले आहेत. सिव्हिल हास्पिटलमधील ट्रामा सेंटरचे संचालक डा. मोहम्मद साबीर मेमन यांच्या मते, १३ मृतदेह त्यांच्या रुग्णालयात आणण्यात आले आहेत. शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. या परिसराच्या गर्दीमुळे अधिका-यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. इमारतीत कमी खोल्यांमुळे बचाव पथकांना अडचणी येत होत्या. अधिका-यांचे म्हणणे आहे की, ही इमारत कायदेशीर रचना नव्हती आणि ती वेगवेगळ्या खोल्या जोडून बांधण्यात आली होती. जवळपासच्या इतर घरांचेही मोठे नुकसान झाले आहे. पोलिसांनी परिसराला वेढा घातला आहे आणि सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे.

## गगनयान मिशनच्या 'ड्रोग पॅराशूट'ची पात्रता चाचणी यशस्वी

**चंदीगड /वृत्तसंस्था :** भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहीम गगनयानसाठी ड्रोग पॅराशूटची पात्रता स्तरावरील लोड चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली. पात्रता स्तरावरील चाचणीत कमाल उड्डाण भारापेक्षा जास्त भार टाकून पॅराशूटची मजबुती आणि सुरक्षा मार्जिन तपासले गेले.या चाचणीनंतर हे निश्चित झाले की, भारत मजबूत आणि मोठ्या क्षमतेचे रिबन पॅराशूट डिझाइन आणि तयार करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. तसेच, पॅराशूट ख-या मोहिमेसारख्या परिस्थितीतही सुरक्षित आणि योग्य प्रकारे काम करेल. गगनयान मोहिमेत अंतराळवीरांना सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणण्यासाठी ड्रोग पॅराशूट खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा कॅप्सूल पृथ्वीच्या वातावरणात परत येतो, तेव्हा हेच पॅराशूट त्याची वेगवान गती कमी करण्यास मदत करते. ही चाचणी बुधवार दि. १८ फेब्रुवारी रोजी चंदीगड येथील टर्मिनल बॅलिस्टिक्स रिसर्च लॅबोरेटरी (टीबीआरएल)च्या रेल ट्रॅक र?केट स्लेड (आरटीआरएस) सुविधेत करण्यात आली. ही डायनॅमिक चाचणी डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन(डीआरडीओ) च्या विशेष हाय-स्पीड एरोडायनामिक आणि बॅलिस्टिक मूल्यांकन सुविधा आरटीआरएस मध्ये पूर्ण झाली. यात इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) च्या विक्रम साराभाई स्पेस सेंटर (व्हीएसएससी), डीआरडीओच्या एरियल डिलिव्हरी रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट (एडीआरडीई) आणि टीबीआरएलच्या टीम्सनी भाग घेतला. २४ ऑगस्ट २०२५ रोजी स्पेस मधून परत येणा-या क्रू माड्यूलची चाचणी करण्यात आली होती. २४ ऑगस्ट २०२५ रोजी स्पेस मधून परत येणा-या क्रू मॉड्यूलची चाचणी करण्यात आली होती. गगनयान मिशनबद्दल- इस्रोचे गगनयान हे भारताचे पहिले मानवी अंतराळ मिशन आहे, ज्याचा उद्देश भारतीय अंतराळवीरांना स्वदेशी तंत्रज्ञानाने अंतराळात पाठवून त्यांना सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणणे हा आहे. यात भारतात विकसित क्रू म?ड्यूल, सर्विहस म?ड्यूल आणि जीवनरक्षक प्रणालींचा वापर केला जाईल. मोहिमेअंतर्गत, अंतराळवीर पृथ्वीच्या निम्न कक्षेत (लो अर्थ ऑर्बिट) काही काळ घालवल्यानंतर सुरक्षित लँडिंग करतील.



## राज्यात 16 लाख 15 हजार विद्यार्थी शुक्रवारपासून देणार दहावीची परीक्षा

**पुणे/प्रतिनिधी :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी इयत्ता दहावीची परीक्षा शुक्रवारपासून सुरू होत आहे. या परीक्षेसाठी राज्यभरातून एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ८ लाख ६५ हजार ७४० मुलगे, ७ लाख ४९ हजार ७३६ मुली आणि १३ ट्रान्सजेंडर आहेत. एकूण ५ हजार १११ मुख्य केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडशे यांनी ही माहिती दिली.पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नउ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा होत आहे. या परीक्षेसाठी एकूण २३,६८३ शाळांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. १८ मार्च रोजी शेवट होणार आहे. दरम्यान, बारावी परीक्षेत घडलेल्या कॉपी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बैठे पथक वाढवण्यावर भर दिला आहे. दहावी बोर्डाच्या एकूण ५,१११पैकी १९१ केंद्र संवेदनशील आहेत. ही बाब विचारात घेउन प्रशासनाकडून जिल्हा दक्षता समिती मार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असावी, असा आमचा प्रयत्न होता. पण, ५५४ केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध होउ शकली नाही, असेही डॉ. बेडशे यांनी स्पष्ट केले.



## शिवनेरी किल्ल्यावर चेंगराचेंगरी, अनेक जण जखमी

**जुन्नर/ पुणे/प्रतिनिधी :** देशभरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होत असतानाच छत्रपतींचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर चेंगराचेंगरीची घटना घडली. शिवजयंतीच्या निमित्ताने मध्यरात्री किल्ल्यावर मोठी गर्दी झाली होती. यावेळी चेंगराचेंगरी होउन अनेक जण जखमी झालेत. यामध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश आहे. यासंदर्भातील माहितीनुसार, शिवजयंती सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागांतून शिवभक्त कालपासूनच शिवनेरी किल्ला येथे दाखल झाले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अंबरखान्याखालील हत्ती दरवाजा आणि गणेश दरवाजा परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली. अरुंद वाटेवर हजारो नागरिक एकाच वेळी जमा झाल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. गर्दीचा ताण वाढल्याने तेथे तैनात असलेली पोलीस यंत्रणाही अपुरी पडली आणि अचानक चेंगराचेंगरी झाली. काही क्षणातच परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. रेटारेटीमुळे अनेकजण एकमेकांवर पडले व काहीजण किरकोळ जखमी झाले. जखमींना तातडीने जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून, सर्व जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे डाक्टरांनी सांगितले. दरम्यान, प्रशासनाकडून घटनास्थळी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, पुढील कार्यक्रम शांततेत पार पडावेत यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.



## सचिन तेंडुलकर याने घेतली एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न सचिन तेंडुलकर याने आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या नंदनवन या निवासस्थानी येउन त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांची पत्नी अंजली तेंडुलकर याही उपस्थित होत्या. सचिन यांचे ज्येष्ठ सुपुत्र अर्जुन यांच्या विवाहाची पत्रिका देण्यासाठी त्यांनी ही भेट घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे आणि सचिन यांच्यात अनेक विषयावर चर्चा झाली. यात प्रामुख्याने राज्यातील क्रीडा सुविधांबाबत चर्चा केली. शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती घेउन त्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## अमेरिका-इराण युद्ध अटळ? हल्ल्याची तारीखही ठरली?

**तेहरान /वृत्तसंस्था :** अणुकरार निष्फळ ठरल्यानंतर आता अमेरिका आणि इराणमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. अमेरिकेने गेल्या २४ तासांत ५० हून अधिक अत्याधुनिक लढाउ विमाने आशियाई क्षेत्रात तैनात केली असून कोणत्याही क्षणी युद्धाची घोषणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अमेरिकन वृत्तसंस्था



अक्सिओसने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध अनेक आठवडे सुरू राहण्याची शक्यता आहे.व्हाईट हाउसच्या एका अधिका-याने दावा केला आहे की, अमेरिका येत्या काही दिवसांत इराणवर हल्ला करण्याची शक्यता ९० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. राजनैतिक चर्चांचे मार्ग आता संपुष्टात आल्याचे दिसत असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. पेंटागानमधील काही अधिका-यांमध्ये या कारवाईच्या उद्दिष्टांबाबत मतभेद असले, तरी लष्करी हालचालींनी वेग आला आहे. दरम्यान, इस्रायलने आपल्या सैन्याला हाय अलर्टवर ठेवले असून कोणत्याही परिस्थितीत युद्धाला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. अहवालांनुसार, अमेरिकेने मध्य पूर्वेत आपली लष्करी ताकद वाढवली आहे. सध्या मध्य पूर्वेत दोन विमानवाहू जहाजे, १२ युद्धनौका, शेकडो लढाउ विमाने आणि असंख्य हवाई संरक्षण प्रणाली तैनात आहेत. गेल्या काही दिवसांत १५० हून अधिक अमेरिकन लष्करी मालवाहू विमानांनी मध्य पूर्वेत शस्त्रे आणि दारूगोळा पोहोचवण्यासाठी उड्डाण केली आहे. अमेरिकेने गेल्या २४ तासांत मध्य पूर्वेत आपली लष्करी तैनाती आणखी तीव्र केली आहे, एफ-३५ एस, एफ-२२ सह आणि एफ-१६ सह ५० हून अधिक लढाउ विमाने मध्य पूर्वेत उड्डाण करत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना त्यांच्या वरिष्ठ राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी सांगितले आहे की, अमेरिकेचे सैन्य शनिवारी इराणवर हल्ला करू शकते. मात्र, त्यांनी अद्याप हल्ल्याला परवानगी द्यायची की नाही, याचा निर्णय घेतलेला नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## जनहितार्थ प्रकल्प

**समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्याचा विचार करून, एसटी महामंडळाने हा महत्त्वाकांक्षी सीसीटीव्ही कॅमेरा प्रकल्प हाती घेतला आहे. एसटी बस स्थानकापासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. या प्रकल्पामुळे एसटी प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे व म्हणून या निर्णयाचे स्वागतच करावे लागेल. प्रस्तावित निधीतून एसटीची बसस्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच पुण्यात भोसरी येथील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था यासारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्याचे नियोजन आहे. एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७,०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून, यामुळे या ठिकाणच्या बारीकसारीक हालचालींवर सतत नजर राहू शकेल. या अत्याधुनिक प्रकल्पाची जबाबदारी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या कंपनीवर सोपवली आहे. प्रकल्पाचा आधारस्तंभ ठरणारा मध्यवर्ती नियंत्रण कक्ष मुंबईत उभारला असून, तेथून राज्यभरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर केंद्रीकृत पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' हे राज्य परिवहन महामंडळ तथा एसटीचे ब्रीदवाक्य. चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि अगदी दुर्गम भागातील खेड्यापाड्यापर्यंत सेवा देणारी एसटी सर्वसामान्यांचा आधार मानली जाते. ही ओळख एसटीने मागील ७५ वर्षांहून अधिक काळ ऊन-वारा-पावसाची तमा न बाळगता केलेल्या सेवेमुळे मिळवलेली आहे. एसटीइतके सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे, राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणारे जाळे दुसरे नाही. आता एसटी किंवा 'लालपरी'च्या सुरक्षेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. मध्यंतरी पुणे येथील स्वारगेट एसटी स्थानकात महिलेवर अत्याचार झाला होता. त्याचे तीव्र पडसादही उमटले. अनेकदा एसटी स्थानकात अथवा एसटीमध्ये संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळतात. गर्दीच्या ठिकाणी चोऱ्यामाऱ्यांचे प्रकारही होत असतात. नवीन सीसीटीव्ही कॅमेरा प्रकल्प केवळ कॅमेरे बसवण्याचा उपक्रम नसून, तो एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच देणारा आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला नवे बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरू शकेल. तंत्रज्ञानाचा वापर सुरक्षेसाठी करणे, ही उत्तम बाब आहे; परंतु प्रत्यक्षात कार्यवाही कशी होते, हे पाहावे लागते. मेट्रोचे स्मार्टकार्ड मोफत दिले जाते. मुंबईतील बेस्टचे स्मार्टकार्ड १०० रुपयांत मिळते. परंतु, आता एसटीने सवलतधारक प्रवाशांसाठी सुरू केलेल्या स्मार्टकार्डसाठी प्रवाशांना १९९ रुपये मोजावे लागणार आहेत.एसटीमधून प्रवास करणारा हा राज्यातील गरजू व मध्यमवर्गीय प्रवासी असून, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा ३१ घटकांना एसटी प्रवासात सवलत दिली जाते. या प्रवाशांना एसटी नॅशनल मोबिलिटी कार्ड देणार आहे; परंतु या कार्डसाठी प्रवाशांना खूपच जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. मेट्रोच्या कार्डमध्ये शहरातील इतर सार्वजनिक सेवांची तिकिटे काढता येतात. पण, राज्याच्या सर्व भागांत जाणाऱ्या एसटीला या कार्डात मात्र स्थान नाही. या स्मार्टकार्डसाठी जादा रुपये आकारण्यामुळे संबंधित कार्ड पुरवठादाराची धन करण्याचा उद्देश आहे का, असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत. त्यामुळे सरकारने स्मार्टकार्डची किंमत कमी केली पाहिजे. दुसरीकडे, एसटीच्या ताफ्यात आतापर्यंत ५५९ ई-बसेस दाखल झाल्या; मात्र एकूण ५,१५० ई-बसेस ताफ्यात आणण्याची मूळ योजना होती. महामंडळ आणि ईव्ही ट्रान्स कंपनीमध्ये याबाबतचा करार दोन वर्षांत पूर्ण करण्याचा निर्णय झाला होता. महामंडळाच्या ताफ्यात या सर्व बसेस केव्हा दाखल होणार, हा खरा प्रश्न आहे. ई-बसेसचा हा राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी व पर्यावरणासाठी उपयुक्त असा प्रकल्प असून, तो बारगळता कामा नये. शब्द देऊनदेखील करारानुसार बसेस मिळत नसतील, तर संबंधित पुरवठादार कंपनीवर कारवाई केलीच गेली पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केली असून, ती चुकीची म्हणता येणार नाही.महामंडळाकडे २०१८-१९ मध्ये १६ हजार ४२४ बसेस होत्या. ही संख्या आता १४ हजार १६१ वर येऊन पोहोचली. गेल्या साडेपाच वर्षांत राज्यात एसटीचे १४ हजारांवर अपघात झाले असून, त्यात १३०० वर प्रवाशांचा मृत्यू झाला. काहीवेळा बेदरकारपणे एसटी चालवणे, ती चालवत असताना मोबाईलवर बोलणे असे प्रकार घडले आहेत. बस दुरुस्तीसाठी सुटे भाग वेळेत न मिळणे, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे वाढलेला कामाचा ताण आणि भंगार बसेस यामुळे अपघात वाढत आहेत. 'शिवशाही'सारख्या गाड्यांचे वाढते अपघात, त्या वाटेतच बंद पडण्यासारखे प्रकार चिंताजनक आहेत. ते टाळण्यासाठी आजअखेर कोणत्याच प्रभावी उपाययोजना झालेल्या नाहीत. पावसाळ्यात अनेकदा गळक्या एसटीतून प्रवास करावा लागतो. या वर्षाच्या सुरुवातीलाच एसटीच्या ८६ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांचा पगार रखडला होता. असे प्रकार वारंवार घडले. गेल्यावर्षी एसटीने आर्थिक स्थितीबाबतची श्वेतपत्रिका जारी केली होती.मागील ४५ वर्षांचे अवलोकन केले असता, केवळ आठ वर्षे अशी होती की, ज्यावेळी एसटीला काही प्रमाणात फायदा झाला होता. उर्वरित वर्षांत तोटाच झाला. आता तर संचित तोटा १० हजार कोटी रुपयांवर गेला आहे. खरे तर, एसटीने खर्चात बचत करणाऱ्या योजनाही तज्ज्ञांकडून जाणून घेतल्या आहेत. सीएनजी इंधनावरील एक हजार बसेसचा ताफ्यात समावेश करण्यासारख्या शिफारसी अंमलात आणणे आवश्यक आहे. उत्पन्नवाढीसाठी दरवर्षी ताफ्यात नवीन बसेस आणणे आवश्यक असून, महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्यांकडून महसुली भागीदारी तत्त्वावर, खासगी वाहनांकरिता इंधन विक्रीकेंद्रे सुरू करता येतील. एसटीचे कदापि खासगीकरण होणार नाही, असे आश्वासन परिवहन मंत्र्यांनी दिले आहेच; परंतु तोटा वाढतच गेला, तर खासगीकरणाचा दबाव वाढत जाईल. हे लक्षात घेऊन एसटीच्या कारभारात आमूलाग्र सुधारणा होण्याची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचा बोजा पेलण्याची जबाबदारी अर्थातच या सावर्जनिक परिवहन व्यवस्थेवर आहे आणि ती सक्षम करण्याविना पर्याय नाही.**

**भारत-अमेरिका यांच्यातील बहुचर्चित व्यापार करारासंदर्भात सध्या सार्वजनिकरीत्या जी चर्चा सुरू आहे, तिने देशातील शेतकरी संघटनांच्या काळजात धडकी भरवली आहे. त्यांच्या या चिंतेमागे सबळ कारणेही आहेत. देशांतर्गत शेती आधीच मोठ्या संकटात असून, बाजारात शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ३० ते ४० टक्के कमी दर मिळत आहेत. अशा स्थितीत अमेरिकेतील प्रचंड सबसिडी असलेल्या स्वस्त शेती उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ खुली केल्यास त्याचे गंभीर परिणाम स्थानिक शेतीवर होतील.**

# आयात कृषी मालाची टांगती तलवार

शेक्सपिअरच्या शोकांतिकांमधील पात्रांसमोर उभा ठाकतो तसाच एक गंभीर पेचप्रसंग आज भारतीय कृषी क्षेत्रासमोर उभा आहे. समोर सत्य नक्की काय आहे आणि कोणावर विश्वास ठेवावा, असा प्रश्न पडावा अशी सद्यस्थिती आहे. एका बाजूला अमेरिकेचे कृषी सचिव ब्रुक रोलिन्स यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराबद्दल अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत. हा करार 'अमेरिकी शेतकऱ्यांच्या हिताचा' असल्याचे त्यांचे ठाम मत आहे. दुसरीकडे, भारताचे वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनीही याला 'ऐतिहासिक करार' संबोधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. कृषी आणि दुग्धजन्य ही भारताची संवेदनशील क्षेत्रे या करारात सुरक्षित ठेवली असल्याचा दावा त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

हा करार खरोखरच दोन्ही लोकशाही राष्ट्रांसाठी फायदेशीर आहे की, केवळ एकाधिकारशाही आणि बळजबरीचे फलित आहे, याचे उत्तर कराराचा सविस्तर तपशील समोर आल्यावरच स्पष्ट होईल; मात्र सध्या सार्वजनिकरीत्या जी चर्चा सुरू आहे, तिने देशातील शेतकरी संघटनांच्या काळजात धडकी भरवली आहे. त्यांच्या या चिंतेमागे सबळ कारणेही आहेत. देशांतर्गत शेती आधीच मोठ्या संकटात असून, बाजारात शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ३० ते ४० टक्के कमी दर मिळत आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकेतील प्रचंड सबसिडी असलेल्या स्वस्त शेती उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ खुली केल्यास त्याचे गंभीर परिणाम स्थानिक शेतीवर होतील. अमेरिकेतील शेतकऱ्यांना दरवर्षी सरासरी ६६,३१४ डॉलर्स इतकी मोठी शासकीय मदत मिळते, जी त्यांना बाजारपेठेतील चढ-उतारांपासून वाचवते. इतकेच नव्हे, तर २०२६ मध्ये तेथील प्रशासन 'फार्मर्स ब्रिज असिस्टन्स प्रोग्राम'अंतर्गत शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी १२ अब्ज डॉलर्स देण्याच्या तयारीत आहे, ज्याला ट्रम्प यांनी 'वन बिग ब्युटिफुल बिल' असे संबोधले आहे.

या व्यापारी कराराच्या पूर्ण तपशिलाची प्रतीक्षा असतानाच दोन्ही बाजूंकडून दावे-प्रतिदाव्यांच्या फैरी झडत आहेत. ब्रुक रोलिन्स यांनी समाजमाध्यमांवर स्पष्टपणे म्हटले आहे की, या करारामुळे भारतीय बाजारपेठ अमेरिकेसाठी खुली होणार असून, यामुळे अमेरिकेतील शेती उत्पादनांची निर्यात वाढेल आणि ग्रामीण अमेरिकेत समृद्धी येईल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही यावर शिक्कामोर्तब करताना सूचित केले आहे की, भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवरील आयात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत खाली आणले गेले असून, त्या बदल्यात अमेरिकन उत्पादनांसाठी भारतातील आयात शुल्क पूर्णपणे रद्द केले जाईल आणि इतर व्यापारी अडथळेही दूर केले जातील. भारताचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान शेतकऱ्यांना दिलासा देत असले, तरी शेतकरी संघटनांमध्ये अविश्वासाचे वातावरण आहे. संयुक्त किसान मोर्चाने, तर आयात शुल्क शून्य केल्यास स्वस्त परदेशी मालाचा पूर येईल, असा इशारा दिला आहे.



शेतकऱ्यांचा रोष केवळ या करारापुरता मर्यादित नाही, तर २०२६ च्या अर्थसंकल्पात कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी ठोस तरतुदी नसल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. महत्त्वाच्या व्यापारी धोरणांबाबत शेतकऱ्यांशी चर्चा न केल्यामुळे हा राग अधिक अनावर झाला आहे. 'ओईसीडी'च्या ताज्या अहवालानुसार, २००० ते २०२५ या काळात भारतीय शेतकऱ्यांचे १११ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा स्थितीत आणखी एक मोठा आघात सोसण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये उरलेली नाही. हिमाचल प्रदेशातील सफरचंद उत्पादक संघाचे अध्यक्ष हरीश चौहान यांनी या कराराला 'हताश शेतकऱ्यांच्या डोक्यावर हातोडा मारण्यासारखे' म्हटले आहे. युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबतच्या करारांमुळे आधीच परदेशी सफरचंदांनी भारतीय बाजारपेठ काबीज केली असून, आता अमेरिकन सफरचंदांना शून्य आयात शुल्काची सवलत मिळाल्यास डोंगराळ भागातील सफरचंद शेती पूर्णपणे उद्ध्वस्त होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. कापूस, सोयाबीन आणि कांदा उत्पादक शेतकरी आधीच कोसळलेल्या भावांमुळे त्रस्त आहेत, त्यात या नव्या करारामुळे त्यांच्या अडचणीत भरच पडणार आहे.

अमेरिकेने दरवर्षी ५०० अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचे लक्ष्य ठेवले असले, तरी काही तज्ज्ञांच्या मते हा आकडा पुढील पाच वर्षांसाठीचा असू शकतो. यात केवळ शेतीच नव्हे, तर ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्राचाही समावेश असेल; मात्र भारतात होणाऱ्या आयातीत प्रामुख्याने धान्य, कापूस, डाळी, कांदा, सोयाबीन, फळे आणि दुग्धजन्य पदार्थांचा मोठा वाटा असण्याची शक्यता आहे. अन्नपदार्थांची अशाप्रकारे आयात करणे म्हणजे प्रत्यक्षात देशात बेरोजगारीला निमंत्रण देण्यासारखेच आहे. कापसाच्या बाबतीत नुकताच आलेला अनुभव खूप काही सांगून जातो. सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान आयात शुल्क हटवल्यामुळे स्वस्त कापूस देशात आला आणि देशांतर्गत भाव क्विंटलमागे १,००० ते १,५०० रुपयांनी कोसळले. याशिवाय, अमेरिकेतील गायींना दिल्या जाणाऱ्या मांसाहारी खाद्यामुळे (ब्लड मील) तेथील दूध आयात करण्याबाबतही भारतीयांच्या मनात धार्मिक आणि आरोग्यविषयक शंका आहेत. यावर तोडगा काढणे सरकारसाठी मोठे आव्हान असेल. कापूस, सोयाबीन आणि कांदा उत्पादक शेतकरी गेल्या काही वर्षांपासून कमी किमतींचा फटका सहन करत आहेत. शून्य आयात शुल्कामुळे स्वस्त आयातीत माल बाजारात आल्यास देशांतर्गत शेतमालाच्या किमती आणखी घसरण्याची भीती आहे आणि ही स्थिती अखेरीस शेतकऱ्यांना शेती सोडण्यास भाग पाडू शकते.

एकूणच, डोनाल्ड ट्रम्प ज्या पद्धतीने जागतिक व्यापार संघटनेचे (डब्ल्यूटीओ) नियम धाब्यावर बसवून विकसनशील देशांवर नवीन व्यापारी अटी लादत आहेत, ती एकप्रकारे 'बळी तो कान पिळी' या उक्तीचीच प्रचिती आहे. १९९५ पासून जे अमेरिकेला साध्य करता आले नव्हते, ते आता दबावाच्या राजकारणातून मिळवले जात आहे. या दबावामुळे जगाची एक नवी व्यवस्था आकाराला येत आहे, जिथे शक्तिशाली राष्ट्रे स्वतःचे हितसंबंध जोपासण्यासाठी कोणाचेही नुकसान करण्यास मागे-पुढे पाहत नाहीत. ही भूमिका जागतिक पातळीवर किती काळ टिकते, हे येणारा काळच ठरवेल.

**देविंदर शर्मा**

## काँग्रेसच्या नेतृत्वाबाबत प्रश्नचिन्ह

**मा**जी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे माध्यम सल्लागार आणि 'द ॲक्सिडेंटल प्रायमिनिस्टर' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक संजय बारु यांनी एका वृत्तपत्रांमध्ये लिहिलेल्या लेखात असे नमूद केले आहे की, विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीचे नेतृत्व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे सोपवायला हवे.त्यांनी लिहिले आहे की ममता बॅनर्जी यांनी स्वतःला प्रुव्ह केले आहे आणि इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्यासाठी त्या सर्वात योग्य उमेदवार आहेत.पश्चिम बंगालमध्ये त्यांनी लागोपाठ तीन वेळा सत्ता काबीज केली आणि लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा विजय मिळवला तर त्या भाजपा समोर मोठे आव्हान उभे करु शकतील.त्यासाठी ममतांकडे इंडिया आघाडीचे नेतृत्व सोपवण्याची गरज आहे.



संजय बारु यांनी असेही म्हटले आहे की काँग्रेसने, ममतांना पक्षात परत बोलावून पक्षाचे अध्यक्ष करायला हवे होते.१९९८ साली ममतांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन, आपल्या तृणमूल काँग्रेस या पक्षाची स्थापना केली होती.संजय बारू यांचे म्हणणे आहे की इंदिरा गांधी यांच्यानंतर देशाला दुसऱ्या महिला पंतप्रधानाची गरज असून, त्यासाठी ममता बॅनर्जी या एकदम फिट आहेत.सोनिया गांधी - मनमोहनसिंग मॉडेलला, राहुल गांधी - मल्लिकार्जुन खरगे मॉडेलने रिपीट केल्यामुळे काहीही साध्य झालेले नाही,असे संजय बारु यांचे मत आहे.थोडक्यात, काँग्रेसच्या नेतृत्वावर बारु यांनी अप्रत्यक्षपणे टीका केली असून,ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व कसे प्रभावी आहे,हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

आसाम काँग्रेसचे माजी अध्यक्ष भूपेन बोरा यांनी नुकताच काँग्रेसचा राजीनामा दिला आहे.राजीनामा देताना त्यांनी आसाम काँग्रेसचे सध्याचे अध्यक्ष गौरव गोगोई यांच्यावर सडकून टीका केली आहे.तसेच काँग्रेसचे आसाममधील खासदार रकिबूल हुसेन यांच्यावरही, भूपेन बोरा यांनी आरोप केले आहेत.भूपेन बोरा यांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन पक्षाला मोठाच धक्का दिला आहे.राहुल गांधी आणि काँग्रेसच्या इतर बड्या नेत्यांनी, भूपेन बोरा यांना राजीनामा न देण्याची विनंती केल्यानंतरही, भूपेन बोरा यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे.लवकरच आसाम विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत,त्या पार्श्वभूमीवर भूपेन बोरा यांचा राजीनामा, भाजपासाठी फायदेशीर ठरणार आहे.

काँग्रेसचे बडे नेते मणिशंकर अय्यर यांनी राहुल गांधी यांच्यावर थेट टीका करून पक्षाला घरचा आहेर दिला आहे.मणिशंकर अय्यर हे स्वतःला काँग्रेसचे नेते म्हणवून घेत असले तरी काँग्रेसच्या काही नेत्यांच्या म्हणण्यानुसार ते आता काँग्रेसमध्ये नाहीत.आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेत राहिलेल्या अय्यर यांनी नुकतीच,केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांची तारिफ केली आहे.त्यांच्या मते पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील डावी लोकशाही आघाडी लवकरच होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा सत्तेवर येईल.पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीचा येत्या विधानसभा निवडणुकीत पराभव करण्यासाठी, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने कंबर कसली आहे.अशा परिस्थितीत मणिशंकर अय्यर यांनी पिनाराई विजयन यांची केलेली तारिफ, काँग्रेसला बिलकुल आवडलेली नाही.

निरनिराळ्या राज्यांतील काँग्रेसच्या नेत्यांमध्ये जी सुंदोपसुंदी सुरू आहे ती पक्षाला कमकुवत करणारी आहे.कर्नाटकात मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यात सुरू असलेले शीतयुद्ध आता निर्णायक वळणावर आले आहे.सिध्दरामय्या हे मुख्यमंत्रीपद सोडू इच्छित नाहीत आणि डी के शिवकुमार यांना मुख्यमंत्री होण्याची घाई झाली आहे.काँग्रेस नेतृत्वाच्या क्षमतेबाबत पक्षाचे कार्यकर्ते आता उघडपणे बोलू लागले आहेत.काही दिवसांपूर्वी ओडिशातील काँग्रेसचे माजी आमदार मोहंमद मोकीम यांनी काँग्रेसला 'ओपन हार्ट सर्जरी ' ची गरज असल्याचे विधान केले होते.राष्ट्रिय स्तरावरील काँग्रेस नेतृत्वाच्या अपयशावर त्यांनी नेमके बोट ठेवले होते. जमिनीवरील कार्यकर्ता आणि पक्ष नेतृत्व यांच्यात संवाद आणि समन्वयाचा अभाव असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले होते.आपण स्वतः आमदार असतानाही पक्षाचे नेते राहुल गांधी यांना तीन वर्षे प्रयत्न करुनही भेटू शकलो नाही अशी खंत मोकीम यांनी व्यक्त केली होती.बिहारमधील काँग्रेसचे नेते शकील अहमद यांनीही मध्यंतरी राहुल गांधी यांच्यावर थेट टीका केली होती.त्यांनी असे वक्तव्य केले होते की राहुल गांधी यांची इच्छा असली तरी ते काँग्रेसला सध्याच्या दुसऱ्या स्थानावरून खाली उतरवू शकणार नाहीत.याचे कारण इतर विरोधी पक्षांची (प्रादेशिक पक्ष) ताकद त्यांचा प्रभाव असलेल्या राज्यांपुरती मर्यादित आहे.त्यामुळे ते काँग्रेस सध्या ज्या स्थानावर आहे त्याच्या आसपासही पोहचू शकणार नाहीत.भाजपा व्यतिरिक्त भारतभर अस्तित्व असलेला काँग्रेस हा एकमेव पक्ष आहे. एकंदरीत निरनिराळ्या राज्यांतील निवडणुकांत काँग्रेसचा सातत्याने पराभव होत असल्याने, सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची झाले असून, काँग्रेस नेतृत्वाच्या निवडणुका जिंकण्याच्या क्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इंडिया आघाडीचे नेतृत्वही इतर कुणाकडे सोपवण्याच्या मागणीने आता जोर धरला आहे.

**अभय गोखले**

## ग्राहक न्यायालयात लाखो खटले प्रलंबित

ग्राहक व्यवहार राज्य मंत्री बी एल शर्मा यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ग्राहक न्यायालयासंबंधी काही आकडेवारी जाहीर केली आहे. देशभरातील ग्राहक विवाद निवारण आयोगामध्ये सुमारे ५७४००० हुन अधिक खटले प्रलंबित आहेत.वास्तविक सरकारने अलीकडे डिजिटल प्लॅटफॉर्म आणि व्हर्चुअल सुनावणीच्या माध्यमातून खटले निकाली काढण्याचा वेग वाढविल्यानंतरही ही पेंडिंग खटल्याची परिस्थिती कायम आहे. याची वर्गवारी केली असता राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे १६३८२, राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे १२१९२२ आणि जिल्हा ग्राहक निवारण आयोगाकडे ४३६०२९ खटले प्रलंबित आहेत.विशेष म्हणजे राज्य व जिल्हा ग्राहक न्यायालयात एकूण ६४१ पदे रिक्त आहेत.देशातील न्यायालयात इतर खटले सुद्धा मोठ्या संख्येने पेंडिंग आहेत. अनेक ठिकाणी न्यायाधीशांच्या जागा मोकळाच आहेत. आता ग्राहक न्यायालयात सुद्धा तीच परिस्थिती आहे. केव्हाही न्याय हा वेळेवरच मिळावयास हवा अनेक खटल्यांचे निकाल वर्षानुवर्षे पेंडिंग असतात. यासाठी सरकारने एखादी कमिटी नेमून काय उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा विचार करणे आवश्यक आहे.

**शांताराम वाघ**

# संवाद

## तिथीचे महत्त्व

मानव-निर्मित इंग्रजी कालगणनेच्या तुलनेत ईश्वर निर्मित हिंदू कालगणना अधिक शास्त्रीय आहे. याच कालगणनेवर ऋतूचक्र, भरती-ओहोटी, मानवी मनाची स्थिती आदि देखील अवलंबून आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती-पुण्यतिथीच काय तर आपला वाढदिवस तसेच घरातील एखाद्याच्या मृत्युला तिथीनुसारच श्रद्धांजली व श्राद्धकर्म आदि केले पाहिजे! असे या शिवजयंतीच्या निमित्ताने होणे गरजेचे आहे. आपल्या संस्कृतिचा अभिमान शास्त्र समजून बाळगल्यास हा स्वाभिमान अधिक बळकट होईल यात शंका नाही!

**आदिती देखणे**

## सपकाळांचा जावईशोध.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा इथे बोलताना एक वादग्रस्त विधान केले आहे. त्यांच्या मतानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला. त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी देखील महाराजांच्या तोलामोलाचे कार्य केल्यामुळे त्यांनाही महाराजांच्या मांदियाळीत बसवले पाहिजे. टिपू सुलतान यांनीही इंग्रजांविरुद्ध लढा पुकारल्याने ते शौर्य गाजवणारे योद्धे आणि भूमिपुत्र होते. त्यांनी कधीही कोणत्याही विषारी आणि विखारी विचारांना थारा दिला नाही. यासाठीच त्यांना शौर्याचे लक्षण म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे दर्जा मिळायला पाहिजे.

सपकाळ यांच्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे. त्यांनी जनतेची माफी मागितली पाहिजे. त्यांनी केलेले कृत्य अत्यंत निंदनीय आहे. अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून जनतेला मुघलांच्या जोखडातून मुक्त केले.

अत्याचारी टिपू सुलतानाचा कळवळा येणाऱ्या सपकाळांच्या विधानामुळे टिपू सुलतानाशी त्यांचे काहीतरी रक्ताचे नाते असावे किंवा टिपू सुलतान हा सपकाळांचे आजोबा, काका, मामा असे कोणी जवळचे नातेवाईक आहेत का? हे पडताळून पाहिले पाहिजे.

**भीमराव साळुंखे.**







## छत्रपती शिवरायांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ अशोक उईके यांचे छत्रपती शिवरायांना अभिवादन

# 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने दुमदुमले शिवतिर्थ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त येथील शिवतिर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या शिवजयंतीच्या निमित्ताने संपूर्ण शिवतिर्थ परिसर शिव ध्वजाने आणि रोषणाईने उजळून निघाला. यावेळी शिवप्रेमींच्या 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला. तसेच छत्रपती शिवरायांच्या जयंतीदिनी आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ अशोक उईके यांच्यासह मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देवून अभिवादन केले. या निमित्ताने गुरुवारी आयोजित 'छत्रपती महोत्सवाचे' उद्घाटनही नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते पार पडले.

सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने या तीन दिवसीय 'छत्रपती महोत्सवा' चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात १८ व १९ फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा पार पडल्या. यात शिवसामान्य ज्ञान स्पर्धा, शिवतीर्थ रिल्स स्पर्धा, शिव निबंध स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, शिवकाव्य स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा, वेशभुषा स्पर्धा, शिव वक्तृत्व स्पर्धा, पुरस्कार वितरण, शिव मॅराथॉन स्पर्धा, मोटर सायकल रॅली, चित्रकला स्पर्धा, कराटे स्पर्धा, रक्तदान शिबीर, आदर्श शोभा यात्रा, संगीत स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ २० फेब्रुवारी रोजी होणार आहे. या छत्रपती महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन शिवरायांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. यानंतर 'छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती व आजचे वास्तव' या विषयावर दिल्ली येथील पत्रकार व राजकीय विश्लेषक अशोक वानखडे यांनी व्याख्यानातून शिवरायांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. तसेच यावेळी त्यांच्या हस्ते उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा देखील सन्मान करण्यात आला. या छत्रपती महोत्सव कार्यक्रमाला जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, हाउसिंग फायनान्सचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, ओबीसी आरक्षण समितीचे विदर्भ अध्यक्ष प्रदीप वादाफळे आदी मान्यवर व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### छत्रपती शिवरायांना आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ अशोक उईके यांचे अभिवादन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी १९ फेब्रुवारी रोजी यवतमाळ येथील शिवतिर्थ येथे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ अशोक उईके यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच कराटे स्पर्धेचे उद्घाटन व मोटर सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले. या छत्रपती महोत्सवात सहभागी होत आमदार बाळासाहेब मांगुळकर, नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तहसिलदार डॉ योगेश देशमुख, मुख्यधिकारी शुभम क्यातमवार आदी मान्यवरांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## वेचक

### जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



यवतमाळ - राज्याचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी साजरी करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, तहसिलदार विद्या शिंदे आदी अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### पोलीस ठाण्यात शिवजयंती साजरी



बाभुळगाव - येथील पोलीस ठाण्यात शिवजयंती मोठया उत्सहात साजरी करण्यात आली. यावेळी ठाणेदार दीपमाला भेंडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शिवाजी महाराज यांच्या फोटोचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण केली. यावेळी पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे, सहायक पोलीस निरीक्षक रोहित भेंद्रे, उप पोलीस निरीक्षक विकी जाधव, राजू कुडमेथे,विजय लोखंडे, निलेश भुसे,कळसकर, तिवाडे भेंडारकर आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### बोरगांव येथे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सातेगाव संघाचा विजय



यवतमाळ - बोरगांव येथे संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त जय मानुदास क्रीडा मंडळाच्या वतीने एकदिवसीय स्टोक पद्धतीचे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या स्पर्धेला राज्यातून मोठा प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे उद्घाटन माजी सभापती राजू वीरखेडे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादीचे नेते साजिद बेग यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन महल्ले, बोरगांवचे सरपंच नरेश राठोड, युवा उद्योजक विश्वजीत राठोड, बालकिशन पवार, रमेश चव्हाण, कवडू राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण २४ संघांनी सहभाग नोंदविला होता. दिवसभर आणि रात्रभर रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यांनंतर अंतिम फेरीत सातेगाव विरुद्ध घोन्सा असा सामना रंगला. अत्यंत चुरशीच्या लढतीत नेहरू युवा सातेगाव संघ यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदावर आपले नाव कोरले. घोन्सा संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

## यवतमाळमध्ये "जय शिवाजी" पदयात्रा उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - छत्रपती शिवाजी महाराज जयंती (दि. १९ फेब्रुवारी) निमित्त केंद्र शासनाच्या युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार तसेच राज्य शासन यांच्या निर्देशानुसार "जय छत्रपती शिवाजी" पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्र व राज्याच्या शाश्वत विकासात युवांचे मोलाचे योगदान लक्षात घेऊन युवांमध्ये नेतृत्वगुण, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवा भाव, राष्ट्रभावना, सामाजिक सलोखा, स्वच्छता व पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करणे तसेच कला, संस्कृती व परंपरा जतन करण्याचा संदेश या पदयात्रेद्वारे देण्यात आला. राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांचे कार्य युवा पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ तसेच विविध शासकीय कार्यालये, शाळा व महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, गोधनी रोड, यवतमाळ येथे कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्यास व प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांच्या हस्ते पदयात्रेला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी क्रीडा अधिकारी महेश पडोळे, चैताली लोखंडे, कल्याणी रत्नपारखी, शासकीय तंत्रनिकेतनचे विभाग प्रमुख प्रा. पागोडे , प्रा. पवार यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेतील कॅडेट्स तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी, युवक व नागरिक यांनी पदयात्रेत सहभाग नोंदविला.

## भारत मुक्ती मोर्चा व सहयोगी संघटनेच्या वतीने २२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथील रा.स्व.सं. मुख्यालयावर महारॅली !

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान ४५ वे बामसेफ व १५ वे भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अधिवेशन ओडिशा राज्यातील कटक येथील बाली यात्रा मैदान येथे वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. सदर अधिवेशनासाठी शासन-प्रशासनाकडून सर्व आवश्यक परवानग्या विधिवत प्राप्त झालेल्या होत्या.

अधिवेशनाच्या तयारीसाठी संघटनेने कोट्यवधी रुपये खर्च करून संपूर्ण तयारी पूर्ण केली होती व शेकडो कार्यकर्ते अधिवेशनस्थळी पोहोचले होते तसेच हजारो कार्यकर्ते मार्गस्थ होते किंवा येण्याच्या तयारीत होते. मात्र अचानक कटक प्रशासनाने स्थानिक आर.एस.एस. व भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या दबावामुळे अधिवेशनाच्या सर्व परवानग्या रद्द केल्या. परिणामी अधिवेशन होऊ शकले नाही. ही कृती भारतीय संविधानातील अनुच्छेद १९(अ)(१) (२)(३) अंतर्गत प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचे उघड उल्लंघन आहे. आर.एस.एस. व भाजपा यांच्याकडून अशा प्रकारचे संविधानविरोधी प्रकार वारंवार घडत असल्याच्या निषेधार्य भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी चार टप्प्यात आंदोलनाची घोषणा केलेली आहे. त्या चौथ्या टप्प्याअंतर्गत दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथे संघ मुख्यालयावर विशाल महामोर्चा आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनास भारतातील मुलनिवासी बहुजन समाजातील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, शेतकरी, असंघटित कामगार संघटना तसेच भाजपा वगळता अनेक राजकीय पक्षांचे समर्थन लाभले आहे. अनेक संघटनांनी समर्थन पत्रेही दिलेली आहेत. या ऐतिहासिक महामोर्चात लाखो बंधू-भगिनी सहभागी होणार आहेत, या विशाल महामोर्चाचे नेतृत्व वामन मेश्राम(राष्ट्रीय अध्यक्ष, भारत मुक्ती मोचौ नई दिल्ली) चौधरी विकास पटेल, (राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, नई दिल्ली) ही महारॅली संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी आयोजित करण्यात आलेली असून भारतीय नागरिकांना प्राप्त संवैधानिक मूलभूत अधिकारांचे संरक्षण व्हावे तसेच मुलनिवासी बहुजन समाजाच्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित रहावे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

### महारॅलीचे प्रमुख मुद्दे

ओडिशा राज्यातील कटक येथे रद्द करण्यात आलेल्या अधिवेशनास पुनः परवानगी द्यावी. ओबीसीसह सर्व जातींची जातिनिहाय जनगणना करण्यात यावी. भारतातील सर्व निवडणुका ईव्हीएम मशीनऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांना संपूर्ण संरक्षण मिळावे. अधिवेशनाच्या तयारीसाठी संघटना, प्रतिनिधी व कार्यकर्त्यांना झालेल्या खर्चाची भरपाई करण्यात यावी. मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या ओडिशा राज्य सरकारला अनुच्छेद३५६ अन्वये बरखास्त करण्यात यावे.अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा,बहुजन क्रांती मोर्चा यांच्या वतीने देण्यात आली आहे.

## रुंझा सरकारी रुग्णालय येथे मुख्यालयी कर्मचारी नसल्याने रुग्णाची हेळसांड



### गटविकास अधिकारी यांना विजय खापर्डे यांचे निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या रुंझा सरकारी रुग्णालय येथे संध्याकाळ रोजी डॉक्टर,कर्मचारी राहत नसल्यासबाबत गटविकास अधिकारी यांना दि.१६ फेब्रुवार सोमवार रोजी विजय खापर्डे यांनी निवेदन दिले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रुंझा सरकारी रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत आहे.

याबाबत संबंधितांवर योग्य कारवाई करण्यात यावे व त्यांना मुख्यालयी राहने बंधनकारक आहे.जर एखादा रुग्ण दगावला तर जबाबदारी कोण घेईल.तालुक्यातील रुंझा सरकारी रुग्णालयात रामपूर (कारेगाव), मोहदरी, जोगीदंकवळा, जिरा, मिरा, वाठोडा, दाभा, पाथरी, वृंदावन (टाकळी), श्यामपुर तांडा असे अनेक गावातील रुग्ण रुंझा सरकारी रुग्णालयात ये-जा करत असतात. रुग्णालयात संध्याकाळी किंवा रात्री कर्मचारी, डॉक्टर उपलब्ध नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची मोठी हेळसांड होते. उपचारास विलंब, औषधे न मिळणे आणि सुरक्षेचा अभाव यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होत असुन वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, रामपूर (कारेगाव)येथील ११ फेब्रुवारी रोजी एका मुलाचा अपघात झाला त्यावेळीस रुग्णालयात एकही कर्मचारी उपस्थित नव्हते त्याच्यावर योग्य उपचाराकरिता यवतमाळ येथे रुग्णालयात पाठविण्यात आले. जनतेच्या कामांसाठी शासनाने मुख्यालयी राहण्याबाबत आदेश केले असले तरी रुंझा सरकारी रुग्णालय संध्याकाळ रोजी डॉक्टर, कर्मचारी राहत नसल्यासने रुग्णांची गैरसोय होत असुन त्यामुळेच आपल्याच मार्पत सक्त आदेश देण्यात यावेत असे निवेदन गटविकास अधिकारी यांना विजय खापर्डे यांनी दिले आहे.

## श्रीरामानंतर महिलांचा आदर करणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवराय : ॲड.माधवराव माने यांचे प्रतिपादन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - प्रभु श्रीरामानंतर महिलेचा आदर करणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवराय आहेत असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.माधवराव माने पाटील यांनी केले आहे.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या जयंतीनिमित्त हिवरा (संगम) येथील छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण व चौक सौंदर्यीकरण कामाच्या लोकार्पण सोहळ्यात उद्घाटक म्हणुन ते बोलत होते.पुढे बोलतांना ॲड.माने म्हणाले की,आज देशात महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असुन याला आळा घालण्याकरिता छत्रपती शिवरायांनी ज्या प्रमाणे महिलेवर अत्याचार करण्याचे हातपाय तोडले व जरब बसविली, परस्त्रीस मातेचा दर्जा दिला.तीच शिकवण सताधाऱ्यांनी अंमलात आणण्याची गरज आहे. जगात प्रभु श्रीरामानंतर परस्त्रीचा आदर करणारा एकमेव राजा जर कोणी असेल ते छत्रपती शिवराय आहेत.आज देशातील तरुण पिढीला छत्रपती शिवरायांचे विचार अंगीकारण्याची गरज आहे तेव्हाच स्वराज्याचे सुराज्य निर्माण होईल असे ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ.नामदेवराव ससाणे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, ॲड.रमेश पाटील, ॲड.अनिल माने,माजी जि. प.सदस्य साहेबराव पाटील, माजी जि. प. सदस्या,जिल्हा बँकेच्या संचालिका सौ.स्मिताताई साहेबराव पाटील, सरपंचा सौ.मेघाताई शिरीष बोरुळकर, उपसरपंच शरद पाटील, पोलिस पाटील प्रविण कदम ,माजी सभापती ललिताबाई वसंतराव जामकर, शिवसेना तालुका प्रमुख रविंद्र भारती,पत्रकार गजानन वाघमारे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुकुंद पांडे,विजय बोंपिलवार,शफीसेठ सुरैय्या,अशोक जयस्वाल, ग्रा. पा. सदस्य पंजाब पाटील, राजु धोतरकर,अशोक पाटील, माजी सरपंच डॉ. धोंडेराव बोरूळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला गावकरी मंडळी,शिवभक्त ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहेबराव पाटील यांनी केले आहे संचलन राजु गिरी यांनी केले तर आभार महेश कामारकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी छत्रपती शिवराय चौक समितीचे अध्यक्ष देवेंद्र कदम,उपाध्यक्ष सुनिल चव्हाण,सचिव महेश कामारकर,कोषाध्यक्ष मुकुंद जामकर,सहसचिव माजी सरपंच प्रविण जामकर ,सदस्य किरण काळे,अनिल मुडेवाड, निलेश करमोडकर,शेख फिरोज,रोहित फाळके, संतोष पिंपळे,सुदर्शन कदम, प्रदीप कदम,विनोद कदम, सोनु भैसे यांनी अथक परिश्रम घेतले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/३६/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

### जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख नजीर शेख युसुफ रा. उमरखेड** ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्व:ताचे नामे **शेख नजीर शेख युसुफ मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १४.१२.१९७१ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ०५/०३/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

## शिपाई भरती व कर्मचारी नियुक्ती वादावर पडदा

### प्रशासनाच्या ग्वाहीनंतर आमरण उपोषणाची सकारात्मक सांगता, ग्रामपंचायत निर्णय स्पष्ट



**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - ग्रामपंचायत वनोजा येथील कर्मचारी नियुक्ती प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती राळेगाव कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाची अखेर सकारात्मक सांगता झाली. प्रशासनाने दिलेल्या स्पष्ट ग्वाहीमुळे आणि ग्रामपंचायतीची भूमिका स्पष्ट झाल्यानंतर उपोषणकर्ते जितेंद्र खोडे, विकास घिनमिने, सुरज किन्हेकर आणि श्रीकांत बेलखडे यांनी प्रशासनावर विश्वास व्यक्त करत उपोषण मागे घेतले.

ग्रामपंचायत वनोजा येथे कर्मचारी नियुक्तीबाबत ग्रामपंचायत सभेत चर्चा होऊन संबंधित कर्मचाऱ्याला रोजंदारी तत्त्वावर कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. स्थायी नियुक्तीबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याने काही गैरसमज निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर संतप्त युवकांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. यासंदर्भात गटविकास अधिकारी केशव पवार व ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत, संबंधित प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेशी निगडित असण्याची शक्यता असल्याने सध्या स्थायी नियुक्ती करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले. शासन नियम व ग्रामपंचायत सभेच्या मंजुरीनंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी ठोस ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली. प्रशासनाच्या या स्पष्ट भूमिकेनंतर आणि सकारात्मक संवादामुळे उपोषणकर्त्यांनी प्रशासनाच्या आश्वासनावर समाधान व्यक्त केले व उपोषणाची सांगता करण्याचा निर्णय घेतला. यावेळी विस्तार अधिकारी म्हस्के, ग्रामपंचायत सरपंच मालुताई कोटनाके, ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले, माजी उपसरपंच प्रफुल तायवाडे, विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे, गजानन मुरस्कार, अविनाश बेलखडे, सतिश वाळके, दिनेश कोटनाके, लक्ष्मीकांत उत्तरवार व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### मध्यस्थीमुळे तोडगा, संवादातून निर्माण झाला विश्वास

ग्रामपंचायत वनोजा येथील कर्मचारी नियुक्ती वादावर तोडगा काढण्यात विस्तार अधिकारी म्हस्के, ग्रामपंचायत सचिव सुबोध चांगले आणि दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली. उपोषणकर्ते जितेंद्र खोडे, विकास घिनमिने, सुरज किन्हेकर आणि श्रीकांत बेलखडे यांच्याशी समन्वय साधत प्रशासन व ग्रामपंचायत यांच्यात सकारात्मक संवाद घडवून आणण्यात आला. प्रशासनाची स्पष्ट भूमिका आणि माध्यमांच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे उपोषणकर्त्यांचा विश्वास निर्माण झाला आणि तणावपूर्ण परिस्थिती शांततेत निवळून आमरण उपोषणाची सकारात्मक सांगता झाली.

## विशुद्ध विद्यालय संस्थेच्या नव्या संचालक मंडळाची फेरनिवड



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - विशुद्ध विद्यालय, यवतमाळ या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी नव्या कार्यकारिणीची नुकतीच अविरोध निवड करण्यात आली. बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी नूतन संचालक मंडळाने अधिकृतरित्या पदभार स्वीकारला. संस्थेचे संस्थापक स्व. बाबाजी दाते यांनी रुजविलेल्या शैक्षणिक परंपरेला पुढे नेण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला. सात पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या मंडळात अध्यक्षपदी विनायक श्रीकृष्ण दाते यांची फेरनिवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष-अखिलेश वसंतराव पेशवे, सचिव-विजय दामोदर कासलीकर, सहसचिव - मीरा मंगेश केळकर, कोषाध्यक्ष-मंगेश शरदराव केळकर, सदस्य, सुषमा विनायक दाते, मनीषा दाते-साठे, नवीन कार्यकारिणीमार्फत संस्थेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सर्वांगीण विकासाला गती देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

## संक्षिप्त

### शैक्षणिक साहित्याचे वाटप



**धामणगाव रेल्वे**-त्रिपुरा त्रिशक्ती पीठ, विरुळ-रोंघे मंदिर येथे आदिमाता शक्ती प्रतिष्ठान तर्फे आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीनिमित्त वह्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन मिळावे आणि अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमावेळी आदिमाता शक्ती प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच आदर्श महाविद्यालयाचे शिक्षकवृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करून प्रतिष्ठानचे आभार मानले.समाजोपयोगी आणि शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना सतत मदत करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने यावेळी व्यक्त केला.

### आदर्श सरपंच पुरस्काराने कविता खंगार यांचा गौरव

**चांदूर रेल्वे**- सातेफळ येथील सरपंच कविता प्रमोद खंगार यांना नालंदा ग्रामसमृद्धी सन्मान सोहळा २०२६ मध्ये 'आदर्श सरपंच' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सोहळा पुणे येथील पत्रकार भवन, नवी पेठ येथे उत्साहात पार पडला.नालंदा ऑर्गनायझेशनच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठेच्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात



उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यावेळी जितेंद्र दाते (ए.आर.जे. ग्रुपचे चेअरमन), केके हॉस्पिटलच्या सीईओ माधुरी शेटे तसेच महेश नेमणे यांच्या हस्ते कविता खंगार यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.सातेफळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावात राबविण्यात आलेली विकासकामे, स्वच्छता अभियान, पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा, महिला सक्षमीकरण तसेच ग्रामस्थांच्या सहभागातून उभारलेले विविध उपक्रम याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अमरावती**- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संविधान जागृती प्रश्न मंजूषा २०२५-२६ या उपक्रमांतर्गत ऑन लाईन संविधान प्रशिक्षणाचे



आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश (नागपूर खंडपीठ) न्या. एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन केले.न्या. श्रीमती एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.विशेष सत्रात न्या. आर. सी. चव्हाण, न्या. पृथ्वीराज चव्हाण, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी आयुक्त समाज कल्याण इ. झेड. खोब्रागडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.संचालन मोनाल अ. थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली.

### उद्या प्रा. प्रवीण देशमुख यांचे शिवव्याख्यान

**चांदूर रेल्वे**- शिवजयंतीनिमित्त २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर शिवरंभ कथा, भक्ती आणि कला (महाराष्ट्र लोककला) यांचे अनोखे मिश्रण आणि प्रसिद्ध शिव व्याख्याते प्रा. प्रवीण देशमुख यांचे शिव व्याख्यान आयोजित केले जाईल. शिव, शाहू, फुले, आंबेडकर जयंती उत्सव समितीने सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयात शिवजयंती



**अमरावती**- शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांच्या अतिभव्य अशा तैलचित्राचे पूजन करून कृष्णा शेलार याने शिव गर्जना सादर केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ढोल पथकांनी अतिशय सुंदर सादरीकरण केले.यावेळी मंचावर मा.जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी,महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख, कार्यक्रम प्रभारी प्रा.प्रहेश देशमुख राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश देशमुख ,प्रा. मीरा ठोके उपस्थित होत्या.

यावेळी पायल आवारे, सृष्टी चांदणे, प्रतिक टारगे या विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आपले मनोगत व्यक्त केले. प्रा.दिनेश देशमुख, प्रा.मीरा पांडे,प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांनी अध्यक्षिय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन सृष्टी सरोदे, प्रास्ताविक साक्षी घुगे, आभारप्रदर्शन आकांक्षा भटकर हिने केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर ,प्रक्षेत्रावरील कर्माचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# अमरावती अतिरिक्त ग्रामीण तहसील कार्यालय निर्मितीला मंजुरी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण आणि महसूल विभागांचा वाढता व्याप लक्षात घेता नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय व अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांच्या निर्मिती करिता नुकतीच राज्य शासनाच्या द्वारे मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. यामध्ये अचलपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय व अमरावती तहसीलचे विभाजन करून अतिरिक्त तहसीलदार कार्यालय निर्माण करण्याबाबत शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

अमरावती तहसील कार्यालयाचे विभाजन करून अतिरिक्त तहसील कार्यालय व मोर्शी तहसीलचे विभाजन करून नेरपिंगळाई येथे अप्पर तहसील कार्यालय निर्माण करण्याबाबत तिवसा विधानसभेचे आमदार राजेश वानखडे यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केलेली होती.

यापैकी अमरावती येथे अतिरिक्त तहसील कार्यालय निर्माण करिता शासनाने आता मंजुरी प्रदान केलेली आहे. आमदार राजेश वानखडे यांच्या मागणीला शासन स्तरावरून हिरवी झेंडी मिळाल्यामुळे आता अमरावती तहसीलच्या वाढत्या व्यापातून नागरिकांची सुटका होऊन ग्रामीण भागाकरिता नागरिकांना त्यांना हक्काचे अतिरिक्त अमरावती तहसील कार्यालय मिळणार आहे.



**आ. राजेश वानखडे यांचे मागणीला यश**

त्याचप्रमाणे मोर्शी तहसीलचे विभाजन करून नेर पिंगळाई येथे सुद्धा अतिरिक्त तहसील कार्यालय निर्माण करण्याबाबत आमदार राजेश वानखेडे यांनी मागणी केलेली होती परंतु माजी सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांचे समितीच्या शिफारशी व निकषांच्या अनुषंगाने मुख्यालयापासून शेवटच्या गावाचे असलेले अंतर या बाबींची व निकषांची पूर्तता न झाल्याने मंजूर होऊ शकले नाही. तूर्तास अतिरिक्त अमरावती तहसील निर्माणाचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे. नेर पिंगळाई येथे सुद्धा अतिरिक्त तहसील कार्यालय स्थापन करणे बाबत येणाऱ्या काळात शासन स्तरावर पाठपुरावा करणार असून नेर पिंगळाई येथे अप्पर तहसील कार्यालय विशेष बाब म्हणून मान्यता देण्याकरिता शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येणार आहे.

अतिरिक्त अमरावती तहसील निर्माणाचा निर्णय घेतल्याबद्दल आमदार राजेश वानखडे यांनी मुख्यमंत्री यांचे आभार व्यक्त केले.


या मागणीच्या अनुषंगाने गेल्या वर्षीच अद्यावत प्रस्ताव राज्य शासनाकडे जिल्हाधिकारी अमरावती यांच्या वतीने सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्ताव व दांगट समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने पात्र ठरून अमरावती तहसील कार्यालयाचे विभाजन करून अतिरिक्त तहसीलदार अमरावती असे नवीन तहसील कार्यालय निर्माण करण्याकरिता शासनाने मंजुरी दिल्यामुळे आता अमरावती तालुक्याचा प्रशासकीय कारभार हा सुटसुटीत होणार असून ग्रामीण भागातील व प्रामुख्याने दिवसा विधानसभा मतदारसंघातील समाविष्ट अमरावती तालुक्यातील गावांना याचा मोठा फायदा होणार आहे.

# आ.प्रताप अडसड यांनी घेतला बेंबळा प्रकल्पाचा आढावा

## अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हा धिकारी यांचे दालनात आमदार प्रताप अडसड यांचे अध्यक्षते खाली व अपर जिल्हाधिकारी, अमरावती तसेच उपजिल्हा धिकारी, पुनर्वसन, अमरावती यांचे उपस्थितीत बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचा पुनर्वसन व भूसंपादनाचा आढावा घेतला.



बेंबळा प्रकल्पांतर्गत चांदूर रेल्वे तालुक्यातील मौजा येरड येथील पुनर्वसन मौजा ओंकारखेडा व खरबी येथे करण्यात आले. त्यापैकी मौजा ओंकारखेडा येथे सर्वे नंबर ६१ व ६२ तसेच मुंडबारी सर्वे नंबर ५१ मधील अभिन्यासात भूखंड वाटप करण्यात आले आहे. प्राप्त भूखंडाचे ७/१२ व ८ अ तयार न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचीत राहत असल्याचा मुद्दा चर्चेत आला असता, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालयाकडून मोजणी न झाल्यामुळे कमी जास्त पत्रक तयार करता आले नाही. त्यामुळे सात बारा व आठ अ तयार करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. येत्या आठवडेयाभरात अभिन्यास मोजणीची फी भरणा करण्याबाबत कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना निर्देश दिले.

धामक या गावाचे पूर्वी अंशतः संपादन करणे प्रस्तावित होते. सदर गावाचे पुनर्वसन प्रक्रीया अंतीम टप्प्यात होती. त्यादरम्यान मुख्यमंत्री यांची २८ मे २०१५ रोजी बेंबळा प्रकल्पस्थळी दिलेल्या भेटी दरम्यान मौजा धामक गावाचे पूर्णतः आदर्श पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले. त्याअनुषंगाने सदर गावाची पुनर्वसन प्रक्रिया प्रगतीपथावर होती. त्यानंतर प्रकल्पाची संचय पातळी १.५० मी. ने कमी करण्यात येऊन २६८ मी. करण्यात आली. त्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन रद्द करण्यात आले होते. सद्यस्थितीत धामक गावाचे पुर्णतः पुनर्वसन करण्याचे प्रस्तावास नियामक मंडळाची २४ सप्टेंबर २०२४ रोजीच्या बैठकीनुसार मान्यता प्राप्त असून सदर गावाची पुनर्वसनाची कार्यवाही मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

भूसंपादन प्रस्ताव यंत्रणेमार्फत सादर केलेला असून त्याबाबतची संयुक्त मोजणी ची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने ती लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतच्या सूचना आमदार महोदयांनी दिल्यात. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मौजा एकलारा, झिबला, बेलोरा, येरड, घुईखेड, सावंगा (बु.), टिटवा व धामक या ८ ही गावांना दर्जेदार नागरी सुविधा पुरविणे तसेच मौजा धामक चे आदर्श पुनर्वसनाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे तसेच पुनर्मुल्यांकन करणे बाबत ही निर्देश प्रताप अडसड यांनी दिलेत.बैठकीस अपर जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) श्रध्दा उदावंत (उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे), बेंबळा प्रकल्प यवतमाळचे कार्यकारी अभियंता सागर काळे, भूमि अभिलेख नांदगाव खंडेश्वरचे उपअधिक्षक निशांत नागरगोजे तसेच पुनर्वसित गावातील प्रकल्पग्रस्त संदीप सोळंके, संबंधित मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व पुनर्वसन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

**विद्यापीठाचा संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२५**

## संस्था गटात बुलढाणा येथील दिव्या फाऊंडेशनला, व्यक्ती गटात मनिष पावडे यांना जाहीर



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीत नमूद संदेशाप्रमाणे केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्या बद्दल दिला जाणारा 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५' जाहीर झाला असून गुरूवार, २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठातील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह येथे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व.द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२५' यावर्षी संस्था गटातून दिव्या फाऊंडेशन, वरवंड, जि. बुलढाणा या सामाजिक संस्थेला, तर व्यक्ती गटातून अमरावती येथील सामाजिक कार्यकर्ते मनिष पावडे यांना घोषित झाला आहे. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व दानदात्यांचे प्रतिनिधी तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

# राज्यातील शाळांची संचमान्यता ऑक्टोबर २०२५ च्या पटानुसार होणार

## शिक्षण संचालक शरद गोसावी यांची माहिती

**अमरावती/का.प्र.**

पुणे येथील शिक्षण संचालक (प्राथमिक) कार्यालयात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य नेते उदयजी शिंदे आणि जिल्हाध्यक्ष प्रमोद तौंदकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण संचालक शरद गोसावी यांची भेट घेतली.



यावेळी झालेल्या चर्चेत महाराष्ट्रातील इतर जिल्हात व कोल्हापूर जिल्ह्यातील संच मान्यतेतील त्रुटीमुळे ६८ शाळा प्रभावित झाल्या होत्या. या शाळांबाबत सविस्तर चर्चा झाल्यामुळे झालेली चुकीची संच मान्यता दुरुस्त होऊन ती २३ ऑक्टोबर, २०२५ च्या पटावरच नवीन संच मान्यता रन होऊन दोन दिवसात फायनल ड्राफ्ट जिल्ह्याला येईल असे आश्वासन शरद गोसावी यांनी दिले.या निर्णयामुळे राज्यातील सर्व शाळांना फायदा झाला असून शिक्षक आता अतिरिक्त होणार नाहीत. यासाठी कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले.यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे या ठिकाणी भेट देण्यात आली. शिक्षक समितीने इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये इंग्रजीच्या पेपरमध्ये प्रश्नांसमोर मराठीत सूचना असाव्यात, अशा आशयाचे निवेदन आयुक्तांना देऊन चर्चा केली. इयत्ता चौथीच्या मुलांचा वयोगट,त्याचा ग्रामीण भाग लक्षात घेऊन प्रश्नाचा नेमका अर्थ लक्षात येण्यासाठी मराठीत सूचना दिली तर मुलांना प्रश्न समजणे सोपे होऊन गुण वाढण्यास मदत होणार आहे. त्यावेळी परीक्षा आयुक्त महेश चोथे आणि परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकुमार बेडसे यांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शिक्षक समितीच्या या प्रयत्नांमुळे मोठे यश मिळाले असून शिक्षक वर्तुळात समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी राज्य नेते उदय शिंदे,जिल्हाध्यक्ष प्रमोद तौंदकर,पुणे विभागाचे प्रसिद्धी प्रमुख हरिदास वर्णे, शिरोळचे तालुकाध्यक्ष विनायक मगदूम, प्रशांत देवरुखकर,तन्मय विनायक मगदूम उपस्थित होते. असे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# नांदगाव खंडेश्वर येथे मुद्रांक विभागाचा जनता दरबार

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

येथे मुद्रांक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला जनता दरबार उत्साहात पार पडला.मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी नागरिकांच्या विविध तक्रारी व समस्या समजून घेत त्वरित व प्रभावी निराकरण केले.



## नागरिकांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण

या जनता दरबारात मुद्रांक विभागांतर्गत दस्त नोंदणी, मुद्रांक शुल्क, दुहेरी नोंदणी, वारस नोंदी, तसेच नियमितीकरणा संबंधी नागरिकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात मांडण्यात आल्या.शासनाच्या सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित प्रकरणांवर तात्काळ निर्णय देण्यात आला. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.या प्रसंगी मुद्रांक विभागाचे दुय्यम निबंधक रुपेश बनसोड, कनिष्ठ लिपिक कुंडलिक राठोड व सारिका भेंडे,नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर, नगरसेवक प्रकाश मारोटकर, माजी नगरसेविका सीमा जाधव, दत्तलेखक तसेच मुद्रांक विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालन सारिका भेंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी नागरिकांना शासनाने दिलेल्या सूचनांनुसार दस्त नोंदणी व मुद्रांक शुल्कासंबंधी योग्य प्रक्रिया अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले.या जनता दरबारामुळे सामान्य नागरिकांना एकाच ठिकाणी समस्या मांडण्याची व त्यावर त्वरित उपाय मिळण्याची संधी मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# वन पेंशन योजना लागू करण्याकरीता धरणे आंदोलन

**अचलपूर/वार्ताहर**

मेळघाटातील वनात ३० वर्ष काम करणाऱ्या मजुरांना वन पेंशन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी असंख्य वनमजूर गेल्या दोन दिवसापासून अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलनावर बसलेले आहे . आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषण स्थळी उपोषणकर्त्यांची भेट घेतली .

यावेळी उपोषणकर्त्यांनी विविध समस्या आमदार प्रवीण तायडे यांच्या समक्ष मांडले . यावर



**आ.प्रवीण तायडे यांनी घेतली उपोषण कर्त्यांची भेट**

आमदार प्रवीण तायडे यांनी तात्काळ राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची स्वतः भेट घेऊन हा मुद्दा मांडून उपोषणकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.पण शासन स्तरावर या मागणीचा जोपर्यंत तोडगा निघत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार अशी भूमिका उपोषण कर्त्यांची आहे.उपोषणकर्त्यांनी या मागणीचे निवेदन अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी कार्यालय यांना ही दिलेले आहे. आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषणकर्त्यांशी संवाद साधून विविध विषयावर चर्चा केली आणि शासन सकारात्मक निर्णय यावर घेणार असे आश्वासनही यावेळी उपोषण करताना आमदार प्रवीण तायडे यांनी दिले.

# डिलिव्हरीची स्पर्धा कुठे नेणार?



**क्विक कॉमर्स कंपन्यांमधील तीव्र स्पर्धेमुळे जलद वितरण हाच अंतिम मापदंड बनला आहे. केंद्र सरकारने दहा मिनिटांच्या डिलिव्हरी संकल्पनेबाबत इशारा दिला असला तरी वेगाचा दबाव कायम आहे. सतत धूळ, प्रदूषण, कडक उन्हात फिरल्याचा परिणाम त्यांच्या त्वचेवर आणि फुफ्फुसांवर होतो. एवढे करून दिवसाला ५०० रुपये कमावणेही अवघड बनत आहे. या यंत्रणेतील नव आव्हानांचा हा तपशीलवार मागोवा**

**क्वि**क कॉमर्स कंपन्या म्हणजे आपण मोबाइल फोनवरच्या अॅपवरून ऑर्डर केलेल्या वस्तू दहा ते पंधरा मिनिटांमध्ये आपल्याला घरपोच देणाऱ्या कंपन्या. सध्या या कंपन्यांचे चांगलेच पेव फुटले आहे. सोशल मीडियावर त्यांच्या जाहिरातींचा भडिमार सुरू असतो. कोणतीही वस्तू घरबसल्या दहा मिनिटांमध्ये हातात मिळते म्हणून ग्राहकही खूश आहेत. विशेष म्हणजे अगदी पाण्याची बाटली, टूथपेस्ट यासारख्या लहानसहान वस्तूही झटपट मागवता येतात. म्हणजे मागवायच्या वस्तूंची यादी पूर्ण तयार होईपर्यंत थांबायची गरज नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर घरात पाहणे आले आहेत, पावभाजी करून झाली आहे आणि पावाला लावायला बटर शिल्लक नसल्यास पटकन बटर ऑनलाइन मागवून पाहुण्यांना काही कळायच्या आत बटर लावलेल्या गरमागरम पावांबरोबर भाजी 'सर्व्ह' करता येते, शिवाय अनेकदा या वस्तूंवर डिलिव्हरी शुल्कही मोजावे लागत नाही आणि किमतीत सवलतही पदरी पडते. हे कमी म्हणून की काय, आपण ग्राहक म्हणजे या कंपन्यांसाठी देवासारखेच (सध्या तरी) असतो. त्यामुळे कोणत्याही वस्तूची डिलिव्हरी घेतल्यानंतर त्याला 'रेट' करण्याचा खास अधिकार आपल्याला दिला जातो. एखाद्या डिलिव्हरी बॉयला (यांना गिग कामगार असे म्हटले जाते.) सातत्याने कमी रेटिंग मिळाल्यास पगारावर परिणाम होतो. बिचारा डिलिव्हरी बॉय कमी रेटिंग मिळू नये म्हणून जीवाच्या आकांताने गाडी चालवत, कोणाला धडक बसेल कवा सिग्नल मोडला तर पोलीस दंड ठोठावतील याचा विचार न करता वेळेत डिलिव्हरी करण्यासाठी अक्षरशः जीवाचे रान करत असतो. म्हणूनच या सेवाजगतातले विविध तरंग टिपणे, या वर्गाच्या अडचणी समजून घेणे महत्त्वाचे बनले आहे.

### सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

विशाखापट्टणमच्या कांचरापालेम भागातील बीआरटीएस रस्त्यावर एका रात्री एम. तेजेश्वरच्या मनात एक अदृश्य टाइमर सुरू होता. वळणे घेत, वाहतुकीतून मार्ग काढत तो वेळेशी शर्यत करत होता. अवघ्या २५ वर्षांचा तेजेश्वर काही महिन्यांपासून अन्नवितरण कामगार म्हणून काम करत होता. काही मिनिटांचा उशीर झाला, तरी ग्राहकांकडून कमी रेटिंग मिळायचे आणि कमाईवर त्याचा थेट परिणाम व्हायचा. त्या रात्री त्याच्याकडे अनेक ऑर्डर्स होत्या; प्रत्येक ऑर्डर वेळेत पूर्ण करण्याचा त्याचा प्रयत्न होता. मात्र घाईच्या नादात रस्त्यातील दुभाजक त्याच्या नजरेस पडला नाही. दुचाकी थेट त्यावर आदळली. जबर धडकेत तो उडून रस्त्यावर फेकला गेला आणि पायात तीव्र वेदना उसळल्या. पायाचे हाड मोडले. पुढचे जवळपास तीन महिने तो कामापासून दूर राहिला. तेही कोणत्याही वेतनाशिवाय. यावर त्याने दिलेली प्रतिक्रिया फार बोलकी आणि विचार करायला प्रवृत्त करणारी आहे. तो म्हणतो, मी त्यातल्या त्यात नशीबवान आहे. आमच्या पेशात ऑर्डर देण्यासाठी धावपळ करताना अपघातात मृत्यू होणेही सामान्य झाले आहे. विश्रांतीच्या क्षणी किंवा ऑर्डरच्या मधल्या वेळेत गिग कामगारांच्या चर्चेचा विषय असतो तो अपघात, तुटलेली हाडे आणि थोडक्यात झालेला बचाव. अनंतपूरमध्ये धावत्या ट्रेनमधून पडून एका अन्नवितरण कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना राष्ट्रीय चर्चेचा विषय ठरली आणि गिग कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला.

### जलद वितरण हेच अंतिम मापदंड

विशाखापट्टणममध्ये सध्या सुमारे १७हजार सक्रिय गिग कामगार आहेत. अन्न, किराणा, औषधे, पार्सल वितरणापासून बाईक टॅक्सीपर्यंत विविध सेवा ते पुरवत आहेत. तरुणच नव्हे, तर अनेक ज्येष्ठ नागरिकही पूरक किंवा मुख्य उत्पन्नासाठी या क्षेत्रात उतरले आहेत. नोकरी मिळवणे सोपे असले, तरी टिकून राहणे कठीण आहे. नोकरीतील असुरक्षा, अपुरे प्रोत्साहन, कमी वेतन, शारीरिक ताणतणाव आणि कामावर होणारी गैरवर्तणूक यामुळे अनेकजण मध्येच हा व्यवसाय सोडतात. किक-कॉमर्स कंपन्यांमधील तीव्र स्पर्धेमुळे जलद वितरण हेच अंतिम मापदंड बनले आहे. केंद्र सरकारने दहा मिनिटांच्या डिलिव्हरी संकल्पनेबाबत इशारा दिला असला तरी प्रत्यक्षात वेगाचा दबाव कायम आहे. विशाखापट्टणममधील जडगंबा जंक्शन, एनएडी जंक्शनसारख्या गर्दीच्या रस्त्यांवरून जावे लागते. तरीही उशीर झाला, की नकारात्मक रेटिंग मिळते. तेजेश्वर सांगतो, एक-स्टार रेटिंग म्हणजे थेट उत्पन्नावर घाला. या वेगाच्या नादात आरोग्यही धोक्यात येते. सतत धूळ, प्रदूषण, कडक उन्हात फिरणे याचा परिणाम त्वचा आणि फुफ्फुसांबर होतो. एखादे वेळी वीज नसल्यास दहाव्या मजल्यापर्यंतही जिने चढून दरवाजापर्यंत पोहोचावे लागते. दिवसाअखेरीस डोकेदुखी, अंगदुखी ही नेहमीची बाब झाली आहे. गिग कामगारांची संख्या वाढत चालल्याने प्रोत्साहन रकमेवरही गदा आली आहे. ७-८ किलोमीटरच्या डिलिव्हरीसाठी ६० ते ७० रुपये तर एक-दोन किलोमीटरच्या ऑर्डरसाठी २० रुपयांपेक्षा कमी मोबदला मिळतो. दिवसाला ५०० रुपये कमावल्यास १२० रुपयांचे अतिरिक्त प्रोत्साहन मिळते, पण इतकी कमाई करणे कठीण होते. इंधन, वाहनदुरुस्ती स्वतःच करावी लागते.

### कंपन्यांकडून उपचार खर्च नाही

के. शंकर या कामगाराच्या मते, ऑर्डर असो वा नसो, १२ ते १६ तास 'लॉग इन' राहणे बंधनकारक असते. मात्र त्या बदल्यात कोणतीही किमान हमी नाही. मार्च २०२५ मध्ये एका ग्राहकाने अन्नवितरण कामगारावर हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. मोठ्या आंदोलनानंतरच पोलिसांनी कारवाई केली. ऑल इंडिया गिग कामगार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष वी. जगन सांगतात. अनेक घटना अजूनही समोर आलेल्या नाहीत. अपघात झाला, मृत्यू झाला, तरी कंपन्या उपचारखर्च किंवा मदत देत नाहीत. २०२५ मध्ये ४२ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला आणि डझनभर जखमी झाले. एखाद्याने प्रश्न विचारला, तक्रार केली तर कामगाराचा आयडी ब्लॉक होतो. पुन्हा सुरू झाला, तरी ऑर्डर्स कमी मिळतात. अशा प्रकारे निषेधच दाबला जातो, असा आरोपही केला जातो. नीती आयोगाच्या अहवालानुसार २०२९-३० पर्यंत गिग कामगारांची संख्या २.३५ कोटी रुपयांवर जाणार आहे. काहींसाठी हे पूरक उत्पन्न, तर काहींसाठी एकमेव उपजीविका आहे. आयटीआय पदविकाधारक बी. वेंकट रमण दरमहा १२ ते १५ हजार रुपये कमावतो. पगार कमी आहे, पण त्याच्याकडे सध्या तरी दुसरा पर्याय नाही. या क्षेत्रात गिग कामगारांना निश्चित वेतन नाही. किलोमीटरमागे किती पैसे मिळावेत याचा ठोस निकष नाही. पूर्वी किमान उपस्थिती पता होता. आता तोही नाही. गिग कामगारांच्या मते आता सरकारने पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. किमान वेतन, विमा संरक्षण, अपघातात मृत्यू किंवा जखमी झाल्यास भरपाई यासाठी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक आहे.

आज अॅपआधारित डिलिव्हरी, इन्स्टंट डिलिव्हरी (कॉमर्स) व इतर छोटे-मोठे काम करून पैसे मिळवणाऱ्या गिग कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. बहुतेक गिग कामगारांची मासिक कमाई सरासरी २० ते २८ हजार रुपयांदरम्यान आहे अशी आकडेवारी दिसते. मात्र अनेकजणांना दरमहा १५ ते २० हजार रुपयांपेक्षा कमी पैसे मिळत असल्याचे दिसते. ४३ टक्कयांहून अधिक गिग कामगार दरमहा १५ हजार रुपयांपर्यंतच कमावतात, अशी माहितीही उपलब्ध आहे. काही कंपन्यांद्वारे दिलेल्या आकडेवारीनुसार एखाद्याने दररोज दहा तास आणि महिन्यात २६ दिवस काम केले तर २६ ते २८ हजार रुपयांपर्यंत कमाई होऊ शकते. मात्र इंधन आणि देखभाल खर्च वजा केल्यावर हातात साधारणतः २० ते २१ हजार रुपयेच शिल्लक राहतात. काही गिग कामगारांना कधी कधी दिवसाचे १४-१५ तास काम करूनही केवळ सातशे ते आठशे रुपये मिळतात. हे कामगार स्वतःची दुचाकी वापरतात. त्यामुळे इंधनाचा खर्च होतो. झोमॅटोच्या आकडेवारीनुसार दहा तास काम केल्यास अंदाजे वीस टक्के उत्पन्न इंधन आणि देखभाल खर्चात जाते. काही कामगारांच्या मते दररोज सुमारे १०० ते १५० मिलोमीटर फिरावे लागते. दुचाकीच्या इंधनावर दोनशे ते तिनशे रुपये खर्च होतात. देखभालीच्या खर्चामुळे हाती येणारी रक्कम बरीच कमी होते.

### कंपन्याही नफ्यात नाहीत

देशातील शहरी भागात २० ते २५ हजार रुपयांचे उत्पन्न घरखर्च भागवण्यास पुरेसे ठरत नसल्याने अनेक गिग कामगार दुसरे काम करत असतात. दुसऱ्या बाजूने किक कॉमर्स कंपन्या किती नफा मिळवतात याचा विचार केला तर ते चित्रही खूप आशादायक नाही. काही रिपोर्टनुसार 'ब्लिकइट'ने काही तिमाहींमध्ये नफा नोंदवला हे सकारात्मक होते, परंतु इतर कंपन्या अजूनही विशेष नफ्यात नाहीत. 'स्विगी'सारख्या कंपनीचे किक कॉमर्स विभाग (इन्स्टामार्ट) यासाठी मोठे तोटे सहन करत आहेत. 'झेप्टो 'ने व्यवसायात ३,५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक केली असून त्याची आजची किंमत ५८,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, पण हे पैसे व्यवसायवृद्धीसाठी वापरले जातात. त्यामुळे नफा दिसून येत नाही. याचा समग्र विचार केल्यास वरपैसे कमावण्यासाठी एक लवचिक आणि ठराविक काळासाठी उपयुक्त पर्याय असू शकतो, परंतु दीर्घकालीन स्थिर जीवनासाठी सामाजिक सुरक्षा, नियमित वेतन आणि खर्चाचे नियोजन याचा अभाव असल्यामुळे तो पूर्णपणे समाधानकारक नाही.

**महेश धर्माधिकारी**

# डिलिव्हरी बॉईज आणि अपेक्षा



**आ**ज प्रत्येकाच्या हातात मोबाइल आल्यापासून ऑनलाइन खरेदीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. घरबसल्या वस्तू खरेदी करून खरेदीची हौस जिरवणाऱ्यांची संख्या सतत वाढतच चालली आहे. त्यातच खाद्यपदार्थ मागवण्याचा प्रकारही शहरी भागात अधिक लोकप्रिय झाला आहे. आणि त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या सेवा पुरवीत असतात. त्यात वरचेवर स्पर्धादेखील वाढत चालली आहे. अशा डिलिव्हरी बॉईजना गिग वर्कर्स म्हटले जाते. त्यांच्या हक्क, अधिकारांचा विचार सध्या कुणीच करायला तयार नाही. खाद्यपदार्थांची ने-आण वेळेवर व्हावी यासाठी हे तरुण कामगार कायम धडपड करीत असतात. महानगरांमधील धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनात प्रत्येकासाठी वेळ अतिशय महत्वाचा असतो. वर्षाचे बारा महिने कशाचाही तमा न बाळगता पाऊस, थंडी, ऊन, वारा यांना न जुमानता हे डिलिव्हरी बॉईज वर्कर्स आपले काम इमाने-इतबारे करीत असतात. वेळ वाचावा म्हणून ते प्रसंगी वतुकीचे नियमही पळत नाहीत. अनेकदा सिग्नल तोडून दुचाकी पळवत असतात. अतिशय घाईमध्ये ऑर्डर पोहोचवण्याची त्यांची मोठी लगबग अनेकांना विचित्र वाटत असते.

परंतु दहा ते पंधरा मिनिटांच्या आत ऑर्डर पोहोचली पाहिजे यासाठीच ही घाई असते. खाद्यपदार्थ ऑनलाइन पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या स्पर्धेत आज अनेक कंपन्या उतरल्या आहेत. त्यांची आपापसातच मोठी स्पर्धा सुरु असते. त्याचबरोबर डिलिव्हरी पोहोचवणाऱ्या युवा वर्गाला एखाद्या वेळेस उशीर झाल्यास ग्राहकांची बोलणीदेखील खावी लागतात. त्यामुळेच त्यांना सतत धावाधाव करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. खाद्यपदार्थ गरम असेल तर त्यांच्या धावपळीचे चीज होते. अन्यथा कंपनीकडून देखील त्यांच्यावर दंड ठोठावला जातो. अलीकडेच देशातील लाखो डिलिव्हरी बॉईज म्हणजेच गिग कामगारांनी आपल्या प्रमुख मागण्यांसाठी एक दिवस संप पुकारला होता. परिणामी देशभरातील फूड डिलिव्हरी ची सेवा त्या दिवसापुरती ठप्प झाली होती. सध्या देशामध्ये सव्वा कोटी डिलिव्हरी बॉईज या क्षेत्रात असल्याची आकडेवारी अलीकडेच प्रसिद्ध झाली. भारतात शहरीकरणाचा प्रचंड वेग पाहता ती संख्या पुढील पाच वर्षात अडीच कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या व्यवसायाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच चालली असल्यामुळे डिलिव्हरी बॉईज यांचे महत्व देखील वाढत आहे.मात्र, त्यांना मिळणारी वागणूक आणि मोबदला यावर सरकारकडूनही विशेष लक्ष दिले जाण्याची गरज आहे. नोकरीची शाश्वती, डिलिव्हरी पोच करण्याची वेळ वाढावी, किमान वेतन मिळावे तसेच कामाची वेळ आठ तासांची करावी इत्यादी मागण्यांसाठी ते अलीकडेच संपावर गेले होते. त्यांच्या मागण्यांचा सकारात्मक दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

## मेळघाटातील पानगळ...



अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगेत वसलेला मेळघाट कोरड्या पानगळी प्रकारच्या जंगलासाठी प्रसिद्ध आहे. परिसरात उष्णकटिबंधीय कोरडी पानगळी जंगले आहेत, जिथे उन्हाळ्यात झाडांची पाने गळतात.सागवान (साग), बांबू, महुआ, अंजन आणि बाभूळ यांसारखे वृक्षांची पानगळ सध्या लक्ष वेधून घेत आहे. पानगळीचे हे दृश्य टिपले आहे वाचक व हौशी छायाचित्रकार महेश ठाकरे यांनी...

## सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १८ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात.

**श्याम ठाणेदार**



# पालकांच्या अडचणी आणि खासगी आयुष्याचा समतोल

**का**म आणि कौटुंबिक आयुष्याचा समतोल-नोकरी आणि मुलांची जबाबदारी एकत्र सांभाळणे हे अनेक पालकांसाठी मोठे तणावाचे कारण ठरते. पालक पूर्वीपेक्षा अधिक काम करत आहेत आणि करिअर व कुटुंब यांचा समतोल साधताना चिंता, अपराधीपणा आणि मानसिक थकवा जाणवतो.याचा परिणाम जोडीदारासोबतचा वेळ, झोप आणि स्वतःसाठीचा मोकळा वेळ यावर होतो.

आर्थिक दबाव-मुलांचे संगोपन महागडे असते - अन्न, कपडे, शिक्षण, अतिरिक्त उपक्रम यांसाठी मोठा खर्च लागतो. त्यातच बालसंगोपनाचा खर्च प्रचंड वाढला आहे. वाढत्या जीवनखर्चामुळे आर्थिक चिंता पालकांच्या तणावात भर घालतात. कधी कधी मुलांना संधी देता न आल्यास अपराधीपणा किंवा चिंतादेखील निर्माण होते.

पालकत्वाबद्दलच्या अपेक्षा आणि 'तुलना संस्कृती'-सोशल मीडियामुळे 'परिपूर्ण पालकत्वा'च्या अवास्तव अपेक्षा तयार होतात. इतर कुटुंबे अगदी परफेक्ट असल्यासारखी दिसतात आणि त्यामुळे स्वतः अपुरे असल्याची भावना निर्माण होऊ शकते.

स्वतःसाठी वेळ नसणे-धावपळीच्या दिनक्रमामुळे पालकांना स्वतःला सावरण्यासाठी वेळ मिळत नाही. स्वतःची काळजी (सेल्फ-केअर) न घेतल्यास तणाव वाढत जातो आणि संयम राखणे कठीण होते.

मुलांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि भविष्याची चिंता-मुलांचे शारीरिक, मानसिक, शैक्षणिक आणि भावनिक आरोग्य सांभाळण्याची जबाबदारी पालकांवर मोठा ताण आणते. अनेक पालकांना आपल्या मुलांना चिंता किंवा नैराश्य येईल की काय, याची भीती वाटते. छळवणूक, हिंसा, अभ्यासाचा ताण आणि करिअरचे भविष्य या सगळ्यामुळे पालक कायम काळजीत राहतात.

सामाजिक आधाराचा अभाव-मदतीसाठी कुटुंब, मित्र किंवा समुदाय नसेल, तर पालकत्व अधिक एकाकी वाटू शकते. आधार नसल्याने रोजच्या अडचणी अधिक कठीण भासतात.

डिजिटल युगातील पालकत्व-स्क्रीन टाइम, सोशल मीडिया आणि ऑनलाइन सुरक्षितता या सगळ्यांमुळे आजच्या पालकांना नवीन प्रकारचा तणाव जाणवतो. योग्य काय आणि अयोग्य काय, याबाबत गोंधळ निर्माण होतो.

**पालकांनी तणाव कसा हाताळायचा..**

पालकत्व कठीण आहे आणि लगेच सोपे होईल असे नाही. तरीही, 'पालकांनाही



काळजीची गरज असते,' सर्व गोष्टी आपल्या नियंत्रणात नसल्या तरी, काही छोटे बदल मानसिक आरोग्यास मदत करू शकतात.

परिपूर्णतेचा हट्ट सोडा आणि शक्य तितके मुलांकरिता उपलब्ध राहा-कोणीही परिपूर्ण पालक नसतो. तुमचे उद्दिष्ट परफेक्ट असणे नसून, मुलांच्या गरजांसाठी उपस्थित आणि संवेदनशील असणे हे असावे. चुका झाल्या तरी स्वतःला माफ करा.

रोजच्या कामात सजगता आणा-सजगतेसाठी वेगळा वेळ काढण्याची गरज नाही. श्वासावर लक्ष देणे, आजूबाजूला काय आहे ते जाणवणे - हे लहान उपायही मन शांत ठेवतात.

कुटुंबासोबत स्वतःचीही काळजी घ्या-स्वतःसाठी थोडा वेळ काढणे महत्त्वाचे आहे. सकाळी शांतपणे चहा-कॉफी पिणे, आवडते पुस्तक वाचणे किंवा थोडी ताजी हवा घेणे - हे छोटे उपाय मोठा फरक पाडू शकतात.

गरज असेल तेव्हा मदत मागा-मित्र, कुटुंबीय किंवा इतर पालकांशी बोलल्याने मन हलके होते. गरज पडल्यास समुपदेशक किंवा थेरपिस्टची मदत घ्या. मदत मागणे ही कमजोरी नाही, तर ताकद आहे.

काम आणि कुटुंबासाठी मर्यादा ठरवा-कामाच्या वेळा स्पष्ट ठेवल्याने दोन्ही बाजूंचा ताण कमी होतो. कामानंतर घरात शिरताना थोडा ब्रेक घ्या, जेणेकरून मनाची अवस्था बदलेल.

आपल्या पालकत्वाच्या पद्धतीचा अभिमान बाळगा-इतरांशी तुलना करणे टाळा. प्रत्येक कुटुंब वेगळे असते. तुमच्यासाठी जे योग्य आहे, त्यावर लक्ष केंद्रित करा.

शांत करणाऱ्या दिनचर्या तयार करा-लहान सहान दिनचर्या स्थिरता देतात - एकत्र नाश्ता करणे, झोपण्यापूर्वी गोष्ट वाचणे यामुळे नातेसंबंध मजबूत होतात.

रोज कृतज्ञतेचा सराव करा-दररोज एक-दोन गोष्टींसाठी कृतज्ञता व्यक्त करा. कठीण दिवसांतही हे मन हलके करते.

कौटुंबिक उपक्रम साधे ठेवा-मोठ्या कार्यक्रमांऐवजी साध्या गोष्टी करा - उद्यानात फिरणे, घरात खेळ खेळणे किंवा एकत्र स्वयंपाक करणे.

एकावेळी एक दिवस जगा-पालकत्व ही मॅरेथॉन आहे, शर्यत नाही. आजचा दिवस सांभाळा, गरज पडल्यास मदत घ्या आणि लहान, सुंदर क्षणांचा आनंद घ्या. मात्र चिडचिड, सतत थकवा, झोप न लागणे, डोकेदुखी, आजारपण अशी स्थिती कायम राहिल्यास मदत घ्या. सजग राहिल्यामुळे तुम्ही मुलांच्या भावना अधिक चांगल्या प्रकारे समजू शकता आणि नाते अधिक घट्ट होते. आवडीच्या गोष्टींसाठी थोडा वेळ काढा.

पालकांचा तणाव मुलांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे मुले अस्वस्थ, चिंताग्रस्त किंवा वागण्यात बदल करणारी होऊ शकतात. म्हणूनच एक लक्षात घ्या की तुम्ही चुकीचे नाही आहात तुमच्या परीने तुम्ही मुलांसाठी सगळं काही चांगलंच करत आहात. तेव्हा अपराधाची भावना नको आणि तणाव तर मुळीच नको.

**डॉ. स्वाती गानू**

# पातुर तालुक्यातील १३३ शेतक-यांची केवायसी रखडली


■ प्रतिनिधी | खेट्री ■

*राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफी प्रक्रियेला वेग आला असतानाच पातुर तालुक्यातील १३३ शेतकऱ्यांची केवायसी (KYC) व आधार प्रमाणीकरण रखडल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रक्रियेत तांत्रिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.*

राज्य सरकारकडून कर्जमाफी संदर्भात माहिती संकलनाचे काम जिल्हा प्रशासनामार्फत युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून २०२६ पर्यंत कर्जमाफीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्या पार्श्वभूमीवर शासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे.

कर्जमाफीच्या अंमलबजावणीसंदर्भात

## कर्जमाफीला तांत्रिक अडथळ्याची शक्यता



उपाययोजना सुचविण्यासाठी मित्र संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जुलै महिन्यातील पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे कर्जमाफीचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे दिसत आहेत.मात्र, पातुर तालुक्यातील १३३ शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया अपूर्ण असल्याने त्यांच्या कर्ज खात्यांची पडताळणी अडकली आहे. सेवा सहकारी संस्था व बँकांकडून घेतलेल्या कर्जाची केवायसी पूर्ण करणे बंधनकारक असल्याने प्रशासनाने संबंधित शेतकऱ्यांना तातडीने कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले आहे.

**'वारसदारांनी आधार सादर करावेत'**

ज्या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या वारसदारांनी संबंधित गट सचिव किंवा बँकेकडे आधार कार्ड तातडीने जमा करावे, अन्यथा कर्जमाफी प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी सूचना जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी दिली. एकीकडे कर्जमाफीची अपेक्षा आणि दुसरीकडे केवायसीतील अडथळे यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने विशेष शिबिरे घेऊन ही प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

# श्रद्धा, भक्ती आणि ज्ञानाचा महापूर; अकोटमध्ये गुरुमाऊलींच्या १०९ व्या जयंतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## हजारो वासुदेव भक्तांच्या उपस्थितीने 'श्रद्धा सागर' परिसर दुमदुमला

■ प्रतिनिधी | अकोट ■

वारकरी संप्रदायाचे परम श्रद्धास्थान असलेल्या संत वासुदेव महाराज यांच्या १०९ व्या जयंती महोत्सवानिमित्त अकोट येथील 'श्री क्षेत्र श्रद्धा सागर' येथे भक्ती, श्रद्धा आणि ज्ञानाचा अक्षरशः महापूर उसळला आहे. राज्यभरातून आलेल्या हजारो वासुदेव भक्तांच्या उपस्थितीने परिसर दुमदुमून गेला असून, 'अवघी अवतरली पंढरी' असा भाविकांना अनुभव येत आहे.

दि. १३ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या जयंती महोत्सवात धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे. श्री ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन या कार्यक्रमांमुळे वातावरण भक्तिमय झाले आहे. ज्ञानेश्वरी कंठस्थ ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे (आळंदीकर) यांच्या ओजस्वी निरूपणातून भाविकांना अध्यात्मिक चिंतनाची पर्वणी लाभत आहे. रात्रीच्या कीर्तन महोत्सवात नामवंत कीर्तनकारांच्या प्रभावी विचारांनी श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत.



**सुसज्ज नियोजन; सेवाभावी उपक्रमांचे दर्शन**

महोत्सवाचे आयोजन श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था यांच्या वतीने करण्यात आले असून, भाविकांच्या सेवेसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. भव्य मंडप, वैकुंठवासी पंजाबराव हिंगणकर स्मृती महाद्वार, आकर्षक विद्युत रोषणाई आणि सुशोभित संतपीठामुळे सोहळ्याला वैभव प्राप्त झाले आहे. भाविकांसाठी निवास व भोजन व्यवस्था, आरोग्य शिबिर, कायदेविषयक मार्गदर्शन, तसेच धार्मिक ग्रंथ विक्री स्टॉल अशा विविध सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भक्ती संगीत आणि माऊलींच्या अश्वांचे 'उभे व गोल' रिंगण हे सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरत आहे. महिला सेवा गट व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभागही लक्षवेधी ठरत आहे.

**आज रंगणार जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा**

महोत्सवाची सांगता शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी होणार असून, त्यानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे श्रींचा मंगल महाभिषेक होणार आहे. सकाळी ८ ते ११ दरम्यान भव्य वारकरी दिंडी सोहळा व अश्वांचे रिंगण पार पडेल. सकाळी ९ वाजता ह.भ.प. गुरुवर्य गोपाळ महाराज उरळकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दुपारी १ वाजता भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'या मंगलप्रसंगी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुमाऊलींच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा,' असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. श्री वासुदेवराव महल्ले व विश्वस्त मंडळाने केले आहे.

## सर्व शाखीय कुंभार समाजाचा उपवर युवक-युवती परिचय मेळावा २८ फेब्रुवारीला

■ प्रतिनिधी | अकोला ■

सकल कुंभार उत्कर्ष संस्था, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली 'सर्व शाखीय कुंभार समाज उपवर युवक-युवती परिचय समिती, अकोला' यांच्या वतीने सर्व शाखीय कुंभार समाजाचा उपवर युवक-युवती परिचय मेळावा शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा जि.प. कर्मचारी भवन, सिव्हील लाईन, अकोला येथे पार पडणार आहे. समाजातील उपवर युवक-युवतींना एकमेकांची ओळख होऊन योग्य जुळणीसाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच समाजातील वैवाहिक समन्वय अधिक बळकट व्हावा, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू व इच्छुक समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## रुईखेड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. देशभक्तीपर वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका सौ. अनिता भराटे या होत्या. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा व मूर्तीचे पूजन करून मुख्याध्यापक निनाद मानकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित प्रभावी भाषणे, जोशपूर्ण पोवाडे आणि देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे, कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थ्यांनीच केले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संघटनकौशल्याची झलक पाहायला मिळाली.

यावेळी संतोष काळे व किरण मानकर यांनी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, स्वराज्य स्थापनेतील योगदान आणि आदर्श नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमास मुख्याध्यापक निनाद मानकर, अनिता भराटे, किरण मानकर, वनिता सरोदे, संतोष काळे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा. रूपेश गायगोले, प्रा. राहुल खंडारे, संगिता पन्नासे, संगिता नाथे, जान्हवी गाठेकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राबद्दल आदरभाव व राष्ट्रभक्तीची भावना दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## जि. प. शाळा लोहारी खुर्द येथे शिवजयंती उत्साहात



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट पंचायत समिती अंतर्गत जि. प. शाळा लोहारी खुर्द येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरी करण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या उपस्थितीत देशभक्तीपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या शिवगर्जनेने शालेय परिसर दुमदुमून गेला. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुमेधा डोबाळे या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक नितीन धोरण, शिक्षिका सोनाली निचळ व रुपाली ढवळे उपस्थित होत्या.

विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित भाषणे, देशभक्तीपर गीते तसेच लघुनाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अंजली इंगळे, नैना डोंगरे, गौरी म्हैसने, सलोनी वानखडे, आरुषी वानखडे, दिव्या वानखडे, प्रीती पाखरे, क्रांती वानखडे, गुंजन म्हैसने, अनुष्का सपकाळ, प्रणाली वानखडे, सृष्टी वानखडे, आचल सपकाळ, प्राची डोंगरे, कृष्णाली डोबाळे, श्रद्धा वानखडे, पियुष सपकाळ, शौर्य वानखडे, पियुष लालसरे आदी विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय ठरला. शिक्षिका सोनाली निचळ व रुपाली ढवळे यांनी मनोगतातून शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्याची संकल्पना आणि आदर्श प्रशासन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी विद्यार्थ्यांनी महाराजांचे विचार आत्मसात करून प्रामाणिक, शिस्तबद्ध व राष्ट्रप्रेमी नागरिक बनावे, असे आवाहन केले. संचालन सर्वेश म्हैसने यांनी केले, तर आभारप्रदर्शन अंश सपकाळ यांनी केले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शापोआ कर्मचारी भुजिंगराव इंगळे यांनी परिश्रम घेतले.

## मोरगाव काकड येथे पाणीपुरवठा योजनेचे ग्रामस्थांकडे हस्तांतरण

### जल अर्पण दिवस उत्साहात; आता देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपाणी समितीकडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

पंचायत समिती बार्शीटाकळी अंतर्गत ग्रामपंचायत मोरगाव काकड येथील जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनेचे ग्रामस्थांकडे हस्तांतरण 'जल अर्पण दिवस' साजरा करून करण्यात आले. आता या योजनेची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. शेकडो ग्रामस्थांच्या साक्षीने हा सोहळा पार पडला.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या निर्देशानुसार आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) मिलिंद मोरे तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.



या कार्यक्रमास गटविकास अधिकारी रविकांत पवार, उपअभियंता विनोद गिरी, शाखा अभियंता गिरीश चाटे, विस्तार अधिकारी विनोद वसु, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे सल्लागार राजेश डहाके, मनुष्यबळ विकास सल्लागार प्रवीण पाचपोर, पाणी गुणवत्ता सल्लागार ममता गणोदे, कनिष्ठ अभियंता आसावरी ढोके, कंत्राटदार विशाल काकड, माजी सरपंच गोपाल काकड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीने झाली. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी भारुडाच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व पटवून दिले. गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष शंकरराव आढाऊ यांनी ग्रामस्थांकडून जलसंवर्धनाचा संकल्प करून घेतला. कार्यकारी अभियंता अतुल साळुंके यांनी दरडोई ५५ लिटर पाणीपुरवठा सातत्याने उपलब्ध राहण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. तांत्रिक अडचणींसाठी पाणीपुरवठा विभाग सदैव तत्पर राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. गावातील दत्तराज काकड यांनी पूर्वीच्या पाणीटंचाईमुळे झालेल्या हालअपेष्टा व आता नियमित पाणीपुरवठ्यामुळे झालेली सोय याबाबत मनोगत व्यक्त करत योजना शाश्वत ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच अर्चना महल्ले, वंदना महल्ले, हर्षावती काकड, देवकाबाई चिलवने आणि उमा देवतोडे या महिलांनी रासायनिक व जैविक पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक सादर केले. 'जलबंधन' कार्यक्रमाने सोहळ्याची सांगता झाली. कार्यक्रमाचे संचालन सतीश ठोंबरे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेश मानकर यांनी केले. मोरगाव काकड येथे पाणीपुरवठा योजना ग्रामस्थांकडे सुपूर्द झाल्याने पाणी व्यवस्थापनात गावकऱ्यांचा थेट सहभाग वाढणार असून, शाश्वत जलव्यवस्थापनाचा आदर्श उभा राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७/२०२६ प्रोसेस नं.१५०६/२०२६
चौ.ता. १६/०३/२०२६ दिनांक : ०३/०२/२०२६
**अर्जदार :** १. त.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** श्री. भाउराव ज्ञानदेवराव सरोदे
रा. पाण्याच्या टाकीजवळ, मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री. ज्ञानदेव किसन सरोदे २. श्रीमती विमलबाई ज्ञानदेव सरोदे
**पत्ता :-** रा. मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. ज्ञानदेव किसन सरोदे यांचे दि. १०/०८/१९९३ रोजी व मयत श्रीमती विमलबाई ज्ञानदेव सरोदे यांचे दि. ०४/१०/२०१५ रोजी मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे गजानन शालीकराम गिर्हे रा. मु. देवदरी, ता. बार्शीटाकली, जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार गजानन शालीकराम गिर्हे यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- ग्रामपंचायत मालमत्ता क्र. २६३, घर क्र. ५६, मौजे – देवदरी, ता. बार्शीटाकली, जी. अकोला ज्याचे मोजमाप एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फुट, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - रस्ता पश्चीमेस - रस्ता, उत्तरेस - संजय बहादुरे, दक्षिणेस - नंदू जाधव या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स बँक कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- १९/०२/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क्र. २३– ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९१७५९३८२४२.

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात** (जाहीर नोटीस)

एम. जे. सी. नं. ११२/२०२६ प्रोसेस नं.१५०२/२०२६
चौ.ता. ०७/०३/२०२६ दिनांक : ०३/०२/२०२६
**अर्जदार :** १. प्रकाश वासूदेव शिरसाट २. सौ. सुवर्णा प्रकाश शिरसाट ३. जय प्रशांत शिरसाट सर्व रा. गजानन नगर, गल्ली नं. ९, भौरद, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रशांत प्रकाश शिरसाट
**पत्ता :-** रा. गजानन नगर, गल्ली नं. ९, भौरद, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रशांत प्रकाश शिरसाट यांचे दि. १९/०९/२०१९ रोजी मौजे श्री. क्षेत्र महाळुंगे ( इंगळे), ता. खेड, जि. पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर प्रसिध्दी**

अकोला जिल्ह्यामध्ये जाहीर प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीकोणातून दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात येते. अकोला तालुक्यामध्ये मजुरांना रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्त्वावर मजूर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून नियोजित संस्थेचे सभासद होवू इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारिरिक श्रम करणाऱ्या व्यक्ती तसेच अल्पभुधारक व अत्यल्प भुधारक की जे उदार निर्वाहाकरीता शारीरिक श्रमाची कामे करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी नियोजित मजूर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय महात्मा फुले चौक मसनेवाडी लहान उमरी, अकोला येथे दि. २७/०२/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सभा आयोजित केली आहे. तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

- **मुख्य प्रवर्तक**
**सागर दिलीप मसने**
(नियोजित साक्षी मजूर कामगार, सहकारी संस्था मर्यादित, अकोला)

**जाहीर प्रसिध्दी**

अकोला जिल्ह्यामध्ये जाहीर प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीकोणातून दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात येते. अकोला तालुक्यामध्ये मजुरांना रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्त्वावर मजूर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून नियोजित संस्थेचे सभासद होवू इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारिरिक श्रम करणाऱ्या व्यक्ती तसेच अल्पभुधारक व अत्यल्प भुधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरिक श्रमाची कामे करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी नियोजित मजूर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय वृंदावन पार्क दुकान नं. ३ पोलिस वसाहत गीता नगर, अकोला येथे दि. २७/०२/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सभा आयोजित केली आहे. तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**मुख्य प्रवर्तक**
**सौ. वर्षा अमोलराव कलोरे**
(नियोजित हरिओम मजूर, कामगार सहकारी संस्था मर्यादित, अकोला)

**Change In Name**
I Have Change My Name in My SON Passport No is (M1180369) From **MUSTIQIMA BEGUM YUSUF KHAN** --TO-- **MUSTKIMA BEGAM YUSUF KHAN** My Residential Address is -- Near Sabriya Masjid Ashok Nagar Akot Fail Akola MH 444003.

**Change In Name**
I Have Change My Name in My SON Passport No is (M1180369) From **YUSUF KHAN** --TO-- **YUSUF KHAN ASHRAF KHAN** My Residential Address is -- Near Sabriya Masjid Ashok Nagar Akot Fail Akola MH 444003.

**Change In Name**
I Have Change My Name From **RAMESHCHANDRA RAMPRATAP MALPANI** --TO-- **RAMESH RAMPRATAP MALPANI** My Residential Address is -- SBI Treasari Branch ke Pass Shastri Nagar Amankha Plot Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name on My Documents From **YASMIN BANO SHE. NYAMAT** After Marriage --TO-- **YASMEEN BANO SAIYYAD RAHEMAN** My Residential Address is Zira Bawadi Khadan Alim Chowk Akola 444001 MH

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (M1180369) From **SHOEB KHAN** --TO-- **SHOEB KHAN YUSUF KHAN** My Residential Address is -- Near Sabriya Masjid Ashok Nagar Akot Fail Akola MH 444003.

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (H4213737) And My Spouse Passport No is (H4220131) From **LATESHKUMAR NYALCHAND LATHIYA** -- TO -- **LATESH NYALCHAND LATHIYA** My Residential Address is -- 7- Sahara Apartments Near Ketki Aptms New Radha kisan Plots Akola MH 444001

**Change In Name**
I Have Change My Name From **ASHADEVI ASANDAS DHIRWANI** --TO-- **POOJA INDRAKUMAR SIDARA** My Residential Address is -- Ramesh Maharaj Line Nanak Nagar Nimwadi Akola MH 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (H4220131) From **JAYSHREE LATESHKUMAR LATHIYA** --TO-- **JAYSHREE LATESH LATHIYA** My Residential Address is -- 7- Sahara Apartments Near Ketki Aptms New Radha kisan Plots Akola MH 444001

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (N6588941) From **HEENA SAIF UMRANI** --TO-- **HEENA KAUSAR ASHRAF KACCHI** My Residential Address is -- House No 03 Gangadhar Plot Deepak Chowk Near Taibah Manzil Akola MH 444001.

**Change In Name**
I Have Change My Name From **SABAANJUMAN MOHD. SADIK** --TO-- **SABAANJUM MOHAMMAD RAFI SHAIKH** My Residential Address is -- Nasim Manzil Sunnah Hospital Ganga Nagar No 1 Jaju Wadi Nirman Nagar Akola Maharashtra 444002.

जनमाध्यम जनमाध्यम न्यूज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ८२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जनता दरबार की जनतेची थट्टा?

## २२ प्लॉट पडून, दिव्यांगाला दारात लाथ, पालकमंत्र्यांचे आदेश धुळीत-अधिकाऱ्यांचा माजच माज

**सेलू/ अभय बेदमोहता**

सेलू तालुक्यात भरवला जाणारा 'जनता दरबार' हा न्यायाचा मंच की जनतेची थट्टा, असा प्रश्न आता थेट प्रशासनाच्या दारात जाऊन उभा ठाकला आहे. एका दिव्यांग नागरिकाला वर्षानुवर्षे घरकुलासाठी भटकंती करावी लागत असेल, तर घोषणांचा हा सारा गजर नेमका कोणासाठी?



दिव्यांग गजानन यांनी घरकुलासाठी अर्ज करून सर्व निकष पूर्ण केले, तरी गावठाण परिसरात तब्बल २२ प्लॉट रिक्त असताना त्यांना जागा देण्याबाबत प्रशासनाने टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप होत आहे. शासनाच्या २०२३ च्या निकषांनुसार पात्रता असतानाही फाईल दाबून ठेवली गेल्याची चर्चा आहे. दिव्यांगांच्या सन्मानाची भाषा करणारे अधिकारी प्रत्यक्षात मात्र त्यांच्या आयुष्याशी खेळ करत असल्याचे चित्र समोर येत आहे.

**आदेश कागदावर, दिव्यांग दारात**

पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात गजानन यांनी आपली व्यथा मांडली. संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. पण त्यानंतरही परिस्थितीत बदल नाही. आदेश कागदावरच राहिले, आणि दिव्यांग नागरिकाचे हात पुन्हा रिकामेच,

**'७ हजार रुपये भरा' कोणाच्या आदेशावर?**

या प्रकरणात 'किमान ७ हजार रुपये भरावे लागतील अशी मागणी झाल्याचा आरोप समोर आला आहे. दिव्यांग व्यक्तीकडून पैशांची अपेक्षा करणे म्हणजे शासनाच्या संवेदनशीलतेवर काळा डाग नाही का? जर हा आरोप खरा असेल, तर संबंधितांवर कारवाई का होत नाही, की या व्यवहाराला कुणाचे संरक्षण आहे.

> **रिक्त प्लॉट असूनही नकार का?**
> गावात जागा उपलब्ध असताना दिव्यांगाला घरकुलासाठी वंचित ठेवणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून बेजबाबदार वृत्तीचे लक्षण आहे. कागदपत्रांच्या नावाखाली अडथळे उभे करणे, फाईल फिरवणे आणि वेळकाढूपणा करणे हा न्यायाचा मार्ग आहे का?

**जनतेचा संताप उफाळला**

स्थानिक नागरिकांनी या प्रकरणी संताप व्यक्त केला आहे. जनता दरबार म्हणजे केवळ फोटोसेशनचा कार्यक्रम नको, निर्णय हवेत, अशी मागणी जोर धरत आहे.

दिव्यांग गजानन यांना तातडीने न्याय देऊन उपलब्ध प्लॉटपैकी जागा देण्यात यावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.'जनता दरबार' हा शब्द जर जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरत असेल, तर त्याचा अर्थ उरत नाही. प्रशासनाने आता तरी संवेदनशीलता दाखवून ठोस निर्णय घ्यावा. अन्यथा एका दिव्यांगाच्या अश्रूंनीच या दिखाऊ व्यवस्थेचा पर्दाफाश करणे अटळ ठरेल.

# आर्वीत रेबीजग्रस्त श्वानांचा हल्ला; आठ वर्षीय बालकाचा मृत्यू

**आर्वी/ जनमाध्यम**

शहरातील स्टेशन वार्डसह विविध भागांत रेबीजग्रस्त श्वानांनी धुमाकूळ घालत सहा लहान बालकांसह १२ जणांना चावा घेतल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धवल गजानन गुल्हाणे (८) या बालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मटन मार्केट परिसरात कुत्र्यांचे झुंड वारंवार फिरत असल्याची तक्रार नागरिकांनी यापूर्वीही केली होती. एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक नागरिकांवर हल्ला चढवला. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र धवलची प्रकृती चिंताजनक होती.



आखोर त्याचा मृत्यू झाल्याने प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे.संतप्त नागरिकांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. नगरपालिकेकडे विचारणा केली असता सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याचा आरोप करण्यात आला. वाढत्या दबावानंतर प्रशासनाने श्वान पकडमोहीम व निर्बीजीकरण सुरू केले आहे.या प्रकरणाची दखल घेत आ. सुमित वानखेडे यांनी मुख्याधिकाऱ्यांना तातडीचे निर्देश दिले. मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड, नगराध्यक्ष स्वाती गुल्हाणे, उपाध्यक्ष गौरव जाजू, आरोग्य सभापती संजय थोरात आदी पदाधिकाऱ्यांनी पथकासह कारवाई सुरू केली. प्राणिमित्रांच्या मदतीने श्वानांना पकडण्याचे व लसीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.दरम्यान, शहरात नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण असून लहान मुलांना घराबाहेर सोडण्यास पालक घाबरत आहेत. निष्पाप बालकाचा बळी गेल्यानंतरच प्रशासन जागे झाले, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### घरगुती वादातून पत्नीवर विटेने हल्ला

**हिंगणघाट -** येथील शास्त्री वार्डात घरगुती वादातून पतीने पत्नीवर विटेने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राधा मरसकोल्हे (३०) या घरकाम करत असताना पती किसन याने मद्यप्राशनाच्या अवस्थेत त्यांच्याशी वाद घातला. वाद विकोपाला गेल्यानंतर त्याने विट फेकून मारहाण केली. यात राधा या जखमी झाल्या असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. परिसरातील नागरिकांनी या प्रकाराबाबत संताप व्यक्त केला आहे. वारंवार होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### कोचर ग्राउंडवरून दुचाकी चोरी

**वर्धा -** शहरातील बोरगाव (मेघे) परिसरात असलेल्या कोचर ग्राउंडवरून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना घडली. श्रेयश तेलरांधे (२१) हे मित्रांसोबत क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. त्यांनी एमएच ३२-एवाय ८६२२ क्रमांकाची दुचाकी ग्राउंडलगत उभी केली होती. खेळ आटोपून परतल्यानंतर दुचाकी जागेवर आढळली नाही. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा माग काढता आला नाही. वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला.

### भरधाव ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**वर्धा -** येथील नालवाडी परिसरात भरधाव ट्रॅव्हल्सने दुचाकीला धडक दिल्याने दोन जण जखमी झाले. सूरज वासे (३५) आणि दीपमाला मसराम हे दुचाकीने शहराकडे येत असताना मागून आलेल्या ट्रॅव्हल्सने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. अपघातात दोघेही रस्त्यावर फेकले गेले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून त्यांना रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी दोघांवर उपचार सुरू आहेत. अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास हाती घेतला आहे.

# वर्धा येथील दोन महिन्यांत तीन नवजात अर्भके लावारिस

## महिला-बालकल्याण आणि आरोग्य यंत्रणेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांत तीन नवजात अर्भके लावारिस अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या घटनांमुळे महिला-बालकल्याण व आरोग्य विभागाच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित होत असून, नोंदणी व प्रत्यक्ष स्थिती यामधील तफावत अधोरेखित होत आहे.

पहिली घटना २७ डिसेंबर २०२५ रोजी घडली. वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालय येथील स्वच्छतागृहात एका नवजात अर्भकाचा मृतदेह आढळून आला. रुग्णालय परिसरातच ही घटना घडल्याने सुरक्षाव्यवस्थेबाबतही शंका उपस्थित झाल्या. संबंधित घटनेची चौकशी सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.यानंतर २१ जानेवारी २०२६ रोजी वर्धा शहराजवळील जुनापाणी चौकात एक जिवंत नवजात अर्भक आढळले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्याने बालकाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळेत मदत मिळाल्याने त्या बालकाचा जीव वाचला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.तिसरी घटना १४ फेब्रुवारी २०२६ रोजी देवळी तालुका येथील सोनेगाव बाई परिसरात घडली. येथेही नवजात अर्भक आढळून आल्याने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यातील अंगणवाड्यांद्वारे गरोदर माता, स्तनदा माता, किशोरी मुली आणि ० ते ३ वर्षापर्यंतच्या बालकांची नोंद ठेवली जाते. आशा सेविका घरभेटी देऊन गर्भधारणेची माहिती संकलित करतात, नियमित तपासणी व समुपदेशन केले जाते. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, गेल्या दोन महिन्यांत जिल्ह्यात गृहप्रसूतीची एकही नोंद झालेली नाही. त्यामुळे या नवजात अर्भकांचा जन्म नेमका कुठे आणि कसा झाला, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर प्रसूती केंद्रे किंवा नोंदणीबाह्य वैद्यकीय सेवा यांचा शोध घेण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलिसांकडून तिन्ही घटनांची स्वतंत्र चौकशी सुरू असून, संबंधित पालकांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.दरम्यान, सामाजिक संघटनांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत जिल्हास्तरीय समन्वय बैठक घेण्याची मागणी केली आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजना, जनजागृती आणि समुपदेशन यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली. नवजात अर्भकांना सुरक्षित आश्रय देण्यासाठी उपलब्ध योजनांची माहिती व्यापकपणे पोहोचवण्याची आवश्यकता असल्याचेही मत व्यक्त होत आहे.सलग तीन घटनांमुळे जिल्ह्यातील आरोग्य व बालसंरक्षण यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पुढील काळात अशा घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलली जातात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# केंजाजी महाराज मंदिरावरून वाद; श्रद्धेच्या अंगणात राजकारणाची सावली?

**सेलू/ जनमाध्यम**

श्री संत केंजाजी महाराज मंदिर, घोराड येथील कथित गैरप्रकार आणि मंदिर समितीच्या कारभारावरून गावात नव्या वादाला तोंड फुटले आहे. श्रद्धा आणि व्यवस्थापन या दोन धाग्यांमध्ये तणाव निर्माण झाल्याचे चित्र असून, या प्रकरणामुळे घोराड परिसरातील वातावरण ढवळून निघाले आहे.

मंदिर समितीतील काही सदस्यांना कायम ठेवण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप पुढे आला आहे. काही निर्णयांवर प्रभाव टाकण्यासाठी स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांच्या नावाचा उल्लेख केला जात असल्याची चर्चा गावात रंगली आहे. विशेषतः जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या नावाचा आधार घेत निर्णयप्रक्रियेवर परिणाम घडवण्याचा प्रयत्न होत



असल्याचे आरोप काही भक्तांनी केले आहेत.

या पार्श्वभूमीवर काही भाविकांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयात लेखी तक्रार दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. मंदिराच्या आर्थिक व्यवहारांची व प्रशासकीय निर्णयांची सखोल चौकशी व्हावी, तसेच समितीची रचना नियमांनुसार करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आल्याचे समजते.भक्तांच्या मते, मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून गावाच्या सांस्कृतिक ओळखीचे केंद्र आहे. मंदिर व्यवस्थापन पारदर्शक असावे. कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा किंवा पदाचा वापर करून निर्णयांवर प्रभाव टाकणे अयोग्य आहे, असे मत काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. तर काही तरुणांनी या संदर्भात न्यायालयीन मार्ग अवलंबण्याचा इशाराही दिला आहे.दरम्यान, संबंधित पालकमंत्र्यांनी या वादापासून स्वतःला दूर ठेवत हा स्थानिक पातळीवरील विषय असल्याचे सांगितल्याची माहिती मिळते. प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल, अशी भूमिका त्यांनी मांडल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, त्यांच्या नावाभोवती निर्माण झालेल्या चर्चेमुळे प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे.मंदिर समितीकडूनही आपली बाजू मांडली जाण्याची शक्यता असून, सर्व निर्णय नियम व परंपरेनुसारच घेतले जात असल्याचा दावा काही सदस्यांनी अनौपचारिक चर्चेत केला आहे. तथापि, अधिकृत निवेदन अद्याप जाहीर झालेले नाही.गावातील नागरिकांनी श्रद्धास्थानाच्या पवित्रतेचे भान ठेवून वादावर लवकर तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. धार्मिक संस्थांच्या कारभारात पारदर्शकता, संवाद आणि कायदेशीर प्रक्रिया यांचे पालन झाल्यास निर्माण झालेला तणाव निवळू शकतो, असे मत जाणकार व्यक्त करीत आहेत. येत्या काही दिवसांत या प्रकरणी महत्त्वपूर्ण घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## कर्जबाजारी शेतकऱ्याची टोकाची पावले

**सेलू -** तालुक्यातील वडगाव (खुर्द) येथील शेतकरी हरीदास मुडे (५०) यांनी कर्जाच्या विवंचनेतून कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली. शेतीसाठी घेतलेले बँकेचे तसेच बचतगटाचे कर्ज फेडता येत नसल्याने ते मानसिक तणावात होते. अपेक्षित उत्पादन न झाल्याने आर्थिक अडचणी अधिकच वाढल्या होत्या. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतकरी समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सेलू पोलिसांनी घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# कारंजा कचरा डेपो धगधगतोय; शहर धुराच्या विळख्यात

## वर्षभरात तिसरी घटना; जबाबदार कोण!

**कारंजा/ जनमाध्यम**

कारंजा येथील कचरा डेपोला मध्यरात्री भीषण आग लागून शहरात धुराचे प्रचंड लोट पसरले आहेत. जळालेल्या कचऱ्याचा धूर सर्वत्र पसरल्याने नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असून राष्ट्रीय महामार्गावरील वाहनचालकांनाही दाट धुराचा सामना करावा लागत आहे. आग अद्याप पूर्णपणे आटोक्यात नसल्याने परिसरात चिंतेचे वातावरण आहे.

राष्ट्रीय महामार्गालगत, तहसील कार्यालयाच्या शेजारील डेपोमध्ये शहरातील दैनंदिन घरगुती कचरा टाकला जातो. मात्र कचऱ्यावर प्रक्रिया न करता वर्षानुवर्षे साठा वाढत गेल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. वारंवार लागणाऱ्या आगीमुळे धुराचे ढग निर्माण होतात आणि नागरिक, तहसील कार्यालयातील कर्मचारी तसेच आजूबाजूच्या वसाहतींतील कुटुंबांना श्वसनाचे त्रास सहन करावे लागतात. डास, किटक आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्नही तीव्र झाला आहे.

**आग लागतेच कशी?**

या पार्श्वभूमीवर प्रहारचे नेते जयकुमार बेलखडे यांनी नगरपंचायतीला निवेदन देत कचरा डेपोला वारंवार आग लागण्यामागील कारणांचा शोध घेण्याची मागणी केली आहे. ही आग अपघाती आहे की मुद्दाम लावली जाते असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कचऱ्यातील काही घटकांमुळे आर्थिक फायदा होत असल्याने आग लावली जाते, अशी नागरिकांमध्ये चर्चा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**वर्षभरातील तिसरी घटना**

मागील वर्षभरात कचरा डेपोला लागलेली ही तिसरी आग असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. ढिगाऱ्याच्या स्वरूपात साठविलेल्या कचऱ्यावर विलगीकरण किंवा प्रक्रिया न केल्याने प्रदूषणाचा प्रश्न चिघळत आहे. शहराच्या हद्दीत इतक्या मोठ्या प्रमाणात कचरा साठविल्यामुळे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.



## आग लागते की लावली जाते!

**निधी मंजूर; तरी प्रश्न कायम**

बेलखडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, डेपोवरील कचरा उचलण्यासाठी कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र या प्रक्रियेत अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी केला. प्रत्यक्षात १० ते १५ लाखांत होणाऱ्या कामासाठी कोटी रुपये खर्च होत असतील, तर त्याची चौकशी व्हावी,अशी मागणी त्यांनी केली. याबाबत जिल्हाधिकारी तसेच नगरविकास खात्याकडे तक्रार करून चौकशीची मागणी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, नगरपंचायतीकडून अधिकृत भूमिका अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. शहरातील नागरिकांनी तातडीने आग नियंत्रण, कचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन आणि आरोग्यविषयक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. धुराच्या विळख्यात अडकलेल्या कारंजा शहराला या संकटातून मुक्तता कधी मिळणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

# मुलांनी मोठी स्वप्ने पाहिली तरच समाज बदलणार-प्रा.गणेश शिंदे

## संत गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त वर्धा येथे प्रेरणादायी व्याख्यानमाला

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा येथे श्री संत गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगटदिन सोहळ्यानिमित्त भव्य व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. 'द इवेन्ट्स', 'वैद्यकीय जनजागृती मंच' आणि इंडियन रेड क्रॉस सोसायटी, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (१५ फेब्रुवारी) पार पडलेल्या या कार्यक्रमात ख्यातनाम व्याख्याते प्रा. गणेश आत्माराम शिंदे यांनी मुलांना मोठी स्वप्ने दाखवा' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वर्धा नगरपरिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ होते. यावेळी देवळी नगरपरिषदेचे अध्यक्ष किरण ठाकरे, हिंगणघाट बाजार समितीचे सभापती सुधीर कोठारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**स्वप्नांची उंचीच यशाची गुरुकिल्ली**

प्रा. शिंदे यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून पालकांना आवाहन केले की, मुलांच्या केवळ शैक्षणिक प्रगतीकडे न पाहता त्यांच्या मनात मोठी ध्येये आणि स्वप्ने रुजवावीत. स्वप्न पाहणारी पिढीच देशाचा भविष्यकाळ घडवते. मुलांना अपयशाची भीती न बाळगता प्रयत्नांची सवय लावली, तर तेच उद्याचे परिवर्तनकर्ते ठरतील, असे ते म्हणाले. त्यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्वही पटवून दिले.पालकमंत्री पंकज भोयर यांनी आयोजकांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत, अशा व्याख्यानमालेतून समाजात प्रबोधनाची चळवळ बळकट होत असल्याचे सांगितले. युवकांनी विविध क्षेत्रांत संधी शोधून प्रगती साधावी, असेही त्यांनी नमूद केले.

**विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव**

या सोहळ्यात क्रीडा, कला, शेती आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत विदर्भाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या क्रिष्णाई राऊत व श्रावणी देशमुख यांचा विशेष गौरव झाला. लोककला आणि शाहिरी परंपरेतील योगदानाबद्दल शाहीर बबनराव येवले यांचा सत्कार करण्यात आला.

शेळीच्या दुधापासून साबण तयार करून स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या एवोनिथ महिला उपजीविका गटाचा' सन्मान करण्यात आला. तसेच फळबाग क्षेत्रात प्रगती करणाऱ्या 'संघर्ष शेतकरी गट (गौळ) आणि वसुंधरा महिला गट (रोहणा) तसेच प्रतिज्ञा महिला गट (कारंजा) यांचाही गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन पावडे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. प्रशांत वाडीभस्मे



यांनी केले. कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रेरणादायी वातावरणात संपन्न झालेल्या या व्याख्यानमालेने प्रगटदिन सोहळ्याला विशेष उंची प्राप्त करून दिली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'रिदम-२०२६': गायिका असीस कौर यांच्या लाइव्ह कॉन्सर्टने रंगला संगीत महोत्सव!

## डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसरात आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसरात आयोजित 'रिदम – २०२६' अंतर्गत सुप्रसिद्ध बॉलीवूड गायिका असीस कौर यांच्या 'कॉन्सर्ट नाईट' या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भव्य आणि दिमाखदार वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी संगीतमय पर्वणी ठरलेल्या या कार्यक्रमाला अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमादरम्यान डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसराचे अध्यक्ष योगेंद्र गोडे, संस्थेच्या सचिव तन्वी गोडे मॅडम, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश गोडे, संस्थेच्या उपाध्यक्षा सोनालीताई गोडे, संस्थेच्या कोषाध्यक्षा उषाताई गोडे, राहुलजी गोडे, महफिल हॉटेल चे संचालक प्रतीक मुंधडा, डॉ. हरिभाऊ गुल्हाने, डॉ. अडवाणी, बाळासाहेब वैद्य, हेमंतराव डिके तसेच [illegible] महाविद्यालयांचे प्राचार्य, समन्वयक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





बॉलीवूडमध्ये आपल्या सुरेल आणि प्रभावी आवाजाने विशेष स्थान निर्माण करणाऱ्या गायिका असीस कौर यांनी 'बोलना', 'वे माही', 'रातां लंबियां', 'मखना' आदी सुपरहिट गीतांच्या सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रत्येक गाण्यावर विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोषात साथ दिली. संपूर्ण परिसर रोषणाई, आकर्षक ध्वनीव्यवस्था आणि रंगमंच सजावटीमुळे उत्साहाने उजळून निघाला होता.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी मोबाईल फ्लॅशलाइट्सच्या प्रकाशात गाण्यांना दिलेली साथ हा विशेष आकर्षणाचा क्षण ठरला. गायिका असीस कौर यांनीही विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या ऊर्जेचे आणि प्रेमाचे कौतुक केले.या भव्य संगीत सोहळ्याचे आयोजन संस्थेची सांस्कृतिक समिती आणि शैक्षणिक परिसरातील सर्व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. शिस्तबद्ध आयोजन, सुरक्षा व्यवस्था आणि व्यवस्थापनाची उत्कृष्ट जबाबदारी यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला.

संस्थेचे अध्यक्ष योगेंद्र गोडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक करत सांस्कृतिक कार्यक्रम हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. सचिव तन्वी गोडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच सांस्कृतिक उपक्रमांनाही तेवढेच महत्त्व दिले जाते, असे नमूद केले.

कार्यक्रमाला डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चचे प्राचार्य डॉ. सागर सी. जिरापुरे, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजचे डायरेक्टर डॉ. एस. एस. हटकर, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. जे. एम. देशमुख, राजेंद्र गोडे आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या प्राचार्या डॉ. उज्वला साखरकर, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. प्रमोद बुरकले, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. हरीगोपाल एस. सावरकर, डॉ. राजेंद्र गोडे नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या प्रा. मीनल बायस्कर, डॉ. राजेंद्र गोडे पॉलिटेक्निकच्या समन्वयक प्रा. दिपाश्री देशमुख, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा अमरावतीत भव्य मेळावा आज

**अमरावती/प्रतिनिधीः-** ईपीएस-९५ पेन्शन योजनेतील पेन्शनधारकांच्या न्याय्य मागण्यांसाठी देशपातळीवर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समिती, अमरावती यांच्या वतीने शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या 'मातोश्री विमलताई देशमुख सभागृह', शिवाजीनगर, अमरावती येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या सक्षम नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांपासून ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या न्याय्य हक्कांसाठी देशभर विविध स्तरांवर सातत्याने आंदोलन सुरू आहे. तथापि, ईपीएफओ व केंद्र सरकारकडून केवळ आश्वासनांपलीकडे ठोस निर्णय झालेला नसल्याने पेन्शनधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक ९ ते ११ मार्च २०२६ दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या देशव्यापी आंदोलनाची सविस्तर माहिती देणे तसेच आंदोलन अधिक संघटित व प्रभावी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे.या मेळाव्यास राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत, महासचिव विरेंद्रसिंग राजावत, राष्ट्रीय सचिव (महिला आघाडी) सरितताई नारखेडे, पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर, प्रांतीय संघटक (महाराष्ट्र) अजितकुमार घाडगे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष भानुदास नारखेडे तसेच पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इंद्रसिंग राजपूत हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# अंजनगाव येथे जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम

## -नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात १८ फेब्रुवारी बुधवार रोजी तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत नागरिकांच्या समस्या व प्रलंबित कामे गावातच सोडवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता.



या कार्यक्रमात तालुक्यातील नागरिकांच्या तक्रारींचे थेट निवारण करण्यात आले आहे. तर काही नागरिकांच्या सार्वजनिक कामे व योजना मधील अडचणी थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आल्या त्या तक्रारीचा २१ दिवसांच्या आत निवारण करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारदारांना दिले. यावेळी आमदार गजानन लवटे, अविनाश गायगोले नगराध्यक्ष, प्रियंका मालठाणे उपनगराध्यक्ष, राजेश्वर हांडे उपविभागीय अधिकारी पुष्पा सोळंके (दाभेराव), तहसीलदार विजय लोहकरे मुख्याधिकारी कल्पना जायभाये गटविकास अधिकारी, सुरज बोंडे ठाणेदार,भारती जाधव कृषी अधिकारी ,सह तालुक्यातील सर्व विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमात तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नागरिकांनी आपल्या तक्रारीच्या समस्या मांडल्या. हा उपक्रम शासनाच्या पारदर्शकतेसाठी आणि थेट लोकांशी संवाद साधण्यासाठी झाला असल्यामुळे प्रशासकीय कामाला गती मिळेल अशी अपेक्षा नागरिकांना आहे.

# आईसह मुलीची १.५१ कोटींची फसवणूक

## -बिल्डर असल्याचे सांगत मोठ्या प्रकल्पाचे आमिष

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वतःला नामांकित बिल्डर व बांधकाम व्यावसायिक असल्याचे भासवून गुंतवणुकीचे आमिष दाखवत मुधोळकर पेठ परिसरात राहणाऱ्या मायलेकीची तब्बल १ कोटी ५१ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा धक्कादायक प्रकार १४ फेब्रुवारी रोजी उघडकीस आला आहे. आरोपीने मोठी रक्कम उकळल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पोलीस आयुक्तांकडे करण्यात आलेल्या तक्रारीनंतर त्यांच्या निर्देशानुसार राजापेठ पोलीस ठाणे येथे श्रीकांत हरगोविंद कलंत्री (रा. कॅम्प, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, आरोपीने स्वतःला मोठा व प्रसिद्ध बिल्डर असल्याचे सांगत विश्वास संपादन केला. कंवरनगर रोडवरील उभारण्यात येत असलेल्या मोठ्या मॉलमध्ये ५० टक्के भागीदारी असल्याचा दावा त्याने केला होता. तसेच तपोवन रोडवरील प्रकल्प आणि नवजीवन रुग्णालयामागे उभारल्या जाणाऱ्या 'स्काय टॉवर'मध्येही आपली हिस्सेदारी असल्याचे सांगितले. आरोपीने बांधकाम सुरू असलेल्या इमारती दाखवत फ्लॅट देण्याचे आमिष दाखवले व आकर्षक परतावा व व्याजासह रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले. विश्वास बसल्यानंतर मायलेकीकडून आरोपीने वेगवेगळ्या हप्त्यांत एकूण १ कोटी ५१ लाख रुपये घेतल्याचे समोर आले आहे. त्यानंतर १७ ऑगस्ट २०२४ रोजी परस्पर सामंजस्याचा बहाणा करत एक करारनामा करून घेतला. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, हा करारनामा जाणीवपूर्वक पैसे परत न करण्याच्या उद्देशाने करण्यात आला होता. रक्कम परत मागितल्यावर आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून आरोपीची भूमिका, गुंतवणुकीसंबंधित कागदपत्रे व व्यवहारांची सखोल चौकशी केली जात आहे. या प्रकरणामुळे शहरातील गुंतवणूकदारांमध्ये चिंता व्यक्त होत असून नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता व्यवहार करताना योग्य कागदपत्रांची खातरजमा करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.


# देवाच्या नामामध्ये आनंद

## -बाल किर्तनका हभप कृष्णाई महाराज पाटील

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** येथील पुरातन महादेव मंदीर येथे महाशिवरात्री पर्वावर दि. १४ फेब्रुवारी २०२६ ला रात्री ८ वा.महाकाल समिती कुऱ्हा यांचे वतीने हरिकीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या हरि किर्तन कार्यक्रमाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध बाल किर्तन ह.भ.प कृष्णाई महाराज पाटील लांजूलकर (देवरी) ता. आकोट जि.अकोला यांनी आपल्या किर्तनातून अतिशय सुंदर असे देवाच्या नामामध्ये आनंद आहे, मुलांचा अन्न संस्कार कुठेतरी बिघडत चालला आहे.याप्रमाणे अनेक मुद्दे अमृतवाणीतून मांडले आणि सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यांना सम साथ संगत विणेकरी विशाल महाराज ठाकरे (अंजनसिंगी),मृदंग वादक हनुमंत तसरे (आमला वि.) ,गायक किरणताई लांजूलकर (देवरी), शुभांगी डाहुले (मेढेगांव ) जि. भंडारा, शितल भेंडारकर (सावरटोला) जि. गोंदिया, यांची साथ होती. या हरिकिर्तनाला कुऱ्हा गावकरी महिला, पुरुष, युवक व महाकाल समिती सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रवंदनाने कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

# अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या जसापुर मध्ये पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रात्रीच्या सुमारास घडली आहे.



रोहिणी गोपालराव मोहेकर (वय १५, जसापूर ) असे आत्महत्या करणाऱ्या मुलीचे नाव आहे. माहितीनुसार रोहिणी मोहेकर चांदूरबाजार येथील टोम्पे महाविद्यालयात शिक्षण घेत होती. तिने आपल्या राहत्या घरी रात्रीच्या वेळेस गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी जेव्हा घरातील लोक जागे झाले तर ही घटना समोर आली. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच चांदूरबाजार ठाणेदार उल्हास राठोड, नितीन डोंगरे, राहुल गौरखेडे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमॉर्टम साठी पाठवला. आत्महत्येचे कारण अद्यापही समोर आले नाही. पोलिसांनी मृतदेह शव विच्छेदनासाठी अमरावती येथे पाठवला आहे. पुढील तपास नितीन डोंगरे ,राहुल गौरखेडे करत आहे.

# संत नामदेव महाराज विश्व महासंमेलन रविवारी केंद्रीय मंत्री गडकरी पुरस्काराने होणार सन्मानित

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलन आयोजन समितीच्या वतीने रविवार २२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथील रेशम बाग मध्ये राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना संत नामदेव महाराज विश्वरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पदमश्री राम किशोर छिपा डेरावाला, पदमश्री कन्नू टेलर, प्रवीण दर्जी आदि उपस्थित राहणार असल्याची माहिती बुधवार १८ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की संमेलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय कृषिमंत्री प्रल्हाद जोशी, खासदार प्रणिती शिंदे, संजय नहार, डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा, चरित्र अभिनेते गोविंद नामदेव ,ह भ प जितेंद्र नाथ महाराज, स्वामी गोविंदगिरी महाराज, सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज आदि उपस्थित राहणार आहेत. तमिळमध्ये संत नामदेव महाराज यांचे नाव राष्ट्रीय महापुरुष व संतांच्या यादीमध्ये समाविष्ट करणे, पंढरपूर येथे होत असलेल्या नामदेव महाराज स्मारकाला भरीव निधी मंजूर करणे, शिंपी विद्यार्थ्यांना विशेष छात्रवृत्ती जाहीर करणे, जिल्हा किंवा शहर पातळीवर विद्यार्थी करिता संत शिरोमणी नामदेव महाराज वसतीगृहाची स्थापना करणे, क्लस्टर झोन मध्ये शिंपी उद्योजकांकरिता प्लांट राखीव ठेवणे, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात बिल्डिंगमध्ये शिंपींकरिता गाळे राखीव ठेवणे, समाजाच्या युवक-युती करिता विशेष सुविधा व सशक्त करण्याचे प्रयत्न करणे आदि मागण्यांवर चर्चा करण्यात येणार आहे. मेळाव्यामध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये मुख्य संयोजक ईश्वर धिरडे, भास्कर टोम्पे आदि उपस्थित होते.




# अमरावती येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात

## ११३ उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच स्थानिक जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती कार्यालयाच्या आवारात 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास जिल्ह्यातील उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ९१ रिक्त पदांसाठी ऑनलाईन/ऑफलाईन १९६ उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी १७८ उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या व मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ११३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

या मेळाव्यात नामांकित खासगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यामध्ये इंदिराबाई मेघे महाविद्यालयाचे प्राचार्य अजय कोल्हे, डाटानोवा टेक्नॉलॉजी प्रा.ली. चे निशांत गिरी, भारतीय महाविद्यालयाचे आवारे, जिओ स्टोअर चे महेश कुंभार, हितेश गावंडे, सचिन निचले, शुभम ठवकर या उद्योजकांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली तसेच त्यांनी उपस्थित उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन विविध पदांवर निवड केली.जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, अनिषेक ठाकरे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश सोहळे यांनी तर आभार प्रदर्शन पंकज कचरे यांनी केले.

# कापुसतळणीत आज 'गाव भेट उपक्रम' 'शेतकरी-महिला संवाद' कार्यक्रमाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महसूल विभागातर्फे शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता 'गाव भेट उपक्रम २०२६' अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, कापुसतळणी, ता. अमरावती येथे शेतकरी व महिला संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे.

आमदार राजेश वानखडे, अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात महिलांच्या आरोग्यासाठी कॅन्सर तज्ज्ञ डॉ. अरोरा हे 'महिला संबंधित कर्करोग' यावर मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरादरम्यान विविध लोकोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत, ज्यात प्रामुख्याने गावात स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महिलांच्या आरोग्यासाठी विशेष तपासणी शिबीर, नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित तक्रारींचे जागीच निवारण, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन, जनावरांच्या आरोग्यासाठी तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, शेतकरी आणि महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राजस्व मंडळ डवरगाव आणि तहसील कार्यालय, अमरावती यांनी केले आहे.

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.४६/२०२६ — ने.ता.१८.०३.२०२६

**पंकज अधिक तीन -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :**
१. पंकज उत्तम मार्गे, रा.वडुरा, जि.अमरावती
२. सविता बंडू राठोड, रा.मोझरी, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम
३. संगीता सुनिल मोरे, रा.वार्ड नं.१, मल्हारा, अमरावती, ता.जि.अमरावती
४. सुनिता पुरुषोत्तम लाहे, रा.भडशिवनी, पो.शहा, ता.कारंजा, जि.वाशिम

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **उत्तम गणपत मार्गे** यांचा मृत्यू दि.**०३.०९.२००७** रोजी व **बेबी उत्तम मार्गे** यांचा मृत्यू **०१.०८.२०२५** रोजी राहत्या घरी वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा व अर्जदार नं.२ ते ४ ह्या मुली आहेत मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७०/२०२६ — ने.ता.२३.०३.२०२६

**अर्जदार :**
१. निर्मला सुधाकरराव धोंडे, वय ८३ वर्षे, धंदा - घरकाम
२. जागृती राजेश धोंडे, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
३. सुशांत राजेश धोंडे, वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण
(अर्जदार नं.२ व ३ तर्फे अ.पा.क.आजी अर्जदार नं.१)
सर्व रा.इनायतपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत राजेश सुधाकर धोंडे** हे इनायतपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवाशी होते. यांचा मृत्यू दिनांक **२५.०१.२०११** रोजी इनायतपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मयत वैशाली राजेश धोंडे** ही इनायतपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमची रहिवाशी होती. तिचा दि.**१६.०५.२०२१** रोजी इनायतपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे मयत राजेश सुधाकर धोंडे व मयत वैशाली राजेश धोंडे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.७०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १२/२०२६ — ने.ता.२०.०२.२०२६

**अर्जदार -**
१. लिला जानराव तंतरपाळे
२. सुमन बाबुरावजी खेडकर
३. शशिकला नारायण मनोहरे

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ते ३ ह्या मयत **अहिल्याबाई किसनराव खंडारे** यांच्या मुली आहेत. **मयत अहिल्याबाई किसनराव खंडारे** यांचे वृध्दापकाळाने दि.**०५.०५.२०१६** रोजी **राजुरवाडी** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे निधन झाले. तसेच **मयत अहिल्याबाई किसनराव खंडारे** यांचे पती **किसनराव मालुजी खंडारे** यांचे दिनांक **१८.१२.१९९८** रोजी राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे निधन झाले. **मयत अहिल्याबाई किसनराव खंडार** यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २२.०१.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७१/२०२६ — ने.ता.२०.०३.२०२६

**अर्जदार :**
१. नामदेव केशवराव भुते, वय ७३ धंदा - मजुरी
रा.इंदिरा नगर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. प्रमिला ज्ञानेश्वर भडके, वय ४७ धंदा - घरकाम
रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**इंडियन सक्सेशन ॲक्टच्या कलम ३७२ प्रमाणे सक्शेशन प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत किरण केशव भूते** हे रा.खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. ते दिनांक **०३.०५.२०२४** रोजी खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावले. ते अविवाहीत होते. त्यामुळे मयत किरण केशव भूते यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार मयतांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना बॅकेतील रक्कम दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि., अमरावती शाखा करजगांव, खाते नं.०३६००६२००००२६५६ असे एकुण रु.३,४९,७९०/- (तीन लाख एकोणपन्नास हजार सातशे नव्वद रुपये) जमा आहेत. त्याकरीता सक्सेशन प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.७१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.११.०२.२०२६रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## संक्षिप्त



### गांधी विद्यालयात पोवाड्यातून शवचरित्राचे सादरीकरण

**अंजनगाव बारी-** गांधी विद्यालय बडनेरा येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक दिगंबर करडे होते. प्रमुख अतिथी म्हणून अनिश बडगुजर, मिलिंद चिरडे, कमल चांडक,गंगा भैसने,अश्विनी ढोले व सुधीर अवघड मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध भाषणे सादर केली. प्रशांत दुधे यांनी जोशपूर्ण पोवाडा सादर करून उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना जागृत केली, तर वैभव काळे यांनी तालसाथसंगत करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.अध्यक्षीय भाषणात दिगंबर करडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या शौर्य, धैर्य व राष्ट्रप्रेमाचा आदर्श घेऊन आपले जीवन उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अभय राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन आश्विनी ढोले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाच्या प्राचार्या वंदना टिक्कस यांचे मार्गदर्शन लाभले.



### मनपात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**अमरावती-**छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत झाला. या निमित्य महापौर तेजवाणी यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर शिवटेकडी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे हस्ते हारार्पण करण्यात आले. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे,गटनेता चेतन गावंडे, गटनेता अविनाश मार्डीकर, नगरसेवक प्रमोद महल्ले, नगरसेविका सुरेखा लुंगारे, कल्याणी तायडे, ममता आवारे, मरियम बानो मोहम्मद ईस्माईल रारानी, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, नगरसचिव संदिप वडुरकर, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, अभिलेखागार नंदकिशोर पवार, कार्यालय अधिक्षक गुलशन मिरानी, उपअभियंता प्रमोद इंगोले, हेमंत महाजन, उद्यान निरीक्षक श्रीकांत गिरी, मुकेश खारकर, सुनिता गुर्जर, विपीन त्रिवेदी, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, शुभम पंधे, शुभम वानखडे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### शहरात शिवजयंती उत्साहात साजरी

**अचलपुर-**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती निमित्त परतवाडा - अचलपूर शहरात विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आली.परतवाडा शहरात जयस्तंभ चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यांचे पूजन करून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माता तसेच मावळ्यांच्या वेशभूषा विविध विद्यार्थ्यांनी परिधान केले होते.या मिरवणुकीमध्ये नागरिक, महिला,पुरुष, तरुण मंडळी सहभागी झाले होते.यावेळी अचलपूर मतदार संघाचे विद्यमान आ. प्रवीण तायडे,माजी आ. बच्च कडु, भाजपा चे जेष्ठ नेते गजानन कोल्हे, भाजपा जिल्हा ग्रामीण महामंत्री सुधीर रसे, निलेश सातपुते,प्रमोद डेरे,नगरसेवक अभय माथने,भाजपा शहराध्यक्ष कुंदन यादव,विशाल काकड,नगरसेवक अनिल अग्रवाल,प्रवीण पाटील, रवी अग्रवाल,सुनील खानझोडे,राज पाटील,अंकुश जवंजाळ, अणु महाराज मिश्रा,गोपाल खेतान, रुपेश ढेपे, डॉ.अनंत पोरे,श्रीपाद तारे,सुनील चौधरी,निलेश गावंडे, डॉ.राजेश उभाड,अभिजीत काळमेघ,सागर वाटाणे, मनोज नंदवंशी, अमोल गोहाड,विलास सोळंकी,संतोष खुटेटा,अरुण घोटकर,प्रफुल बर्वे,सागर चांदणे, अक्षय पखाले,दिलीप आस्वानी,गौरव रघुवंशी, शिवा बुंदेले,मयंक शर्मा आदी उपस्थित होते.यावेळी परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या सह पोलिस कर्मचाऱ्यांचा तगडा बंदोबस्त होता.



### तिवसा येथे महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना फराळ वितरण

**तिवसा-**येथील शिक्षकस्थित असलेल्या सिद्धेश्वर शिव मंदिर व संकट मोचन हनुमान मंदिर येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पार्वतीमाता महिला उत्सव समितीच्या वतीने २५ किलोचे उसळ, राजगिरा लाडू व रत्नाळू असे फराळ वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुष्पा टेकाडे, भारती कापसे,सिंधू ढोबाळे, कुमुदिनी सोनटक्के, मोनाली कापसे,अश्विनी देशपांडे, अर्चना कडगे,कविता बायस्कर, अनिता कापसे,ज्योती कापसे, ज्योती रिठे, पुष्पा रिठे, वैशाली कुर्हेकर, सुरेखा आंबाडकर,अवंतिका पुनसे,सुषमा खेडकर, सिंधू आमले व पुरुष-युवक मंडळीनी मोलाचे सहकार्य केले. १६ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाची सांगता होईल.

# चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत इंग्रजी विभागातील सूचना मराठीतच दया

## प्राथमिक शिक्षक समितीची परीक्षा परीषद कडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा ही मराठी, सेमी इंग्रजी, हिंदी, उर्दू व अन्य माध्यमाच्या इंग्रजी विभागातील प्रश्न विषयक सूचना विद्यार्थ्यांना आकलन होण्यासाठी मराठी व अन्य संबंधित माध्यमातून दयाव्या अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे,आयुक्त महेश चोथे यांना निवेदनाव्दारे केली आहे अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

परीक्षा परिषदेने इयत्ता चौथीची शिष्यवृत्ती परीक्षेच्या मराठी माध्यमाच्या इंग्रजी विभागाचे प्रश्न हे पूर्णपणे इंग्रजी मध्ये असतील असे निर्देश दिले आहेत.राज्यात मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये २००० पासून इंग्रजी विषय हा तिसरी भाषा म्हणून सुरु झाला. मात्र यात व्याकरण विषयक अथवा भाषिक कौशल्यापेक्षा बालकांना इंग्रजी भाषेची ओळख होण्यासह आवड निर्माण व्हावी. इंग्रजी भाषा विषयक भीती दूर व्हावी आणि हसत-खेळात इंग्रजी विषयाची समज होणे हा प्रधान हेतू होता. त्यामुळेच इयत्ता पहिलीपासून चौथी पर्यंतच्या इंग्रजी विषयाच्या क्रमिक पुस्तकात इंग्रजी कविता, उताऱ्यांसह अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना आकलन होण्यासाठी सूचना इंग्रजीसह मराठी मध्ये देण्यात आलेल्या आहेत. अन्य उर्दू, हिंदी, कन्नड इत्यादी माध्यमाच्या क्रमिक पुस्तकात सुद्धा त्या-त्या भाषेत अशा सूचना आहेत.यापूर्वी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत इंग्रजी विभागाच्या प्रश्नांचे विद्यार्थ्यांना सुलभतेने आकलन होण्यासाठी मराठी वा अन्य माध्यमाच्या संबंधाने इंग्रजीसह त्या-त्या भाषेत सूचना दिल्या जात होत्या.यावर्षी पासून पुन्हा सुरु झालेल्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत इंग्रजी विभागातील प्रश्न सोडविताना दिल्या जाणाऱ्या इंग्रजीतील सूचनांसह त्याचे भाषांतर विद्यार्थ्यांच्या हितास्तव मराठी आणि अन्य संबंधित माध्यमाच्या भाषेतून असावे अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून आग्रही विनंती करण्यात आली आहे.ही शिष्यवृत्ती परीक्षा भरउन्हात २६एप्रिलला होणार आहे.इयत्ता ५व८वीची शिष्यवृत्ती परीक्षा येत्या २२फेंब्रुवारीला होणार असुन इयत्ता ४थी व७वीची बंद झालेली शिष्यवृत्ती परीक्षा शासनाने पुन्हा सुरू केली आहे.

# तरूण पिढीने शिवरायांच्या विचारांचा वारसा जपावा : कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**

शिवरायांच्या संस्कारांची आणि मूल्यांची आजच्या काळात गरज असून तरुण पिढीने शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपावा, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, प्रादेशिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.



कुलगुरू पुढे म्हणाले आजच्या काळात सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव आहे, परंतू आपण आपल्या जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत. तरुण पिढीने अमली पदार्थांच्या व्यसनासोबतच मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे. वाढता स्क्रीन टाईम तरुणांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि सहनशीलतेवर विपरीत परिणाम करत आहे. शिवजयंती म्हणजे केवळ रॅली किंवा उत्सव नसून, ती स्वतःच्या भूमिकेचे आणि राष्ट्रभक्तीचे आत्मचिंतन करण्याची संधी असल्याचेही ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी समर्थ रामदास स्वामींनी शिवरायांचे वर्णन करताना लिहिलेल्या 'शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप' या ओव्यांचा उल्लेख करत शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आठवण करून दिली.समाजाला आपल्या हक्कांची पूर्ण जाणीव आहे, परंतू आपण आपल्या जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत, अशी खंत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. नागरी शिस्तीचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले रस्त्यावरील खड्ड्यांसाठी प्रशासनाला दोष देतानाच, रस्त्यावर न थुंकणे ही आपलीही जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.शिवजयंती केवळ रॅली काढून साजरी न करता, शिवरायांनी दिलेला राष्ट्रभक्तीचा मंत्र अंगीकारून आपण समाजासाठी आणि देशासाठी काय करू शकतो, याचे चिंतन प्रत्येकाने करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रा. शुभम पाचखंडे यांनी लिहीलेल्या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्तविक भाषणातून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी १६ ते २१ फेब्रावारी दरम्यान शस्त्र प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्फूर्ती गीत स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, एकपात्री प्रयोग स्पर्धा आणि पोवाडा आदी स्पर्धा आयोजनामागील भूमिका मांडली. वैभव म्हस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली.पेटेन्ट मिल्याबद्दल डॉ. रत्नशील खोब्रागडे यांचा, सॉफ्टबॉल स्पर्धेत मेडल मिळविल्याबद्दल राधिका उमेश दानखेडे हिचा, तर उत्कृष्ट छायाचित्र काढल्याबद्दल ईश्वरी गांजरे हिचा कुलगुरूंनी सत्कार केला. याप्रसंगी सहा वर्षाचा शिवांश वैभव इंगळे याने 'छत्रपती संभाजी महाराजांवर', तसेच अमरजित वानखडे व चमूने 'अफजलखानचा वध' सुरुवातीला पोवाडा सादर केला.संचालन प्रा.आदित्य पुंड याने, तर आभार डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी मानले. कार्यक्रमाला उपकुलसचिव मंगेश वरखेडे, विक्रांत मालवीय, डॉ.अनिता पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. प्रेमानंद तिडके तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## जि. प. शाळा वडूरा येथे शिवजयंती उत्साहात

**खल्लार -**नजिकच्या वडूरा येथे जिल्हा परिषद उच्च माध्यमिक प्राथमिक मराठी शाळेत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर शाळेचे शिक्षक विजय मकेश्वर यांनी आपल्या



प्रास्ताविकात स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवनाविषयी माहिती दिली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवनाविषयी माहिती सांगितली. शाळेच्या शिक्षिका मनिषा लोणकर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## साऊरकरांनी जागवली शिवजयंतीनिमित्त राष्ट्रभक्ती

**टाकरखेडा संभू -**साऊर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच व संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती, अध्यक्ष भातकुली तालुका काँग्रेस कमिटी श्रीकांत बोंडे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष प्रकाश बोंडे,माजी ग्रामपंचायत सदस्य राजू रहाटे, रोशन बोंडे, अनिल बोंडे, सतीश



पोटे, सत्यजित विधळे, विक्रांत बोंडे, अजय देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच दादा भामोदकर विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र जावरकर, शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मराठी पत्रकार संघाचे भातकुली तालुका अध्यक्ष संतोष शेंडे यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून शिवचरित्रातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. शिवजयंती निमित्त राष्ट्रभक्तीपर घोषणा व सांस्कृतिक उपक्रमांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे आयोजन उत्तम प्रकारे पार पडले.

# रमजानपूर्वी शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

## बांधकाम सभापती इब्राहिम बेग, हसन बेग यांचे प्रशासनाला निवेदन

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी शहरातील नागरिकांनी नगर परिषद आणि महावितरण प्रशासनाकडे पाणीपुरवठा व वीजव्यवस्थेच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी जोरदार मागणी केली आहे. शहरातील, मन्सूरी मजित, काजी पुरा इस्लाम नगर,नौगजी प्लॉट, ईमाम चौक,काठीपुरा, दंत घाट, या परिसरात पान अटाई ते नौगजी परिसराचे खूप मोठ्या अंतरावर असल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. त्यामुळे या परिसरात रमजान महिन्यांपूर्वी योग्य नियोजन करून सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती इब्राहिम बेग हसन बेग यांनी जिवन प्राधिकरण प्रशासनाला केली आहे.

सपूर्ण शहरांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्यामुळे शहरातील नागरिक हैराण झाले असून, याबाबत प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊन त्वरित लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.बांधकाम सभापती इब्राहिम बेग हसन बेग यांनी दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे की, रमजान महिन्यात उपवास (रोजा), धार्मिक विधी व स्वच्छतेला विशेष महत्त्व असल्याने स्वच्छ आणि पुरेसा पाणीपुरवठा अत्यावश्यक आहे. मात्र सध्या शहरात येणारे पाणी दूषित, दुर्गंधीयुक्त व आरोग्यास धोकादायक असल्यामुळे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे रमजानपूर्वी संपूर्ण शहरातील पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनची तातडीने स्वच्छता करून सुरळीत व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.त्याचबरोबर महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता यांनाही स्वतंत्र निवेदन देत शहरातील इलेक्ट्रिक डी.पी. (अ्झ) व वीजवाहिन्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. सध्या अनेक भागांत तांत्रिक बिघाडामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, रमजान काळात यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत सर्व डी.पी. व वीजवाहिन्यांचे मेंटेनन्स पूर्ण करून अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.रमजानपूर्वी तातडीची कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा बांधकाम सभापती इब्राहिम बेग हसन बेग यांनी दिला असून, प्रशासनाने या गंभीर विषयाची त्वरित दखल घेऊन जलद आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## शिवजयंती महोत्सवानिमित्त विविध स्पर्धा

# २२ फेब्रुवारीला शिवराज्याभिषेक सोहळा व प्रेमकुमार बोके यांचे व्याख्यान

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, चांदूर रेल्वे यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सवानिमित्त २२ फेब्रुवारी पर्यंत विविध स्पर्धा व व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवात पोस्टर स्पर्धा, रिल्स स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच सामान्य ज्ञान स्पर्धेचा समावेश असून विद्यार्थ्यांपासून तरुणांपर्यंत सर्वांना नि:शुल्क सहभागाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.तर महोत्सवाचा प्रमुख सोहळा २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सरस्वती शाळेसमोर, जुना बस स्टँड, चांदूर रेल्वे येथे पार पडणार आहे. यावेळी भव्य शिवराज्याभिषेक सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून शिवश्री प्रेमकुमार बोके (व्याख्याते व लेखक, अंजनगाव सुर्जी) उपस्थित राहणार आहेत. याचदरम्यान चारही स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षिस रोख रक्कम व शिल्ड उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार समाजात रुजविणे आणि युवकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण करणे हा या महोत्सवामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी कळविले आहे. नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर भगोले, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, केंद्रीय चिटणीस प्रा. रवींद्र मेंढे, राज्य सदस्य उत्तमराव गावंडे,तालुकाध्यक्ष विवेक राऊत,तालुका उपाध्यक्ष रितेश मुंधडा, सचिव राजीव शिवणकर, कोषाध्यक्ष राजेश सराफी, सदस्य निशिकांत देशमुख, अमोल गवळी, इरफान पठाण, रवी कलाने, शहेजाद खान, राहूल देशमुख, प्रकाश रंगारी, अमर घटारे, धीरज नेवारे, संजय डगवार, विनय गोटेफोडे, मनिष खुने, प्रशांत सिसोदीया, सुमेद सरदार, पियुष ठोंबरे, अमोल ठाकरे व इतरांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेत कपिल अवस्थीला सुवर्ण पदक

**अचलपूर/ वार्ताहर**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाच्या योग विभाग व बृहन महाराष्ट्र योग परिषद यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजीत चतुर्थ राष्ट्रीय योगासन स्पर्धेत ४०० पेक्षा अधिक योगपटूंनी सहभाग घेतला होता. वय ६ ते ५५ पर्यंत असा स्पर्धकांचा सहभाग होता.

यावेळी डि.सी.पी.ई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीतीत उद्घाटक म्हणून वरिष्ठ पत्रकार वैभव चिंचाळकर, कृष्णा लोखंडे यांचे सह माजी प्राचार्य व वरिष्ठ योगगुरू डॉ. अरुण खोडस्कर, योग विभागाचे प्रमुख डॉ. सुनील लाबडे, योग पटू आनंद हिवराळे,नितिन काळे, डॉ वशिष्ट खोडसकर आदी



मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगगुरू डॉ.अरूण खोडस्कर यांनी केले. संचालन डॉ. अर्चना देशपांडे यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा.सुष्मा शिरभाते यांनी केले.समारोपिय सत्रांमध्ये व्यासपीठावर प्राध्यापिका अर्चना देशपांडे, राष्ट्रीय योग प्रशिक्षक व परीक्षक स्वाती गडेकर,अमरावती बृहन महाराष्ट्र परिषदेच्या उपाध्यक्ष गायधनी, डॉ .विशाल खोडसकर,प्रा. प्रतीक पात्रे, प्रा. प्रणय पवार उपस्थित होते.या चौथ्या राष्ट्रीय योगासन या स्पर्धेत अचलपूर येथील बुंदेलपुरा निवासी सदस्य स्वामी विवेकानंद विचार मंच बहुउद्देशीय संस्थेचे कपिल अशोक अवस्थी यानी २८ ते ३५ या वयोगटात नेत्रदीपक कामगिरी केल्याने त्यांना सुवर्ण पदक मिळाले.योग पटू कपिल ने या यापूर्वी गेल्या वर्ष २९ जून रोजी राज्यस्तरीय योगासन स्पर्धा मध्ये ही कास्यपदक प्राप्त केले होते.यापुढे आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवून देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.या उल्लेखनीय कामगिरीचे श्रेय कपिल ने आई- वडील,गुरु वर्ग, सर्व सहकारी,संस्था ला दिले आहे.


# कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आढळले नवजात अर्भक



### बडनेरा परिसरात खळबळ

नवजात बालिकेचा मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अल्मास नगर परिसरात आज गुरुवारी (दि.१९) दुपारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली. कचऱ्याच्या ढिगाऱ्यात एका



आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, भटक्या कुत्र्यांनी या मृतदेहाचे लचके तोडले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी एक भंगार विक्रेता कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळून जात असताना त्याला एका प्लास्टिक पिशवीत नवजात बालिकेचा मृतदेह दिसला. त्या बालिकेची नाळही कापलेली नव्हती. त्याने तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन (पान २ वर)



### फॉरेन्सिक व डॉग पथक दाखल

या घटनेची माहिती दुपारी बडनेरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुनील चव्हाण यांना फोनद्वारे देण्यात आली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांनी तात्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. घटनेची गंभीरता लक्षात घेता फॉरेन्सिक टीम तसेच डॉग पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यांनी तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. नवजात शिशुचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, तसेच या घटनेमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# जिल्ह्यात १० अपघात प्रवण स्थळ

## एएसपी व एसडीओ यांनी केली पाहणी

### वरुड - राजुरा अपघातानंतर पोलिस - राष्ट्रीय महामार्ग विभाग अलर्ट



**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड - राजुरा मार्गावर बुधवारी सकाळी झालेल्या शिवाई बस आणि ऑटोच्या धडकेत पाच लोकांचा मृत्यू झाला तर दोघे जखमी आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेनंतर पोलीस आणि राष्ट्रीय महामार्ग विभाग अलर्ट झाला आहे. या पार्श्वभूमीवर आज गुरुवार १९ फेब्रुवारी रोजी अप्पर पोलीस आयुक्त पंकज कुमावत मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, वरुड चे पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या उप अभियंता आकांक्षा काळे यांनी वरुड राजुरा मार्गाचे निरीक्षण केले. अपघात स्थळाची पाहणी व अपघाताची कारणे शोधण्यासह सदर ठिकाणी अपघात होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

निरीक्षणानुसार जिल्ह्यात दहा अपघात प्रवण स्थळ निश्चित करण्यात आले आहे. यावर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी विभाग प्रयत्न करत आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी (पान २ वर)

# वाशिमच्या कॉपी प्रकरणावरून शिक्षण आयुक्तांना खरमरीत पत्र

व्यवस्थेतील अनागोंदीवर ठेवलं बोट

## समान न्यायासाठी दीर्घकालीन उपाययोजना करा

### शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाशिम जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर उघडकीस आलेल्या सामूहिक कॉपी प्रकरणानंतर विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असताना, शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे ह्या पुन्हा एकदा शिक्षक कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी मैदानात उभ्या टाकल्या आहेत.



त्यांनी शिक्षण आयुक्तांना खरमरीत आणि अभ्यासू पत्र पाठवून प्रशासनाच्या भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कोणत्याही शिक्षक कर्मचाऱ्यावर तसेच विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही अशी स्पष्ट भूमिका शिंदे यांनी घेत महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेचे लक्ष वेधून घेतल आहे.

भाजप शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे- बोंडे यांनी आपल्या पत्रात स्पष्ट शब्दांत नमूद केले की, 'शिक्षण व्यवस्थेची शुचिता अबाधित राखणे गरजेचे आहे; मात्र नैसर्गिक न्याय न देता शिक्षा करणे ही घाईघाईची भूमिका ठरू शकते.'

कॉपी प्रकरण गंभीर असले तरी चौकशी पूर्ण होण्यापूर्वी शिक्षक व कर्मचाऱ्यांवर एकत्रित कारवाई करणे अन्यायकारक असल्याची (पान २ वर)

# १२ ग्रॅम एमडी ड्रग्ससह आरोपी गजाआड

### गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हे शाखेच्या पथकाने होटल आदर्श ते चौधरी चौक मार्गावर बुधवारीं मध्यरात्री कारवाई करून आरोपी सय्यद नाझीम सय्यद कासिम (वय ३५, पटवा चौक, मसानगंज ) याला ११.३९० ग्रॅम एमडी ड्रग्स सह ताब्यात घेतले आहे. शहरात अवैधरित्या अमली पदार्थाची विक्री, वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहे. त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम मोटर सायकलवर अवैधरित्या एमडी ड्रग्स विक्री करण्याच्या इराद्याने येत आहे. यावरून पथकाने हॉटेल आदर्श ते चौधरी चौक दरम्यान सापळा रचून आरोपी सय्यद नाझीम सय्यद कासिम (३५, पटवा चौक ) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ११.३९० ग्रॅम एमडी पावडर किंमत १ लाख ११ हजार ९०० रूपये, होंडा डियो मोपेड एम एच २७ सीई ७८१३ किंमत ८० हजार , आयक्यू कंपनीचा मोबाईल १० हजार असा एकूण २ लाख, १ हजार ,९०० (पान २ वर)

# शेतकऱ्याला काठ्यांनी व लाथाभुक्क्यांनी मारहाण

वहिवाटीचा रस्ता अडवून वाद

**मोर्शी/प्रतिनिधीः-** वडिलोपार्जित शेतात जाणे येणे करणाऱ्या वहिवाटीचा रस्ता अडवून एका २७ वर्षीय युवा शेतकऱ्याला काठ्यांनी व लाथाभुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि.१४ फेब्रुवारी रोजी घडली.याबाबत सविस्तर वृत्त असे की पुनर्वसन कॉलनी मोर्शी येथील महादेव वाघमारे यांची मौजा सालबर्डी येथे तीन एकर शेती असून त्यांना शेतात जाणे येण्याकरिता मौजा जामठी शिवारातून वहिवाटीचा रस्ता




असल्यामुळे ते कित्येक वर्षापासून या रस्त्याने जाणे येणे करतात.मौजा जामठी येथे दिलीप केचे यांचे शेत आहे. त्यामुळे दिलीप केचे व त्यांच्या शेतात काम करणारे अमोल पेठे व रमेश पेठे रा.डोंगरयावली हे नेहमी वाघमारे यांचा वहिवाटीचा रस्ता अडवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून वाद घालतात.याबाबतची तक्रार मोर्शी पोलीस स्टेशनला देण्यात आली होती.दि.१४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता अमोल वाघमारे (वय २७) हे सालबर्डी येथे असलेल्या आपल्या (पान २ वर)

### शेअर मार्केटमध्ये

# गुंतवणुकीच्या नावावर वृद्धाची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेअर मार्केट मध्ये गुंतवणुकीच्या नावावर वृद्धाला ५ लाख २१ हजार रुपयांनी फसविल्याची घटना




शंकर नगर येथील ग्रीन पार्क कॉलनी मध्ये समोर आली आहे. जयंत श्रीधर देशपांडे (वय ७२) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींना विरुद्ध कलम ३१८(४),३१९(२) व आयटीआय कलम ६६(क),६६(ड) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढिल तपास सायबर पोलीस करत आहे. माहितीनुसार जयंत देशपांडे यांना आरोपीनी शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक केल्यावर जास्त नफा मिळण्याचे आमिष दाखवले. यानंतर त्यांना (पान २ वर)

# गोवंश चोरी करणारे दोघे जेरबंद

## ३.३२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** गोवंश चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे.त्यांच्या कडून ३ लाख ३२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरिश असलम पठाण (वय २१,आमनेर वरूड), चेतन विनोद वानखडे (वय २५,धनोडी ,वरुड ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. माहितीनुसार बेसखेडा येथील कृष्णाजी गुणवंत यावले (वय ६५) यांनी १५ जानेवारी रोजी



तक्रार दिली होती की त्यांच्या शेत शिवारातील गोठ्यातून ६० हजार रुपये किमतीच्या तीन गाई रात्री दरम्यान चोरी गेल्या होत्या. या प्रकरणाचे समांतर तपास करत असताना (पान २ वर)

# दर्यापूरात जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांच्या समस्या बाजूला

### पत्रकारांनाही डावलले, नागरिकांची नाराजी

**खल्लार/प्रतिनिधीः-** राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार जनतेच्या तक्रारीचे निराकरण करावे यासाठी तसेच स्थानिक पातळीवर समस्याचा निपटारा व्हावा व अधिकारी जनता यांच्यामध्ये संवाद होऊन तात्काळ समस्याचे निराकरण व्हावे या उद्देशाने जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक पातळीवर करण्यात



आले होते.

मात्र जनसंवाद कार्यक्रम हा नावापुरता जनतेसाठी होता की केवळ औपचारिकतेचा भाग होता.असा प्रश्न उपस्थित होत आहे. गावकऱ्यांच्या दैनंदिन प्रश्नांना थेट उत्तर मिळावे अधिकाऱ्यांशी (पान २ वर)

# ट्रक-बैलबंडीच्या धडकेत दोघे जखमी







### खारतळेगाव येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** खारतळेगाव मार्गावर सावजी ढाब्याच्या समोर आज गुरुवार १९ फेब्रुवारीला दुपारी ट्रकने बैलबंडीला धडक दिल्याने दोन तरुण जखमी झाले आहे, तर बैलही जखमी झाल्याची माहिती आहे. यानंतर द्रुतगती ट्रक शेतात घुसला आणि विजेचा खांबालाही त्याने तोडले. यामुळे गावात खळबळ उडाली होती. प्रवीण साहेबराव करडे (वय ३३) व अक्षय कानिकराव कोयाकर (वय २१) असे अपघातात जखमी झालेल्या तरुणांची नावे आहे. माहितीनुसार प्रवीण करडे आणि अक्षय कोळेकर आज दुपारी बेलबंडीने शेतातून कुटार भरून वलगांव कडे येत होते. त्यावेळी ट्रक एमएच १२ एनएक्स ३१८१ ने बैलबंडीला धडक दिली. धडक एवढी भीषण होती की बैलबंडी चकणाचुर झाली. यामध्ये प्रवीण आणि अक्षय जखमी झाले. बैलबंडीला धडक दिल्यानंतर (पान २ वर)

# पूजा करताना जळालेल्या महिलेचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** पूजा करतेवेळी लावलेल्या दिव्यामुळे साडीच्या पदराला आग लागल्याने जळालेल्या महिलेची उपचारा दरम्यान मृत्यू झाला. मंदा राजेश इंगोले (वय ४६,वसंत नाईक झोपडपट्टी , दसरा मैदान) असे मृतक महिलेचे नाव आहे. माहितीनुसार मंदा इंगोले ४ फेब्रुवारीच्या सकाळी आपल्या घरी पूजा करत होत्या. पूजा करताना त्यांनी दिवा लावला होता. या दिव्यामुळे त्यांच्या साडीच्या पदराने पेट घेतला आणि त्या जळाल्या. त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा केला असता त्यांचे पती राजेश इंगोले धावून आले. त्यांनी आग आटोक्यात आणली आणि जखमी मंदाला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. जिथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले.उपचार सुरू असताना मंदा इंगोले यांचा नागपूर मध्ये मृत्यू झाला. अजनी पोलिसांनी याची माहिती राजापेठ पोलिसांना दिली. या आधारावर राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# जय भवानी, जय शिवाजीच्या गगनभेदी घोषणांनी दुमदुमला शिव परिसर

## डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाची ऐतिहासिक शिवजयंती मिरवणूक

-मर्दानी खेळ, लाठी-काठीचे थरारक प्रयोग, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक ठरले आकर्षण

**अमरावती/प्रतिनिधीः-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, शौर्य, धैर्य आणि न्यायनिष्ठेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण शिव परिसर









दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून (पान २ वर)